
# आभाळओल

विजयकुमार मिठे



# आभाळ ओल

विजयकुमार मिठे

कादवा शिवार प्रकाशन

**आभाळओल**
(Abhalol)

**विजयकुमार मिठे**
Vijaykumar Mithe

**प्रथम आवृत्ती**
जानेवारी २०११

**हक्क**
सौ. निर्मला विजयकुमार मिठे

**प्रकाशन :**
कादवा शिवार प्रकाशन, नाशिक
सौ. निर्मला विजयकुमार मिठे
पालखेड बंधारा, तालुका दिंडारी, नाशिक.
मोबाईल : ९८८१६७०२०४
kadvashivar@gmail.com

**अंतर्गत सजावट**
दीपक दंडवते

**मुद्रक**
रिप्लिका प्रिंटर्स, वकिलवाडी, नाशिक.

**मूल्य**
१००/- रुपये

मित्रवर्य,
**विवेक उगलमुगले**
**रवींद्र मालुंजकर**
**के.के. अहिरे**
**दीपक दंडवते...**

तुमच्या सततच्या सहवासाने आणि कवितेतील
शब्दांच्या ओलाव्यानेच माझ्या मनातली
माणूसपणाची ओल कायम टिकवून ठेवली.
आभाळओल तुम्हालाच...!

**-विजयकुमार मिठे**

# अंतरंग


मनातलं.../५

तिच्या अंगणातला पांढरा चाफा/८

पैलतीरावर कावळे ओरडताहेत!/१४

दगडी शाळा/२२

काळ्या ढगाच्या कडा रुपेरी/३०

म्हातारपण लपता लपेना !/३४

संपत पाटलाचं गुऱ्हाळ/४२

मातीपण मिटता मिटेना!/५०

बलाकमाला उडता भासे.../५६

सुताराचा वड/६०

घरटे पाखरांचे... घर माणसांचे/६६

माझी पहिली बायको/७२

आभाळओल/८२

आई : जन्मभराची शिदोरी/८८

# मनातलं...

गेल्या अनेक वर्षांपासून माझ्या मनात काही विषय तसेच पडून होते. अनेकदा ते कथारूपाने, कवितेतून मांडण्याच्या दृष्टीने घुसळण चालू होती, पण काही केल्या ते कागदावर उतरत नव्हते आणि मनातूनही जाता जात नव्हते. दरम्यानच्या काळात दैनिक देशदूतमधून मित्रवर्य रवींद्र मालुंजकर आणि विवेक उगलमुगले यांचे ललित लेख प्रसिद्ध होऊ लागले. ते वाचल्यानंतर मलाही असं वाटलं की, आपणही ललितअंगाने आपल्या मनातील विषयांना वाट करून द्यावी. शाळा-कॉलेजमध्ये शिकत असताना दुर्गा भागवत, अनंत काणेकर, ना.ग. गोरे, ना. सी. फडके यांचे ललित लेखन माझ्या वाचण्यात आले. नंतरच्या काळात अवांतर वाचन म्हणूनही मी या लेखकांचे ललित साहित्य वाचलेलं. दैनिक गांवकरीच्या 'तरुण' पुरवणीसाठी ललित लेखन करावं, असा प्रशांत भरवीरकर यांचा आग्रह असल्याने 'तिच्या अंगणातला पांढरा चाफा' हा ललित लेख लिहिला. तो गांवकरीतून प्रसिद्ध झाला आणि लेख आवडल्याचे मला अनेक फोन आले. एका हिंदी भाषिकाचा तर रात्री साडेअकरा वाजता फोन आला. 'आपलं ललित वाचून माझं बालपण माझ्या डोळ्यासमोर उभं

राहिलं', असं खूप भरभरून तो बराच वेळ बोलत राहिला. माझा उत्साह वाढला. एकामागून एक ललित लेख 'व्यासपीठ', 'मासिक कादवा शिवार', दैनिक गांवकरी आणि दैनिक देशदूतमधून प्रसिद्ध होऊ लागले. अनेक प्रतिक्रिया मिळाल्या. सगळ्यांचा नामोल्लेख करणे शक्य नाही, पण या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो.

आभाळओलमधील बरेच अनुभव माझ्या बालपणातील असल्याने आणि आईचा बालपणापासून मला अधिक सहवास लाभल्याने अनेक लेखांमध्ये तिचा उल्लेख येतो. तो अटळ आहे. प्रत्येक लेख हा स्वानुभवातून लिहिलेला आहे. आभाळओलमधील सगळे ललित लेख लिहिताना एखादी घटना, प्रसंग रसाळ पद्धतीने सांगत असतानाच त्याचा मेळ मानवी जीवनाशी घालणे म्हणजे 'ललित' अशी माझी स्वत:पुरती ललितची व्याख्या मी केली आहे. त्यानुसार सगळ्या लेखांचं लेखन झालेलं आहे.

माझ्या आतापर्यंतच्या साहित्यातील अनुभवानुसार ललित लेखनप्रकार हा मला इतर वाङ्मय प्रकारांपेक्षा अवघड विषय वाटतो. कमीत कमी शब्दात मोठा विषय मांडण्याची कसरत ललित लेख लिहिताना करावी लागते. कथा कादंबरीच्या लेखनासाठी जसे प्रचंड वाचन, मनन विषयाची खोलवर समज, मांडणी, निवेदन शैली या गोष्टी महत्त्वाच्या असतात, तशाच त्या ललित लेखनालाही आवश्यक असतात. 'आभाळओल'मधील ललित लेख लिहिताना असा प्रयत्न मी केला आहे. लेखांच्या प्रसंगानुरूप रेखाटन करणारे चित्रकार कृष्णकुमार सोनवणे या सर्वांचे मनापासून आभार. मला खात्री आहे की, 'आभाळओल'वाचून आपल्या मनात नक्कीच ओलावा निर्माण होईल आणि महाराष्ट्रातील रसिक वाचक मनापासून आभाळओलचं स्वागत करतील. धन्यवाद!

**-विजयकुमार मिठे**



# तिच्या अंगणातला पांढरा चाफा

तिच्या अंगणातला तो पांढरा चाफा आजही एखाद्या माणसासारखा आपल्या शेकडो हातात पांढऱ्या शुभ्र फुलांचे गुच्छ घेऊन तिच्या स्वागतासाठी उभा आहे वर्षानुवर्षे! तिच्याबद्दलची त्याची अनिवार ओढ माझ्या मनात मात्र अढी घालून बसली आहे. पण असं असलं तरी त्याच्यामधले बदल मी लहानपणापासून पहातो आहे. त्यांची अनेक रूपं मी विविध ऋतूंमध्ये पाहिली आहेत. कधी कधी तो मला असंख्य बगळ्यांच्या पिल्लांची पिल्लावळ आपल्या उंच हाताच्या बोटावर लीलया पेललेल्या माणसासारखा दिसतो. आताशा तो साठीला टेकलेल्या म्हाताऱ्यागत थकल्यासारखा दिसतो. कमरेत वाकून काहीतरी शोधतो आहे, असं वाटतं. आता तो फक्त एका मुळीवर तग धरून उभा आहे. पूर्वीसारखाच तो अजूनही पानाफुलांनी बहरतो, मोहरतो. त्याच्या फुलांचा सुगंध कासममामूच्या पडक्या घराच्या अंगणात दरवळत राहतो. माझ्या घराच्या पाठीमागे असलेल्या ह्या चाफ्याच्या झाडाचं मला विलक्षण वेड आहे. अनेक घडल्या-बिघडल्या घटनांचा तो साक्षीदार. पण मुका मुका झाला आहे. त्याची पांढरी शुभ्र फुलं मी अनेकदा वेचली. ओंजळीत घेऊन हुंगली. कित्येक वेळा

फुलांचे गजरे करून अमीनाच्या केसात माळले. ही अमीना, कासममामू आणि हसिनाची मुलगी. तिलाही माझ्याइतकीच चाफ्याची, त्याच्या फुलांची आवड. माझ्याच वयाची, अल्लड, गोरीपान मुलगी. याच चाफ्याखाली आम्ही किती खेळलो, वाढलो. आमच्या वयातले बदल चाफ्यानं पाहिलेले. आमच्या प्रेमाचे संवाद, रुसवे फुगवे ऐकलेले. तरीही एखाद्या समजूतदार माणसासारखे मनात साठवलेले. आखाजीच्या सणाला त्याच्या फांदीला झोका बांधून झोके खेळलो. झोक्यावर बसूनच त्याच्या शेंड्यावरील फुलं खुडली. झोक्यावरील एकमेकांच्या स्पर्शाने चाफ्यासारखेच अंगोपांगी मोहरलो. एकमेकांच्या डोळ्यांच्या आभाळात स्वप्नं पाहता पाहता लहानाचे मोठे झालो.

आमच्या घरात चैत्री पाडव्याला ताई गौराईची पूजा मांडायची. ताईच्या मैत्रिणी तिला मदत करायच्या. अमीनाही त्यांच्यात सहभागी झालेली असायची. चाफ्याच्या फुलांनी गौराईला नटविण्यात गढून गेलेली असायची. माझं उगाच अमीनाच्या ओढीनं त्यांच्यामध्ये लुडबुडणं. केसात फुलं माळलेली अमीना आणि सजवलेली गौराई मला सारख्याच वाटायच्या.

एकदा असेच दुपारच्या वेळी चाफ्याखाली खेळताना ती माझ्यासोबत 'रडीचा डाव' खेळली. मी चिडलो, रागावलो. अमीनाने अबोला धरला. मला असह्य झालं. तिच्या अबोल्यानं चाफाही मुका मुका झालेला. त्यानेही तिचीच बाजू धरलेली. तो तिचीच बाजू धरणार ! ती दोघं एकमेकांना तशी पूरकच. तिच्या ओठांचा गुलाबी रंग घेऊन त्याने आपल्या फुलांचे देठ माखवून घेतलेले. तर त्याच्या फुलांचा पांढरा शुभ्र रंग तिने आपल्या दातांना लावलेला. तिचे मोकळे केस वाऱ्याबरोबर भुरूभुरू उडायचे, तर तोही वाऱ्याच्या झुळकीसरशी आपल्या फुलांची पखरण करायचा. त्या दोघांमध्ये मी उगाच परका परका, तिऱ्हाईतासारखा. तरीही त्यांच्यातलाच एक. तिच्या माझ्या अबोल्यात चारदोन दिवस गेले. शाळेतून घरी येताना ती ठेच लागून पडली. मी पुढं होऊन तिला उठवलं. ती पुरती धुळीनं माखलेली. तिचा सलवार कुर्ता मी झटकला. तसा तिनंही आपला अबोला सोडला. ती हसली. तसा चाफाही भर उन्हात असंख्य फुलांचे दात दाखवून माझ्याकडे पाहून हसू लागला. हात उंचावून वाऱ्याबरोबर नाचू लागला. त्यालाही

आनंद झालेला. अमीनाच्या अंगाखांद्यावर फुलांचा वर्षाव करू लागलेला. चाफा लबाड असा की,

**'तिच्या एका अबोल्यानं मुका व्हायचा चाफा**
**तिच्या नुसत्या हसण्यानेही फुलून यायचा चाफा'**

आमच्यापेक्षा वयानं चारदोन वर्षांनी मोठा असलेला चाफा, त्याच्याच संगतीसोबतीत आम्ही मोठे झालेलो. अमीना वयात आली. खुबसुरत दिसू लागली. तिच्या नाजूक अदा, डोळ्यात उन्माद. मी पुरता घायाळ. एकाच काठीने फुलं पाडायच्या निमित्ताने कधी एकमेकांना बिलगलेलो. तिच्या उष्ण स्पर्शाने भारावलेलो. तिच्या डोळ्यात माझंच रूप शोधू लागलेलो. तर माझ्याआधी चाफ्याचं रूप तिच्या डोळ्यात साठलेलं. मला त्याचा रागही आला आणि हेवाही वाटला. तिच्या रसभरल्या ओठांना चुंबावं म्हणून पुढे झालो तर त्यानं एक पिवळं जर्द पान दोघांच्या मध्ये टाकून रसभंग केलेला. प्रणयाच्या बेधुंद समयी एखाद्या म्हाताऱ्याने मध्येच खोकून व्यत्यय आणावा तसं त्याचं नेहमीचंच वागणं. त्याच्या असल्या वागण्यानं माझ्या मनात त्याच्याबद्दल तिरस्कार भरलेला.

अमीनाच्या शादीच्या वेळी तर हा भलताच रंगात आलेला. अमीनाला हळद लागलेली. यानेही आपलं तोंड आतून हळदीनं माखवून घेतलेलं. तिचे मेंदीभरले हात पाहून यानेही आपल्या बोटांवर कळ्यांची मेंदी रेखलेली. अमीना नवरी होऊन नटलेली. तिच्या होणाऱ्या नवऱ्याच्या आधी हाच नटून बसलेला. तिचं अंगणातलं नाजूक येणं जाणं. तिच्या पायाखाली याने फुलांच्या पायघड्या घातलेल्या. ती त्याच्यावरती दिलखूष. माझ्या काळजात उगाचच उन्हासारखी जळजळ.

अमीनाचा नवरा मांडवदारी आलेला. ढोल-ताशांच्या आवाजावर पोरं नाचू लागलेली. चाफाही रंगात येऊन हात उंचावून नाचू लागलेला. मी मांडवाच्या खांबापाशी पोरका झाल्यासारखा उभा. तर हा आपल्या असंख्य शुभ्र फुलांचे दात विचकून मला वाकुल्या दाखवू लागलेला.

आपल्या 'माँ'च्या गळ्यात पडून अमीना रडू लागलेली. अमीना सासरी निघाली. चाफा मुका मुका. थिजून गेल्यागत उभा. जाताना तिने चाफ्याचं सर्वांग कुरवाळलं. त्याच्याही अंतरंगातल्या दुधाच्या घागरी उचंबळून फुलांच्या देठी

साठल्या आणि आसवांची फुले अमीनाच्या अंगावर कोसळली. तिला हुंदका दाटला. तिने मागे वळून पाहिलं. माझ्याही डोळ्यात आसवांचं आभाळ भरून आलेलं. ती निघाली. मी व्याकूळ पक्षी. सारं काही हरवलेला.

अमीनाला सासरी जाऊन आता चार दिवस झाले होते. बालपणातले किती तरी क्षण मी तिच्यासोबत घालविलेले. तिचं नसणं मनात काहूर माजवू लागलेलं. तिचा हट्टीपणा, खोडकर स्वभाव, मधूनच चिडणं हे सगळं नजरेसमोर पुन्हा पुन्हा येत होतं.

आपल्याला जसं वाटतं तसं चाफ्यालाही वाटत असेल का? त्याच्याही मनात अशी हुरहूर दाटली असेल का? म्हणून मी अंगणात येऊन चाफ्याकडे पाहिलं तर त्याची अवस्था माझ्यापेक्षाही बिकट झालेली. बेटा, माझ्या नजरेला नजर भिडवायलाच तयार नाही. पाठ फिरवून बसलेल्या माणसासारखा आभाळाकडं फुलांचे तोंड वर करून पाहत बसलेला. अबोल झालेला. अमीनाच्या आठवणींनी आम्ही दोघंही अस्वस्थ झालेलो, अगतिक झालेलो. अमीनाचीही अवस्था आमच्यासारखीच झाली असेल का? तीही अशीच व्याकूळ झाली असेल का? कदाचित असंही असेल, तिला आमचा विसर पडला असेल आणि ती आपल्या दुल्ह्याबरोबर रममाण झाली असेल. पंधरा दिवस झाले. अमीनाच्या वाटेकडे आमचे डोळे लागलेले आणि एक दिवस ती आली. तिला दूरवरून येताना पाहताच चाफ्याला आनंद झाला. सोबत तिचा दुल्हाही होता. ती चाफ्याखाली आली. तिची मेंदीनं माखलेली पावलं चाफ्यानं आपल्या फुलांनी कुरवाळली. तिनं चाफ्याच्या अंगाखांद्यावरून हात फिरवला. त्यानं तो शहारला. फांद्या-फुलांनी सळसळला. अमीना चार दिवस माहेरी राहिली. मी सकाळ-संध्याकाळ माझ्या अंगणात उभा. अमीनाचं क्वचितच घराबाहेर येणं. माझ्याकडं पाहून वरकरणी हसणं, बोलणं. तिच्यातला हा बदल नवीन होता. मला अस्वस्थ करीत होता. चाफ्यालाही ते जाणवलं. त्याच्याही सहवासात ती आली नाही. चार दिवस राहून अमीना सासरी निघून गेली. मला भेटली नाही की, बोलली नाही. तिच्या विरहापेक्षाही तिचं हे तिऱ्हाईतासारखं वागणं जिवाला हुरहूर लावून गेलं.

मध्यंतरी वर्ष-दीड वर्षांचा कालावधी गेला. अमीनाच्या आठवणींचा मला

विसर पडत चाललेला. पण चाफा मात्र तिचाच ध्यास धरून बसलेला. कासममामू अधूनमधून अमीनाच्या सासरी जात येत राहिला. अमीनाशी काही बोलावं, तिला लांबवरून का होईना पहावं, यासाठी डोळे आतूर झालेले. तिच्या वाटेकडे लागलेले, पण अमीना आली नाही.

ऋतू आले, ऋतू गेले. अमीना माहेराला आली. चाफ्याला आनंद झाला. असंख्य फुलांचे डोळे करून त्याने अमीनाला आपल्या डोळ्यात साठवून घेतलं. तिनेही त्याच्या अंगाखांद्यावर हात फिरवून त्याला कुरवाळलं. तिच्या विरहाने खचलेला तो पुन्हा नव्या उमेदीनं उभा राहिला. तिच्या सौंदर्याला आलेलं फूल. तिच्या कडेवरचं मुल गोंजारण्यासाठी तो खाली झुकला. मूल कडेवरून उतरून रांगायला लागलं तर याने त्याला बसण्यासाठी फुलांची चादर अंथरली. बापाच्या पायाला धरून मुलानं उभं राहावं, तसं मूलं चाफ्याच्या आधारानं उभं राहिलं. चाफा हरखून गेला.

कासममामूच्या कुटुंबाची नंतरच्या काळातली वाताहत चाफ्यानं पाहिलेली. अमीनाची माँ कासममामूला वाऱ्यावर सोडून राऊचा हात धरून पळून गेली. अखेरच्या घटका मोजत कासममामू जगत राहिला असाहाय्यपणे. कासममामूच्या देहावर अखेरची फुलं उधळायची दुर्दैवी वेळही चाफ्यावर आली. माणसांच दु:ख पाहून कमरेत वाकलेलं ते चाफ्याचं झाड अजूनही एका मुळीवर तग धरून उभं आहे. कासममामूच्या मृत्यूनंतर अमीना एकदाही गावाकडं फिरकली नाही. मधल्या काळात खूप वर्षे पाखरांसारखी उडून गेली. काय करीत असेल अमीना? आपल्या नातवांमध्ये रमली असेल की...

तिच्या अंगणातला तो पांढरा चाफा मात्र अजूनही तळपत्या उन्हात असंख्य फुलांचे गुच्छ घेऊन तिच्या स्वागतासाठी उभा आहे. ती कधी तरी परत येईल या एकाच आशेवर!

**



# पैलतीरावर कावळे ओरडताहेत!

**‘पैल तो गे काऊ कोकताहे ।**
**शकून गे माये सांगताहे ।’**

हे कावळ्याबद्दलचं वर्णन लता मंगेशकरांच्या सुरेल आवाजात ऐकायला आपल्या कानांना गोड वाटतं. पण प्रत्यक्षात कावळ्याला पाहिल्यावर आपल्याला चांगलं वाटतं का? खरंच कावळ्याबद्दल आपलं मत चांगलं आहे का? माझं मात्र निश्चितच चांगलं नाही. का कोण जाणे, पण कावळ्याबद्दल माझ्या मनात भयंकर तिरस्कार भरलेला आहे. अर्थात त्याला कारणही तसंच आहे.

माझ्याही बालपणी अंगणात काऊ-चिऊ येत होते. त्यांना मी माझ्या नाजूक-गोजिरवाण्या हातांनी दूधभात खाऊ घातलेला. त्यांनीही तो टुणूक टुणूक उड्या मारत खाल्लेला. आजी कावळ्याबद्दलच्या अनेक गोष्टी सांगायची. त्या ऐकून कावळा काळा असला तरी मला आवडायचा.

आजीनं कावळ्याबद्दलचा तिच्या अनुभवास आलेला असाच एक प्रसंग मला सांगितलेला. तो सांगतानाही तिच्या चेहऱ्यावर समाधान असायचं. कारण त्या प्रसंगात तिच्या भावाचं, माहेरचं मोठेपण होतं. तीस-चाळीस वर्षांपूर्वी आमच्या

कुटुंबात कुणाचा तरी अचानक मृत्यू झाला. निरोप देण्यासाठी आत्तासारख्या सुविधा त्या काळात नव्हत्या. आजीचं माहेर गावापासून तीस किलोमीटरच्या अंतरावर. माहेरी निरोप कसा धाडावा म्हणून आजी विचारात पडलेली. पण अवघ्या दोन तासांतच आजीचा भाऊ बैलभिरकं घेऊन हजर झाला. सगळ्यांनाच नवल वाटलं. 'निरोप नाही, माणूस पाठवला नाही, तुम्हाला कसं समजलं?' असं विचारल्यावर आजीचा भाऊ म्हणाला, 'मला कावळ्यानं सांगितलं.' हे ऐकून जमलेल्या लोकांना आश्‍चर्य वाटलं. आजी सांगायची; तिच्या भावानं डोंगरात जाऊन निळवंती वाचलेली होती. म्हणून त्याला पशुपक्षांची भाषा कळायची. हे ऐकून माझ्या बालसुलभ मनाला वाटायचं, आपणही डोंगरात जाऊन निळवंती वाचावी. म्हणजे आपल्यालाही कावळ्याची भाषा समजेल. निळावंती वाचताना कुणाचा आवाज कानावर पडला तर माणूस भ्रमिष्ट होतो, असंही ऐकलेलं. नेमकं आपल्याच बाबतीत असं घडलं तर? करायला गेलो गणपती आणि झाला मारुती, असं काही घडण्यापेक्षा निळवंती वाचण्याचाच विचार मी सोडून दिला. कावळ्याबद्दलची एवढी उत्सुकता माझ्या मनात असताना तो मला नकोसा का वाटू लागला? माझ्या मनात तिरस्कार निर्माण करायला स्वत: कावळाच जबाबदार आहे.

मी चौथी किंवा पाचवीला असेन. आईला उपवास होता. बाहेर उन्हं रणरणत होती. अशा भर उन्हात आईने मला वाळ्या वाण्याच्या दुकानातून खिचडीसाठी तूप आणि साबुदाणे आणायला पाठविले. हातात चार-आठ आण्याची चिल्लर आवळून धरीत आणि 'चार आण्याचं तूप, आठ आण्याचे साबुदाणे' असं मनाशी घोकीत वाणीन काकीच्या चांद्याजवळून पळतच मी वाळ्या वाण्याच्या दुकानात गेलो. एका हातात तूप आणि दुसऱ्या हातात साबुदाण्याची पुडी घेऊन घराकडं येत असताना वाटेवरच बाबूकाकाच्या लिंबावर बसलेल्या कावळ्यांनी मला पहाताच माझ्यावर झडप घातली. एकाने तर माझ्या डोक्यालाच चोच मारली. त्या गडबडीत हातातलं तूप सांडलं. मी रडतच घराकडं पळालो. आईनं माझं काही एक ऐकून न घेता माझ्या पाठीत चार-सहा धपाटे घातले. हे सगळं त्या लिंबावरच्या कावळ्यांमुळंच घडलं होतं. कधी तरी त्यांचा बदला घेण्याची

खूणगाठ मी मनाशी बांधली.

अनेकदा लिंबाजवळून जाताना त्या कावळ्यांची आणि माझी हमखास गाठ पडायची. वस्तीला आलेल्या पाहुण्यागत ते आठन्‌काळ बारामास त्या लिंबावरच ठाण मांडून बसले होते. माझं लिंबाकडं लक्ष जाताच ते माझ्याकडंच मान तिरपी करून पाहत असलेले दिसायचे. त्यांच्या पाहण्यातले भाव मला हिणवल्याचे भासायचे. कधी कधी तर ते आपल्याला हसताहेत असंही मला वाटायचं. काही झालं तरी एकदा का होईना यांना धडा शिकविलाच पाहिजे, असं सारखं मनातून वाटायचं.

एकदा दुपारची शाळा सुटली होती. रस्त्यानं चालतानाच मी चांगले दहा-वीस गोल दगड दप्तराच्या पिशवीत भरून घेतले. बाबूकाकाच्या घराजवळ येताच ओट्यावर उभं राहून एक दगड मी लिंबावर बसलेल्या कावळ्यांच्या दिशेने भिरकावला. त्या अचानक झालेल्या हल्ल्यानं कावळे बिचकले, जागीच फडफडले. माझ्याकडं पाहत सावध झाले. मी दुसरा दगड भिरकावताच ते सावधपणाने लिंबाच्या उंच शेंड्यावर जाऊन बसले. एकामागून एक नेम धरून मी दगड फेकत राहिलो. पण एकही दगड कावळ्यापर्यंत पोहोचत नव्हता. दगड फेकून माझा हात दुखायला लागला. नाईलाजानं मी घराचा रस्ता धरला. थोडा पुढे गेलो आणि कावळ्यांनी माझ्यावर हल्ला चढविला. चवताळल्यासारखे ते माझ्याभोवती झेपावू लागले. मला पळता भुई थोडी झाली आणि इथूनच कावळ्यांची माझ्याशी दुश्मनी सुरू झाली. अगदी सात पिढ्यांचं वैर असल्यागत ते माझ्या मागे लागले.

जिथं जिथं म्हणून संधी मिळेल, तिथं तिथं कावळे मला छळू लागले. मला पाहिलं की बिथरल्यासारखं करू लागले. याचं आजूबाजूच्या लोकांना नवल वाटायचं. या पोराच्याच मागं का बरं कावळे लागतात? यावर त्यांच्यात चर्चा रंगायची.

कावळे मला सर्वात जास्त छळायचे ते भुईमुगाच्या शेतात. माणसं नांगरा मागोमाग शेंगदाणे टाकायला असले म्हणजे तासातले शेंगदाणे कावळ्यांनी खाऊ नये यासाठी कावळे उडविण्याचं काम आई माझ्यावर सोपवायची. कावळे झडप

मारून तासातले शेंगदाणे पळावायचे. मी पुढच्या कावळ्यामागे धावलो की मागचे चार-दोन कावळे तासातले शेंगदाणे आपल्या चोचीत पकडून लहान मुलाने चॉकलेट खावे तसे ते मला शेंगदाणे दाखवून खायचे. हे पाहून मी भयंकर चिडायचो आणि रिकामं तास पाहिलं की, आईच्या तळपायाची आग मस्तकात जायची. तिनं रागाने फेकलेलं मातीचं ढेकूळ रपकन् माझ्या पाठीत बसायचं. त्यानं माझ्या डोळ्यात टचकन पाणी भरायचं. ते पाहून कावळ्यांना मात्र आनंद झाल्यासारखं वाटायचं. आपले पंख फडफडून जणू ते हवेतल्या हवेत नाचल्यासारखे करायचे.

काहीही करून कावळ्यांचा बंदोबस्त करणे मला भागच होते. दिवसभर त्यांच्या मागं धावून धावून हातपाय दुखत होते. पळून पोटात दम मावत नव्हता. मनात विचार आला, एखादा कावळा मारून शेतात काठीला टांगून ठेवला तर? मरणाच्या भीतीने कावळे शेंगदाणे खायला येणार नाही. एक तरी कावळा मारायचाच, असा निर्धार करून मी एकदा दिवसभर 'गल्लोर' घेऊन कावळ्यांच्या मागं लागलो, पण कावळे महाकावेबाज, धूर्त. त्यांनी माझ्या मनातला हेतू ओळखला असावा. मला पाहताच ते गुंगारा देऊन पळू लागले. माझा नेम लीलया चुकवू लागले. मनाला निराशा आली, पण हिंमत हरलो नाही. 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे' ही वर्गात शिकविलेली म्हण आचरणात आणू लागलो. तिसरा प्रहर झाला होता. उन्हं उतरणीला लागली होती. आंब्याच्या सावल्या वावरभर हातपाय पसरून आळस देत बसल्या होत्या. माझ्या गल्लोरीतला एक दगड सण्ण आवाज करीत बाभळीवर बसलेल्या कावळ्यांच्या दिशेने गेला. माझ्या प्रयत्नाला यश आले. एक कावळा टपकन खाली पडला. क्षणभर वावरातल्या मातीत तो फडफडला आणि चोच टाकून मरून पडला. त्याच्या मरणाचाही मला आनंद झाला. गल्लोर हवेत उंचावून मी अक्षरश: नाचलो. पुढे होऊन विजयी चेहऱ्यानं मी तो मेलेला कावळा उचलला. उंच काठीला उलटा बांधून वावराच्या मधोमध उभा केला. वाटलं, आता कावळ्यांच्या त्रासातून आपली मुक्तता झाली, पण क्षणातच आभाळ काळ्या ढगांनी भरून यावं तसं झालं. असंख्य कावळ्यांच्या झुंडीच्या झुंडी दिशादिशातून मेलेल्या कावळ्याच्या

दिशेने झेपावू लागल्या. त्यांच्या त्या कर्कश्श कावकावीनं माणसाचं डोकं पिकलं. मेलेल्या माणसांच्या मौतीला गावोगावच्या नातेवाईकांनी जमावं तसे ते कावळे मेलेल्या कावळ्याभोवती जमा होऊन आक्रोश करू लागले. शेतात शेंगदाणे टाकणारे आईसह सर्वजण माझ्यावर रागावले. मलाही माझ्या हातून फार मोठं पाप घडल्याचं पाहून दु:ख झालं.

जे झालं ते गंगेला मिळालं, इथून पुढे कावळ्यांच्या वाटेला जायचं नाही, असं मी ठरवून टाकलं, पण घडलेला प्रसंग कावळ्यांनी फारच मनाला लावून घेतल्याने त्यांनी माझ्यावर 'डूख' धरला. ते अधिकच आक्रमक झाले. मला पहाताच माझ्या दिशेने झेपावू लागले. एखाद्यानं टपली मारून पळावं तसे ते माझ्या डोक्याला चोचा मारून पळू लागले.

एक दिवस तर शाळा सुटलेली असताना एक कावळा माझ्या पाठीमागं लागला. इतका की, आराधरी खेळावी तसा तो मला पकडायला पहायचा. मी सारखा घराकडे पळायचो तो माझा पाठलाग करायचा. आमच्यामागं पोरं टाळ्या पिटीत पळायचे. पळून पळून माझ्या घशाला कोरड पडली, पण काही केल्या कावळा पिच्छा सोडायला तयार नव्हता. मी घरात घुसलो. वाटलं, आता तरी कावळा येणार नाही, पण तो ओसरीत येऊन बसला. मी जिन्याजवळ बसून त्याच्याकडं पाहत होतो. त्यानं सावधपणाने मान वळवून मला पाहून घेतलं. मी दिसलो नाही म्हणून तो माघारी फिरला. तसा मी रोखून धरलेला श्वास सोडला.

कावळा मला शिवला तरी शूर्चिभूत होण्यासाठी आई मला पुन्हा-पुन्हा आंघोळ करायला सांगायची. आज तर कावळा घरात घुसल्याचं ऐकून ती पुरती घाबरली. माझ्याबाबतीत काही अशुभ घडायला नको म्हणून तिने बाळू बामणाला पंचांग पहायला सांगितले. खाली मान घालून त्यानं ते वाचलं. बोटांची आकडेमोड केली आणि कावळ्यांना संतुष्ट करण्यासाठी दहीभाताचा काला खाऊ घालण्याचा सल्ला दिला. रोज नित्यनेमाने सकाळी उठून मी आईने करून दिलेला दहीभाताचा काला अंगणात फेकून कावळ्यांना कावकाव करून बोलावू लागलो. पण माझ्यावर कावलेले काळे कावळे काहीकेल्या काला खायला

पुढे येत नव्हते. घराच्या कौलावर बसलेले कावळे हटलेल्या जावईबापूसारखे अधिकच हटवादी झाले होते.

कावळ्यांचं आणि माझ्यामधलं हे युद्ध बरीच वर्षे टिकून होतं. एकमेकांना काटशह देता देताच माझं वय वाढत गेलं. वाढत्या वयाबरोबर मला समजही बऱ्यापैकी आली. तसे कावळेही समजदार झाले. समजूतदार माणसासारखे माझ्याशी वागू लागले. एरव्ही माझ्यावर झडप घालणारे, मला वेळी अवेळी छळणारे कावळे एकाएकी शांत झाल्याचं पाहून मला समाधान वाटलं. पण हे समाधान फार काळ टिकलं नाही. कावळ्यांचे कावे डावे हळूहळू माझ्या लक्षात येऊ लागले. त्यांच्यातला आक्रमकपणा कमी झाला होता, पण मला छळण्याच्या आपल्या हेतूपासून ते जराही विचलित झाले नव्हते. माझ्याशी हटवाद करून मला रंजीस करण्याचे नवीन उपाय त्यांनी शोधले होते.

भाद्रपदातला पितृपक्ष म्हणजे 'जेवता भादवा' सुरू झाला की, ते माझ्याशी अधिकच हटवाद करायचे. आमच्या घरी 'पित्तर' म्हणून जेवायला आलेल्या माणसांना ताटकळत ठेवण्यात कावळ्यांना कमालीचा आनंद मिळायचा. घरात वडील मुलगा मी असल्याने पितरांना आगेरी देण्याचा, कावळ्यांना कावकाव करून घास भरविण्याचा मान मला असल्याने बारा वाजेच्या कडकडीत उन्हात नैवद्याचं ताट घेऊन मी बेंबीच्या देठापासून कावकाव करून कावळ्यांना बोलवायचो. माझ्या आवाजानं दहा-वीस कावळे जमादेखील व्हायचे. पण घराच्या कौलावर, अंगणात बसून ते फक्त माझी गंमत पहायचे. माझी कावकाव धुडकावून मला अपमानित करायचे. कावळा कधी घास घेईल, घरातील पितरांना आणि विशेषत: मलाही वाटायचं, पण कावळे आपल्या निर्णयापासून जराही ढळत नव्हते. माझ्या अंगातून घामाच्या धारा सुरू झालेल्या. काऽऽवकाऽऽव करून पोटातले भुकेचे कावळे जागे झालेले. घशाला कोरड पडलेली. माझी अवस्था पाहून एकजात सगळे कावळे 'कशी जिरवली' अशा आर्विभावात मान तिरपी करून माझ्याकडं पाहत बसलेले. त्यांचा तो हटीवाद पाहून मी मनातून भयंकर चिडलेलो. वाटायचं, कावळ्यांना चार-दोन दगड मारून आलेला राग शांत करावा, पण आपल्या आज्या-पणज्याच्या रूपात आलेल्या कावळ्यांना

दगड तरी कसा मारावा? असा विचार करून शांतपणे काऽऽवकाऽऽव करून कावळ्यांची मनधरणी करू लागायचो. शेवटी करणार तरी काय? 'अडला हरी, गाढवाचे पाय धरी.'

अनेकदा मनात विचार येतात, कुणी आणि कशासाठी दिला एवढ्या घाणेरड्या पक्षाला हा मान? उकिरड्यावरचं सडकं, शिळंपाकं खाणारा, आळशी, दळभद्री कावळा. एक तरी जमेचा गुण आहे का त्याच्याकडं?

ज्याला स्वत:चं घरटं नाही, घरटं बांधण्याची अक्कल नाही, त्याने म्हणे दहाव्याचा पिंड खाल्ला की मनुष्याची मुक्तता होते. मोक्ष मिळतो. पितृपक्षात याने घास घेतला की, स्वर्गस्थ पूर्वजांचे आत्मे संतुष्ट होतात. मुळात याला कितीही खायला घातलं तरी हा असंतुष्टच! निसर्गात आपल्या अवतीभोवती कितीतरी सुंदर पक्षी आहेत ते त्यांच्या रूपाने, गुणाने माणसाला आनंदित करतात. पोपटाचं मिठूमिठू बोलणं, मोराचं पिसारा फुलवून नाचणं आणि कोकिळ पक्षाचं सुरेल आवाजातलं गाणं ऐकलं की माणसाचं मन उल्हसित होतं. आनंदानं नाचू लागतं. असं असतानाही या सर्वांना डावलून कावळ्यालाच हा मान का? काळ्या रंगाचा, चकण्या डोळ्याचा, भसाड्या आवाजाचा हा कावळा या मानामुळे भलताच हुरळून गेला आहे. त्याच्या वागण्या-पाहण्यात अहंकार भरला आहे. बरेचदा तो तामसी डोळ्यांनी माझ्याकडे पाहतो, तेव्हा मला तो रागाने लालबुंद झालेल्या माणसासारखा वाटतो.आताश: माझा कावळ्यांवरचा विश्वास उडाला आहे. त्यांच्या माझ्यातलं हे चालत आलेलं वैर ते विसरतील, असं आता मला वाटत नाही. आयुष्यभर कावळ्यांनी मला छळलं आहे. माझ्या मृत्यूनंतरही ते मला छळल्याशिवाय राहणार नाहीत, याची मला त्यांच्या आतापर्यंतच्या अनुभवावरून खात्री पटली आहे. खरं तर चूक त्यांचीच आहे. स्वत:हून ते माझ्या वाटेस गेल्यानं आमच्या दोघांतलं वैर वाढत गेलं. काहीही असो, कोण चुकला, हे मला महत्त्वाचं वाटत नाही. आमच्यातलं वैर संपवणं गरजेचं आहे. मी समंजसपणाने माघार घ्यायला तयार आहे, पण कावळ्यांचं काय? त्यांना कोण समजावून सांगणार? आणि सांगणार तरी कसं?

**



# दगडी शाळा

भर पंगतीतून गरिबाच्या पोराला उठवून द्यावं आणि त्याने पोटात भूक घेऊन थोडं बाजूला लापटासारखं बसून आशाळभूतपणे पंगतीकडे पहात बसावं, तशी दगडी शाळा गावापासून दूर बसून गावाकडंच पाहत होती. तिच्या पूर्वेला गावओढा, आळशी माणसानं झोपेतच आळ्यापिळ्या दिल्यागत वाकडा तिकडा होऊन पसरला होता. उत्तरेला पाठीत वाकलेल्या चांगुणा म्हातारीनं काही तरी शोधित बसावं तशी खळवाडी दगडी शाळेभोवतीनं बसली होती. शाळेच्या दक्षिणेला नुसत्या नावानेच हलवाई असलेल्या पुना हलवायाचं घर होतं. त्याच्या घराला लागूनच अंधाऱ्यात निघालेल्या वरातीत माणसांनी बत्त्या धरून चालावं तसे हिरव्या रंगाचे फड डोक्यावर घेऊन सिंदीबन उभं होतं. शाळेसमोरून नागमोडी होत जाणारा रस्ता मियाँबाबाच्या चिंचाखालून शिरुंदीत उतरला होता.

एखाद्या जाडजूड अवाढव्य बाईनं ओट्यावर फतकल मारून बसावं तशी पाच-सहा बिग्याच्या जागेत दगडी शाळा बसलेली दिसत होती. दगडी शाळेच्या खोल्या तशा चारच. पण भलत्याच मजबूत, घडीव, खांडकीच्या काळ्याभोर दगडात बांधलेल्या. वरती मंगलोरी कौलाचं छत. शाळेच्या मागील बाजूला

ऐसपैस जागा. त्या जागेत रात्रीच्या वेळी कठपुतलीसारखे खेळ, महिना महिना चाललेले. पुढे मुलांना खेळण्यासाठी मोठं मैदान. सभोवतीनं हिरवागर्द डिडोनिया. चारही बाजूनं शाळेच्या संरक्षणासाठी काटेरी तारांचं कुंपण. त्याला लागून गावकीची विहीर. अशा सुंदर वातावरणातील दगडी शाळा मला मात्र अजिबात आवडत नव्हती. मी शाळेत जाण्याजोगा म्हणजे सात वर्षांचा झालो आणि एक दिवस माझा एक हात आईच्या हातात आणि दुसऱ्या हातात दप्तराची पिशवी. त्या पिशवीत माझ्या मोठ्या बहिणीने वापरून टाकून दिलेली फुटकी खापराची पाटी, काही पेणींचे तुकडे. एखाद्या लहान मुलानं फुफाट्यातून पारशा एरंडाचा फरफट गाडा ओढीत न्यावा तशी आई मला ओढीत घेऊन चाललेली. आईच्या पायांना शाळेची ओढ तर माझ्या पायांना घराची ओढ. म्हणून ते जड जड झालेले. एकदाचा माझा फरफट गाडा आईनं दगडी शाळेतल्या जोशी गुरुजींच्या वर्गासमोर आणून उभा केला. जोशी मास्तरांनी आईला विचारून माझं नाव हातातल्या वहीत लिहून घेतलं. एखाद्या भेदरलेल्या सशासारखा मी आईच्या पदराआड दडून उभा राहिलेलो. मुलं वर्गातून वाकून वाकून उत्सुकतेनं माझ्याकडे पाहत होते. माझं काहीएक ऐकून न घेता आईनं माझ्या पाठीत जोराचा रपाटा घालून मला जोशी गुरुजींच्या हवाली केलं आणि बिनघोरपणे ती घराच्या वाटेला लागली. मी आकांडतांडव सुरू केलं. जोशी गुरुजींच्या हाताला सुटण्यासाठी हिसडे देऊ लागलो. आई दिसेनाशी होताच जोशी गुरुजींच्या छडीनं माझ्या पायाच्या पोटऱ्यावर, हातावर लाल रंगाची नक्षी काढली. तो प्रसाद खाऊन मी पहिलीच्या वर्गात मुलांमागे देवासारखा गप्प बसून राहिलो.

जोशी मास्तर रोजच फळ्यावर काहीना काही लिहायचे. एकदा त्यांनी लिहिलं 'कमल हरण बघ' माझं मनच त्या दगडी शाळेच्या दगडांच्या भिंतीत रमत नव्हतं. माझ्या रानात हरवलेल्या मनाला कसलं दिसतंय हरण. दोन-तीन महिने रडत-पडत कसे तरी निघून गेले. दरम्यान, शेजारी बसणाऱ्या मुलांशी माझी मैत्री झाली. माळवाड्यातली म्हणजे माझ्याच गल्लीमधली काही पोरं दुसरी-तिसरीच्या वर्गात शिकत होती. मधल्या सुटीमध्ये त्यांची भेट मैदानावर झाली की, तिथंच दुपारची शाळा सुटल्यावर बंधाऱ्यावर पोहायला जाण्याचे, कुणाचे सीताफळं-

जांभळं चोरायचे याचे बेत आखले जायचे. एकदा असं काही तरी करण्याचा बेत ठरला की, माझं मग मास्तरांच्या शिकविण्याकडं लक्ष लागायचं नाही. समोरच्या काळ्याभोर फळ्याकडं पाहता पाहता मला नामू वटाण्याची काळ्याभोर जांभळांनी लहडलेली जांभूळ दिसायची. माझं लक्ष नाही हे जोशी मास्तरांच्या लक्षात आल्यावर ते हटकून मलाच प्रश्न विचारायचे. माझी त-त-प-प झाली की, पिसटं धरून कोंबडी उचलावी तशी माझी मान धरून मला फळ्यासमोर आणून उभं करायचे. रागातच उत्तर विचारायचे. मला सांगता नाही आलं की, दाणदिशी फळ्यावर माझं डोकं आपटायचे. त्यानं मला गरगरल्यासारखं वाटायचं. जोशी मास्तरला वाटायचं, याचं डोकं फळ्यावर आपटलं म्हणजे याच्या डोक्यात उजेड पडेल, पण माझ्या डोळ्यापुढं मात्र अंधार पसरायचा. दगडी शाळेच्या व्हरांड्यामधून तासा-अर्ध्या तासाने एक काळा कोट घातलेले मास्तर हातात रूळ घेऊन फिरताना दिसायचे. मला मित्रांकडून समजलं की, ते शाळेचे मुख्याध्यापक तेली गुरुजी होते. त्यांचा स्वभाव भलताच कडक आणि तापट. आम्ही मुलंच काय, पण सगळेच मास्तर त्यांना पाहिलं तरी चळाचळा कापायचे. त्यांच्या नजरेला नजर भिडविण्याची कुणात हिंमत नव्हती. पांढरंशुभ्र मसरईचं धोतर, तसाच सदरा, डोक्यावर काळी टोपी, अंगात कोट. तोही काळ्या रंगाचा. पायात वहाणा, चालताना कराऽऽकरा वाजायच्या. चेहऱ्यावर करारीपणा. मास्तर असूनही त्यांना जराही वागण्याचं भान नव्हतं. खुशाल मुलांदेखत, मैदानावर, कार्यालयात सटासट विड्या फुसकालून धूर काढायचे. विडीचा बंडल कायमचा त्यांच्या टेबलावर नंगट माणसासारखा बसून असायचा. हजेरी बुकावर सही करण्यासाठी आलेले मास्तर विडी बंडलाकडं न पाहताच खाली मान घालून सही करायचे आणि आपलंच काहीतरी चुकलंय अशा अपराधी चेहऱ्याने वर्गात जायचे. गावात तशी सातवी इयत्तेपर्यंत शाळा होती. दगडी शाळेच्या त्या चार खोल्यांमध्ये पहिली ते चौथीपर्यंतची मुलं बसायची तर पाचवी-सहावीचा वर्ग वेशीजवळच्या चावडीत भरायचा. सातवीचा वर्ग मात्र देवळाच्या माडीवर भरायचा. पण शाळेचं सगळं कामकाज चालायचं ते दगडी शाळेतूनच. चौथीच्या वर्गातल्या एका कोपऱ्यात लाल रंगाच्या पडद्याचा आडोसा करून

मुख्याध्यापक कार्यालय थाटलं होतं. भिंतीवर राष्ट्रीय पुरुषांचे चार-सहा फोटो, तासातासाला टोल देणारं एक आयताकृती लाकडांच्या फ्रेममधलं घड्याळ. एक टेबल-खुर्ची. भिंतीला लागून ओळीत मांडून ठेवलेल्या आठ-दहा खुर्च्या. पडद्याला खेटून आपल्या पोटात शाळेचं जुनं बाड दडवून बसलेल्या दोन-तीन लाकडी पेट्या. एवढंच काय ते मुख्याध्यापक कार्यालयाचं वैभव. तेली गुरुजी शिकविताना कधी दिसायचे नाही. त्यांचा बराच वेळ ते कार्यालयात बसूनच घालवत. हातात एक-दीड फूट लांबीचा गोल गरगरीत रूळ घेऊन तेली मास्तर प्रत्येक वर्गासमोरून तांबारलेल्या डोळ्यांनी पाहत फिरायचे. तेव्हा ते मला इतिहासातील मावळ्यांसारखे लढाईला निघाल्यासारखे भासायचे. त्यांना पाहताच गोंगाट करणारा वर्ग एकदम चिडीचूप व्हायचा. टाचणी पडली तरी आवाज होईल, अशी शांतता पसरायची. त्यांचं वागणं, पाहणं वाघासारखं असल्यानं इतर मास्तर त्यांच्यासमोर शेळीसारखे वागायचे. पण दिंडोरीहून कोणी साहेब आले तर हेच तेली गुरुजी त्यांच्यापुढे गरीब गाय व्हायचे. साहेबांच्या पुढंपुढं करायचे. त्यांच्यापुढे उकडलेल्या अंड्यांची भरलेली बशी ठेवायचे. पोलिसाला पाहताच चोरानं लपून बसावं तसा इतरवेळी राजरोस टेबलावर पडलेला विडीचा पुडा त्यांच्या कोटाच्या खिशात दडून बसायचा. दिवसभर विड्या फुसकलणारे मास्तर दिवसभरात एकही विडी ओढायला न मिळाल्याने अस्वस्थ व्हायचे.

दगडी शाळेतली जोशी मास्तरांकडून चाललेली आमची ढोरबडव काही केल्या थांबत नव्हती. घरी तक्रार करून उपयोग होत नव्हता. आम्हा मुलांचं कुणी मनावर घेत नव्हतं. मला शाळेत जायलाच आवडायचं नाही. घरी, रानात काही कामाच्या निमित्ताने तर कधी डोकेदुखीचं कारण सांगून शाळेत जाऊन डोकेफोड करून घेण्यापेक्षा घरीच राहून घेत होतो. पण जोशी मास्तर महावस्ताद. मी वर्गात नाही, असं त्याच्या लक्षात येताच 'जारे, त्या विजय मिठेला घेऊन या' मुलंही जणू या हुकमाचीच वाट पाहत बसलेले. जा म्हणाले की, एकाला चारजण माळवाड्याच्या दिशेने सुटायचे. रानमांजर धरण्यासाठी वडाऱ्याच्या कुत्र्याने उसात घुसावं तसे शाळेतून आलेले हे चौघं सरळ माझ्या घरात घुसायचे. दोघंजण माझे हात धरायचे, दोघेजण पाय धरायचे आणि माझी उचलबांगडी

करायचे. त्यांच्या हातून सुटण्यासाठी मी रडायचो, चावायचो, शिव्या द्यायचो. पण आलेली पोरं भलतीच हट्टाला पेटलेली असायची. सरळ मला मास्तरासमोर आल्यावरच सोडायचे आणि आपल्या जागेवर दम छाटीत बसायचे. कधी एकदाचे मास्तर याला बडवतात, याकडे डोळे लावून पहायचे. मास्तर माझा कान पिरगाळून 'शाळेत का आला नाही?' याचं कारण विचारायचे. कारण पटलं तर पाठीत एक रपाटा घालून वर्गात बसायला सांगायचे, असं झालं म्हणजे उचलबांगडी करून आणलेल्या पोरांचा हिरमोड व्हायचा. त्यांना आपली सगळी मेहनत वाया गेल्यासारखं वाटायचं. दगडी शाळा जरी गावाच्या बाहेर होती, तरी सार्वजनिक कार्यक्रमासाठी गावातील ती मुख्य जागा होती. मोठे मैदान होते. पाण्याची सोय होती. गावातल्या श्रीमंतांच्या मुलींची लग्नं त्याच शाळेसमोर होत होती. ग्रामगौरवासारखा कार्यक्रम असो किंवा सांस्कृतिक कार्यक्रम दगडी शाळेतच होतं. अशा कार्यक्रमांना जाण्यासाठी मात्र मला दगडी शाळेत जायला आवडायचं. एरव्ही ती मला नकोशी वाटायची. कोंडून ठेवल्यासारखं वाटायचं. आणि एक दिवस जादुगारानं जादूची कांडी फिरवून चमत्कार करावा, तसं झालं आणि बघता बघता मला दगडी शाळा आवडू लागली. जोशी गुरुजींची बदली झाली आणि ठुबे गुरुजी आले. आमचा वर्ग त्यांच्या ताब्यात दिला. ठुबे गुरुजींचं शिकवणं मला समजू लागलं, आवडू लागलं. जोशी गुरुजींनी फळ्यावर आपटून आपटून बधीर केलेलं माझं डोकं आता बऱ्यापैकी चालायला लागलं. ठुबे गुरुजी कविता समजावून सांगायचे तेव्हा तर आपण शाळेत नाही, रानातच फिरत आहोत, असा भास व्हायचा. शेतमळा, माती, पशुपक्षी, निसर्ग हे तर माझ्या आवडीचे विषय. पाठ्यपुस्तकातही कविता शेतमळ्याचीच होती....

**शेत माऊली अमुच्यासाठी अम्ही तिची लेकरे**
**अम्हाला कमी कोणते बरे?**
**उजाडता दिन खावा भाजुन रोज तुरीचा हुळा**
**जरा का जठराग्नी कावला**
**माघातिल चवदार हरभरा ऐन रकाण्यावरी**
**थोडकी मजा दे तरी**

**खुडुनी मुगाच्या शेंगा कधि कोवळ्या**
**जाता येता खाव्या पाटातल्या**
**गुळचट शेंगा चवळीच्या वा जरठ पोपटी भल्या**
**लागती भाजुनि किती चांगल्या**
**तोडावी कधी बोरे, काटे काठीने दाबुनी**
**हिंडता काष्टी रानी वनी**
**मध चाखावा गोड मोहळा वरच्या वर झाडुनी**
**फिरकता दाट चिलाटीतुनी**
**किती सेवावी जंगलच्या या मेव्याची माधुरी**
**फळे तशी खावी ती कितीतरी.**

शेतमाऊलीमध्ये पिकणारा हरभरा, चवळीच्या शेंगा, मुगाच्या शेंगा, बोरे, गोड मधाळ पोळं, हुरडा, हुळा, शेतमळ्यातल्या या सगळ्या वैभवातच तर माझा जीव अडकून पडला होता. ते सगळंच वैभव पुस्तकातून शाळेत अवतरलं. ठुबे गुरुजींनी आपल्या रसाळ वाणीने आख्खा शेतमळाच शाळेत आणून बसवल्यासारखं वाटल्यानं शाळा दगडी असली तरी मला दगडी शाळेचा लळा कधी लागला, हे कळलंच नाही. दगडातही चैतन्य भरल्यासारखं झालं. स्वत:च्या मनाने मी शाळेभोवतीच्या डिडोन्याला पाणी घालू लागलो. वर्गखोली सारवण्यासाठी रस्त्यानं शेण गोळा करीत फिरू लागलो. चौथीतून पाचवीत गेल्याचा,पास झाल्याचा आनंद मनात होताच, पण मनात हळहळ आणि हुरहूर होती. दगडी शाळा सोडून मला चावडीतल्या शाळेत जावं लागणार होतं. आई दूर गावी गेल्यावर आपल्याला चुकल्यासारखं वाटावं, तसं मला दगडी शाळेबद्दल वाटत होतं. तिच्यापासून आता आपण दुरावणार या भावनेनं मनात काहूर दाटलं होतं. नवीन पुस्तक, नवीन वर्ग, मास्तर तेच, वर्गातले मित्रही तेच. असं असूनही चावडीतल्या शाळेत माझं मन रमत नव्हतं. पाखरू झालेलं मन क्षणाक्षणाला दगडी शाळेत जाऊन बसत होतं. दगडी शाळेतून काही आणायचं-पोहोचवायचं असलं की, या कामासाठी मी आघाडीवर असायचो. कोणत्याही निमित्ताने दगडी शाळेत जायला मिळायचं, याचाच आनंद मला जास्त असायचा. चांगली माणसं

आपल्या गोड वागण्या-बोलण्यानं माणसांना आपलंसं करतात. रानातले पशुपक्षी आपल्या रूपानं-गुणानं माणसांशी जिव्हाळ्यानं जोडली जातात. पण दगडाच्या निर्जीव भिंतीच्या या दगडी शाळेनं मला ज्ञानाचा लळा लावला. इथंच मी लिहिणं-वाचणं शिकलो. गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु । गुरुर्देवो महेश्वरा । गुरू: साक्षात् परब्रह्म । तस्मै श्री गुरुवै नम: ॥ या सगळ्यांपुढं नतमस्तक होण्याचे धडे मला दगडी शाळेतच मिळाले. नम्रता, सद्विचार, साहित्य, संस्कृती, संस्कार याचे सगळे संस्कार दगडी शाळेतच माझ्यावर झाले. माझं डोकं याच दगडी शाळेच्या भिंतीवर आपटून आपटून मास्तरांनी माझ्यातल्या दगडाला जागवलं. लिहितं, बोलतं केलं. मला ज्ञानाची दिव्य दृष्टी दिली ती याच दगडी शाळेनं. माणसाला दृष्ट लागावी तशी गावाला आणि दगडी शाळेला कुणाची तरी दृष्ट लागली. नदीवर धरण झालं. गावावर उठनकळा आली. नव्या जागेत दूर टेकडीवर नवीन गाव वसलं. जुन्या गावातून जे जे काही नेण्यासारखं होतं ते सगळं माणसांनी नवीन गावात आणलं. माझ्या मोठ्या चुलत्याच्या आग्रहामुळं आमच्या घराचा एक मोठा घडीव दगड चार-सहाजणांनी उचलून बैलगाडीत टाकून नवीन गावात आणला. चुलत्याच्या या वेडाला आम्ही त्यावेळी सगळेजण हसलो. पण आता मला कळतंय, त्याचा तो शहाणपणा होता. अजूनही संध्याकाळ झाली की, माझा चुलता ओट्यावर ठेवलेल्या त्या घडीव दगडाला पाठ लावून बसतो, डोळे मिटतो. त्याला आठवत जातं सगळं गाव. सांगत राहतो तो आपल्या नातवांना जुन्या गावाच्या, घराच्या गोष्टी. मनोमन सुखावत जातो, जुन्या स्मृतींना उजाळा देताना. माझ्याही मनामध्ये एक खंत आहे ती मला नेहमीच अस्वस्थ करते. आज लेखक, कवी म्हणून मला जो मान-सन्मान मिळतो आहे याचं खरं श्रेय त्या दगडी शाळेला आहे. खंत याची आहे, आज माझ्याकडे दगडी शाळेची चिमूटभर माती नाही की एखादा दगड नाही. चुलत्यानं घराचा दगड आणण्याचा वेडेपणा केला तसा मीही दगडी शाळेचा दगड आणून केला असता तर? त्या दगडावर माथा टेकून मला दगडी शाळेला वंदन तरी करता आलं असतं!

**



# काळ्या ढगाच्या कडा रुपेरी

पावसाचे दिवस. आठ दिवसांआधी मृगाचा पाऊस पडून गेलेला. मातीचं चिंब चिंब भिजणं. वातावरणात सुगंध भरून राहिलेला. दुपार झालेली. मी खिडकीपाशी उभा. नजरेची पाखरं झालेली. पाखरं आभाळभर भिरभिरली. निळ्या नभाच्या अंगणात पांढऱ्या ढगांनी खो-खोचा डाव मांडलेला. क्षितिजावर काही राखाडी रंगाचे ढग त्यांची गंमत पहात उभे असलेले. निळ्या नभाच्या माथ्यावरल्या त्या काळ्या ढगाने माझे लक्ष वेधून घेतले. पांढऱ्या स्वच्छ कागदावर शाईचा काळा ठिपका दिसावा तसे काळ्या ढगाचे अस्तित्व नजरेत भरणारे. बैलगाडीच्या चाकाएवढ्या आकाराचा. त्याने सूर्यालाही झाकून टाकलेलं. दूध उतू जावं तसा काळ्या ढगाच्या किनारीनं प्रकाश उतू चाललेला. प्रकाशाने त्याच्या कडा तांबूस रुपेरी झालेल्या. मनास मोहित करणाऱ्या. धरतीवरही त्याच्या सावलीची दाट साय पसरलेली.

नजरेची पाखरं अलगद धरतीवर उतरलेली. नदीकडेच्या बाजूने हिरवे राघू पंख पसरत झाडांच्या दिशेने गेलेले. वारा आळसावल्यागत बसलेला. उष्णतेने जीव घुसमटू लागलेला. अंगाला घामाचा पाझर फुटलेला. रानात माणसांची

ढोरमेहनत चाललेली. औत फाटच्यामागं पावलांची भिंगरी झालेली ढोरं दमी भरलेली.

नजरेची पाखरं पुन्हा आभाळात पांगली. तो काळा ढग अजूनही तिथेच एखाद्या रखवालदारासारखा उभा. त्या काळ्या ढगाच्या कडा रुपेरी. त्याच्या रुपाकडं पाहून, मला वाईट करणी करणाऱ्या वाईट वर्तनाच्या माणसांची आठवण झालेली. समाजात काही माणसं अशी असतातच. काळ्या ढगासारखी. चांगल्या विचारांना रोखणारी. समाजाला त्रास देणारी. चांगल्याचा मार्ग रोखणारी. काळ्या ढगांच्या काळ्या रंगाला पाहून पांढरे ढग हसू लागलेले. तो चिडलेला. क्षणभर सूर्याभोवती स्थिरावलेला तो, डांबर वितळावं तसा वितळत गेला. पसरत पांगत पांढऱ्या ढगाजवळ पोहोचला. इतका वेळ आळसावून सूस्त पडलेला वारा अवखळपणाने घोंगावू लागला. तसाच नभात झेपावला. पांढऱ्या ढगांची पळापळ सुरू. कुत्रं पाठी लागल्यागत काळा ढग त्यांच्यामागे धावू लागलेला. प्रत्येक पांढऱ्या ढगांना पकडून त्यांची तोंडं काळी करू लागलेला. पांढऱ्या ढगावर कोणी काळ्या शाईची दौत उपडी करावी तसं काळ्या ढगाने आपल्या करणीनं आभाळ काळंठिक्कर केलेलं. पूर्वेकडून पाणवारा सुटलेला. हवेत गारवा भरला. काळ्या ढगांच्या घागरी आभाळात लोंबकळू लागल्या. धरतीवरले सजीव त्या जलधारांसाठी आसुसलेले. तहानेले झालेले. त्या ओथंबून आलेल्या आभाळाकडं पाहून माझ्या मनात निसर्गकवी ना. धों. महानोरांच्या ओळी रुंजी घालू लागलेल्या-

**'घन ओथंबून येती । बनात राघू घिरती ।**

आभाळात ढगांच्या काळ्या लाटा उसळू लागल्या. गावगवात्री निघालेल्या आईमागं पोरानं थयथयाट करावा, तसा वारा धरतीभोवती धिंगाणा घालू लागला. माझ्या अंगणातल्या केळी घुमणाऱ्या बाईगत पानं हलवून मागे पुढे झुलू लागल्या. झाडांचे शेंडे नाच्यागत नाचू लागले. विजेचा आसूड ढगांच्या पाठीवर कडाडला. ढगांचा जीवघेणा गडगडाट. धरतीलाही त्या आवाजानं कापरं भरलं. माणसं, जनावरं घरओढीनं निवाऱ्याच्या दिशेने पळू लागलेली. निसर्गाची ही अद्भूत किमया पाहून मी भारावून गेलेलो. माझ्यातल्या काव्य प्रतिभेला जाग आलेली. त्या काळ्या ढगाच्या रुपेरी कडा पाहून शब्दांनीही कवितेचं रूप धारण केलेलं-

**निळ्या नभाच्या माथ्यावरती काळ्या ढगाच्या कडा रुपेरी**
**मनास माझ्या मोहीत करती तांबूस त्याच्या कडा किनारी ।।१।।**
**स्थिरावला तो एका ठायी सूर्यालाही देत अंधारी**
**सूर्याच्या त्या दाहकतेने झळा लागल्या त्याच्या जिव्हारी ।।२।।**
**पाहून त्याच्या रुपास रडव्या शुभ्र ढगांच्या हास्य लकेरी**
**कुठून आला अवचित वारा ठुमकत नाचत नाच मयुरी ।।३।।**
**काळा काळा रंग ढगांना रंगवून देई कुणी रंगारी**
**क्षणात भरती नभात तरती थंडाव्याच्या गार घागरी ।।४।।**
**वाजत गर्जत नभ मंडपी वरुणाची मग आली स्वारी**
**अधीर देवता ढगामधुनी उधळी अक्षदा भर दुपारी ।।५।।**

जीवन अमृताच्या पखाली वाहणारा, सजीवांना चैतन्य देणारा काळा ढग. स्वत:ला सूर्यासमोर उभं राहून वितळवून घेणारा, आपल्या जवळचे जलघट पांढऱ्या ढगांना देणारा आणि पाऊस गाणं गात-गात थेंबाथेंबानी धरतीवर बरसणारा काळा ढग. त्याला पाहून कवीच्या आणि लेखकाच्या प्रतिभेलाही जाग येते. आणि तेही त्याचंच गुणगाण गाऊ लागतात. समाजात अनेक प्रकारची, चांगल्या वाईट प्रवृत्तीची माणसं आपल्याला भेटत असतात. जसा काळा ढग आपल्या जवळचे जलघट सजीवांच्या चैतन्यासाठी त्यांना जीवनदान देण्यासाठी वापरतो. तसाच एखादा माणूस आपल्या विचारांनी समाजाला योग्य दिशा देण्याचं काम करीत असतो. वाईटातून चांगलं घ्यावं, वाईट सोडून द्यावं. चंद्रप्रकाशात फिरताना आपण चंद्राचा शीतल प्रकाश अनुभवत असतो. त्याच्यावर असलेल्या डागांची मोजदाद करण्याचा वेडेपणा करीत नाही. माणसाच्या दुर्गुणाकडे दुर्लक्ष करून त्याच्या सद्गुणांचा विचार केला तर अशा माणसाचे आयुष्य, त्याचे जगणेही आपल्याला रुपेरी वाटते. काळ्या ढगांच्या कडा रुपेरी असल्यासारखे!

**



# म्हातारपण लपता लपेना!

एकदा असाच सकाळी सकाळी भाजी बाजारात गेलो तर तिथं गंमतच झाली. भाजी बाजारातून चांगली ताजी टवटवीत भाजी घ्यावी म्हणून बाजारात भाजी न्याहाळताना केस पिकलेली, वयाची साठी उलटलेली, चेहऱ्याचा पार सुरकुटलेला आंबा झालेली एक भाजी विकणारी आजीबाई मला म्हणाली, 'ए बाबा! अरे वांगे घेऊन जाय, चांगले ताजे हायेत.' मी दचकलोच. मी? आणि बाबा? कसं शक्य आहे. छे, छे. मला कसं म्हणेल. दुसरं कोणाला तरी बोलली असणार. मी माझ्या आजूबाजूला पाहिलं. पण माझ्याशिवाय तिथं दुसरं गिऱ्हाईक नव्हतं. दिवसभराचा शीणभाग घालविण्यासाठी आजीबाईनं विनोद केला असणार, अशी मनाची समजूत काढीत असतानाच माझी गोंधळलेली अवस्था पाहून ती पुन्हा म्हणाली, 'असा बावचाळल्यावानी काय पहातोस बाबा? मी तुलाच म्हणतेय.' तिचं ते ठणकावून बोलणं मला अजिबात आवडलं नाही. भयंकर रागच आला तिचा. पण तिच्या पाटीतल्या ताज्या वांग्यापुढं माझा नाईलाज झाला आणि मी वांगी निवडण्यासाठी खाली वाकलो. तिला हिणवावं म्हणून टिंगलीनं बोललो, 'आजीबाई वांगी ताजीच आहेत ना?' हातातला तराजू

काटा सावरीत ती काहीशा रागानेच बोलली, 'चांगला मोरा म्हातारा दिसतोस की रं बाबा, अन् तुला अजून वांगे ताजे हाय का शिळे हाये हे समजत नायी. एवढा कसा येडबंबू?' वांगी निवडताना वांग्याचा काटा बोटाला टोचावा तसं तिचं बोलणं माझ्या जिव्हारी लागलं. ती जरा आगाऊच वाटली. तिच्याशी अधिक बोलणं टाळून वांग्याचे पैसे तिच्या हातावर टेकवले आणि मी तडक घराचा रस्ता धरला. मन अस्वस्थ झालं होतं. खरंच, आपण म्हातारे झालो का? म्हातारपणाची लक्षणं आपल्यात दिसू लागली का? असल्या प्रश्नांनी मनाला घेराव घातला. कधी एकदाचा घरी जातो असं झालं होतं.

घरात आल्याबरोबर बाजारची पिशवी बायकोपुढं उभ्यानंच टाकली आणि बैठकीतल्या आरशासमोर जाऊन उभा राहिलो. कावळ्यासारखी तिरपी हिरपी मान करून आरशातलं स्वत:चं प्रतिबिंब न्याहाळू लागलो, माझ्याच शरीराचा मला अभिमान वाटू लागला. एखाद्या पोलादाच्या कांबीसारखा मजबूत देह दिसत होता माझा. नाही म्हणायला थोडंसं पोट पुढं आलं होतं, पण ते माझ्या उंचीला शोभून दिसत होतं. गाल मात्र टोमॅटोसारखे गुबगुबीत आणि लालबूंद दिसत होते. त्यावर किंवा उभ्या देहावर एकही सुरकुती दिसत नव्हती. माझ्या वयानं जरी पन्नाशी गाठली होती, तरीही मी पन्नाशीत आलोय हे कोणाच्याही लक्षात येत नव्हतं. एवढी मी शरीराची योग्य देखभाल ठेवली होती. मग ही भाजीवालीच आपल्याला बाबा का म्हणाली? तिला आपल्यात म्हातारपणाचं कोणतं लक्षण दिसलं? मी अधिकच बारकाईनं स्वत:ला न्याहाळू लागलो. आणि दचकलोच. म्हातारपणाचं प्रमुख लक्षण मला डोकावताना दिसलं. ते माझ्या डोक्यावर बसून मला वाकुल्या दाखवतंय असं भासू लागलं. झाडाच्या बुंध्याला चुना माखवावा तसा डोक्यावरच्या काही केसांनी पांढरा रंग धरला होता. केसांनी सरळ सरळ माझ्याशी दगलबाजी केली होती. मी वेंगाडून त्यांच्याकडं पाहिलं तर दातांच्या खालच्या फणीतल्या दातांमध्ये फटी पडल्याचे माझ्या लक्षात आले. वरचे दोन दर्शनी दातदेखील झिजले होते. मिशांमध्येही कुठं कुठं खसखस सांडल्यासारखं वाटत होतं. कंगव्याच्या दातांनी मी डोक्यावरचे केस विंचरून पाहिले तर मधूनच कंगवा एकदम सटकू लागला. मी पुन्हा पुन्हा केस विंचरले तर कंगवा त्या

ठिकाणावरून सटकायचाच. मग मी उत्सुकतेनं भिंतीवर टांगलेला छोटा आरसा काढला आणि समोरच्या आरशासमोर उभं राहून छोटा आरसा डोक्याच्या पाठीमागे धरला. समोरच्या आरशातलं प्रतिबिंब पाहून मन धास्तावलच. चांगलं फुलपात्राच्या आकाराचं डोक्याच्या मध्यावर टक्कल पडलं होतं. आजूबाजूचे केसही विरळ दिसत होते. हे बदल आपल्या लक्षात कसे आले नाहीत, याचा विचार करीत असतानाच बायको बैठकीत येताना म्हणाली, 'काय हो! म्हातारपणात कसला हा म्हातारचळ भरलाय म्हणते मी? आरशासमोर उभं राहून नटण्या-थटण्याचे दिवस संपलेत आपले. आता पोरासोरांना नटू द्या.' मी काही न बोलता एकटक तिच्याकडेच पाहू लागलो. तेव्हा ती 'हूँ!' असा तुच्छतादर्शक सुस्कारा सोडून स्वयंपाकघरात गेली. मी पुन्हा पुन्हा आरशात डोक्यावरचं टक्कल टक लावून न्याहाळू लागलो. आजूबाजूचे घनदाट केस कंगव्यानं टकलावर हळूवार पसरवून टक्कल झाकू लागलो. एखाद्यानं भर पावसाळ्यात आपल्या घराचं गळकं छप्पर सावरावं तसं करू लागलो, पण टक्कल झाकलं जाईना. काहीएक न करता जर आपण गप्प बसून राहिलो तर थोड्याच दिवसात आपण जख्खड म्हाताऱ्यासारखं दिसायला लागू. काहीतरी उपाय आणि तेही तातडीनं करणे गरजेचे होते. माझी पावलं विनायक न्हाव्याच्या सलूनकडे झपाझप चालू लागली.

माझ्या सुदैवाने आणि विनायक न्हाव्याच्या दुर्दैवाने त्याच्या सलूनमध्ये दुपारच्या वेळेस एकही गिऱ्हाईक नव्हतं. तो बाकड्यावर हातपाय पसरून रस्त्याकडं डोळे लावून बसला होता. मला पहाताच त्याला आनंद झाला. स्वत:ला सावरून बसत तो म्हणाला, 'या या कुमार, बसा. काय कटिंग करू का दाढी?'

'काळं कर' मी खुर्चीवर बसताना बोललो.

'काऽय? आता कुठं काळं करू?' विनायक

'अरे माझं डोकं काळं कर. म्हणजे माझे केस काळ्या मेहंदीनं रंगवून दे.' मी जरा चढ्या आवाजातच बोललो.

त्यानं आपलं हसू ओठात दडवून वाटीत काळ्या मेहंदीची पुडी भिजत घातली. एका लांबरुंद फडक्यानं माझं अंग झाकून घेतलं आणि भिजलेल्या

मेहंदीचा ब्रश तो माझ्या केसांवरून हळूवारपणे फिरवू लागला. आधीच विरळ असलेल्या माझ्या केसांना नीट मेहंदी लागेना. मग मात्र त्याने दिवाळीत घराच्या भिंती ब्रशाने भराभर रंगवाव्या तसे माझे केस रंगवायला सुरुवात केली. असं केल्यानं माझे टक्कलही रंग धरू लागले. सुरुवातीला मला गारगार वाटले, पण नंतर टकलाला खाज सुटू लागली. तरुण दिसण्यासाठी थोडासा त्रास सहन करणे भागच होते. मिशा रंगवून झाल्या आणि दुकानात दुसरं गिऱ्हाईक आलं. तेव्हा माझी सुटका झाली.

रस्त्यानं जाताना ओळखीची, पांढऱ्या केसांची कितीतरी माणसं मला भेटली, पण एकानेही मला ओळखलं नाही. त्यांच्या पांढऱ्या केसांकडे पाहून मी स्वत:शीच पुटपुटलो, 'म्हातारे लेकाचे!' माझ्या डोक्यावरचे केस वाळून आता कडक झाले होते. डोकं जड जड वाटत होतं. टकलाची थोडीशी आग आग होत होती.

मी घरात पाऊल टाकलं आणि दाराशी आलेल्या बहुरुप्याकडं पहावं, तशी बायको अन् पोरं माझ्याकडं नजरभरून पाहू लागली. बायको आपली नेहमीसारखी तणतणलीच. 'काय हो? डोकं काळं केलं तर केलं, ओठावरच्या मिशा कशासाठी काळ्या केल्या?'यावर ऐकलं न ऐकलं करून मी सरळ बैठकीच्या खोलीत गेलो. हिला बोलायला काय लागतंय? पांढऱ्या केसांचं दु:ख तिला काय कळणार? कळ काढ, कळेल तुला ही चार दोन वर्षात. पण जाऊ द्या, बायकोचं बोलणं फारसं मनावर घ्यायचं नसतं, म्हणून तिच्या बोलण्याकडं दुर्लक्ष केलं.

सायंकाळी वाचनालयात गेलो तर गणपतराव चष्मा नाकावर ओढून माझ्या डोक्याकडे गोंधळलेल्या नजरेने पहातच राहिले. ते काही बोलायच्या आतच मी म्हणालो, 'केस का रंगवले असंच विचारायचं आहे ना तुम्हाला?'

'तेच म्हणतो मी. आता या वयात केस काळे करण्याची दुर्बुद्धी का आठवली तुम्हाला.' गणपतराव नाकावरचा चष्मा डोळ्यावर सरकवून म्हणाले. 'काय बोलता गणपतराव, अहो, या वयात केस नाही काळे करायचे तर काय तरुण वयात करायचे?' मी काहीसा संतापून बोललो.

'संतापू नका कुमार. पण खरं सागतो. डोक्याचे केस काळे केले इथपर्यंत ठीक आहे. पण मिशा रंगवल्यामुळं तुम्ही म्हणजे अगदी हुबेहूब पिकात उभं केलेल्या बुजगावण्यासारखे दिसता'. आणि ते तोंडाचं बोळकं वासून खो खो हसू लागले. 'गणपतराव, यात हसण्यासारखं काय आहे. मी केलं ते योग्यच केलं. अहो मला शाळा-कॉलेजात व्याख्यानासाठी जावं लागतं. तुमचं काय इथून उठले की घर आणि घराकडून वाचनालयात.' मी उपहासानं पण रोखठोक बोललो. गणपतराव खजील झाले आणि वर्तमानपत्रात तोंड दडवून वाचू लागले. फुकटचा सल्ला देणाराचं काय जातंय? काळ्या केसांमुळे मी अधिकच तरुण रुबाबदार दिसत होतो आणि नेमकं हेच तरुणपण अनेकांच्या डोळ्यात खुपत होतं.

एक दिवस मुद्दामच भाजी बाजारात फेरफटका मारला. मला बाबा म्हणणाऱ्या भाजीवाल्या आजीसमोरून पुढे जाऊ लागलो, तर माझ्याकडे पाहून ती म्हणाली, 'आवो काका, बटाटे घेऊन जा ना!' मला खूपच आनंद झाला. बाबाचा एकदम काका झालो. ही किमया काळ्या केसांची होती. तिच्याकडून भाजी न घेताच एखाद्या तरुणाने केसांना झटके देत चालावं तसा मी डोक्यावरच्या विरळ केसांना वरचेवर झुलवीत मस्तीतच घराकडे आलो.

आठ दिवस झाले नाही तोच ओठावरच्या मिशा तळातून पांढऱ्या दिसू लागल्या. पुन्हा मिशा काळ्या करण्यापेक्षा त्या सरळ काढूनच टाकाव्यात म्हणजे कायमचा प्रश्न मिटेल, या विचाराने दाढी करतेवेळी मिशाही काढून टाकल्या. आता तर मी अगदीच तरुण दिसू लागलो. बैठकीत लावलेला माझा विशीतला फोटो आणि आत्ताच्या चेहऱ्यात बरंच साम्य दिसू लागलं. आनंदानं शीळ वाजवत असतानाच बायको समोर आली. माझं नवं रूप पाहून बावरली, हसली आणि म्हणाली, 'सायंकाळी येताना एक गाऊन घेऊन या.'

'काऽय गाऊन? अगं, नऊवारी नेसणारी तू. तुला कशाला पाहिजे या वयात गाऊन?' मी मिशा काढलेल्या ओठावरून हात फिरवीत म्हणालो.

'माझ्यासाठी नाही काही. तुमच्यासाठी म्हणते मी. खरंच गाऊन घातल्यावर तुम्ही अगदी बाईसारखे दिसाल.' तिचं हे वरून साळसूदपणाचं वाटणारं पण

खोचक बोलणं मला कळत होतं. पण 'शहाण्याशी एक बात आणि मूर्खाशी सारी रात.'अशा विचाराने मी गप्प बसलो.

सकाळी उठल्याबरोबर दाढी करणे हा माझा नित्याचाच उद्योग झाला. याच्याआधी मी चार चार दिवस दाढी करायचो नाही, पण आता एक दिवस जरी दाढी केली नाही तर दाढीचे पांढरे खुंट दिसू लागत. उगवलेले ते खुंट खसखस पसरविल्यासारखे दिसत आणि चेहरा अनारशासारखा दिसू लागे. तशात रोज ब्लेडपानाचा, साबणाचा, क्रीमचा, लोशनचा खर्चही वाढला. डोक्यावरच्या केसांचं मात्र बरं होतं. एकदा काळे केले की, ते महिनाभर तरी आपला मूळ पांढरा अवतार धारण करीत नव्हते.

वारंवार केस काळे करण्याने म्हणा किंवा वय वाढल्याने म्हणा, आता केसांनी संपूर्ण पांढरेपणा धरला होता. टकलाला खाज सुटून ते खाजविल्याने जखमा झाल्या होत्या. त्यातून चिकट पांढरा, पातळ द्रव खडकाला पाझर लागल्यागत झिरपत होता. वेळेचा अपव्यय, पैशाची उधळण, शारीरिक त्रास हा सगळा उपद्व्याप आपण कशासाठी सहन करतो? केवळ तरुण दिसण्यासाठीच ना! अशा विचारात गुरफटलेलं मन केस काळे करावेत की नाही, अशा द्विधा स्थितीत असतानाच केस अर्धेअधिक पांढरे झाले. ओठावरही पांढऱ्या मिशांचे तुरे उभे राहिले. दरम्यान, एसटीने दूरचा प्रवास करण्याचा योग आला. माझ्या शेजारी एक तरुण मुलगी बसली होती. तिला आपला धक्का लागायला नको म्हणून मी पुरती काळजी घेत होतो. एसटीत भरपूर गर्दी होती. मी अधिकच अंग चोरून बसत होतो तर ती मुलगी अधिकच ऐसपैस बसत होती. माझ्या शेजारच्या सीटवर एक विवाहिता आणि काळे केस केलेला एक म्हातारा तरुण बसला होता. वर्तमानपत्र वाचताना मधूनमधून त्याच्या हातांचा धक्का त्या विवाहितेला लागत होता. तिने एकदा त्याच्याकडे रागाने पाहिलं, पण त्याच्या कृतीत काहीच फरक पडला नाही. तिनं त्याला एकदा-दोनदा समजही दिली, पण तरुणपणांचं भूत त्या म्हाताऱ्याच्या मानगुटीवर बसल्यानं त्याचं आपलं धक्कातंत्र सुरूच होतं. त्या विवाहितेच्या सहनशक्तीने परिसीमा गाठली आणि खाडकन तिने त्या म्हाताऱ्या तरुणाच्या थोबाडीत मारली. आजूबाजूचे प्रवासी हे पाहून आवाक् झाले. एकच

गोंधळ झाला. कंडक्टरने गाडी थांबवली. महिलेची छेड काढल्याच्या कारणावरून कंडक्टरने त्या म्हाताऱ्या पण तरुण दिसणाऱ्या प्रवाशाला खाली उतरवून दिले. गाडी पुढे निघाली. मी अधिकच अंग चोरून बसू लागलो, तशी माझ्या शेजारी बसलेली ती मुलगी गोड हसून म्हणाली, 'बाबा, एवढे संकोचता कशाला? मी तुमच्या मुलीसारखी आहे. अगदी आरामात मोकळंढाकळं बसा.' तिच्या या गोड बोलण्यानं मनावरचं दडपण क्षणात नाहीसं झालं आणि मी ऐसपैस बसलो.

आताशा मी केस काळे करण्याचा विचार मनातून कायमचा काढून टाकला आहे. शेवरीच्या कापसासारखे मऊ आणि पांढरेशुभ्र केस डोक्यावर छानपैकी वाढले आहेत. केसांच्या पांढरेपणामुळे माझ्या रूपाला एक भारदस्तपणा आला आहे. जिथं जावं तिथं लोक माझ्या प्रौढपणाचा आदर करू लागले आहेत. लोक माझ्याशी आदरानं बोलतात, सन्मानानं वागवतात. एसटीत, सभा संमेलनात स्वत: उभं राहून मला बसायला जागा देतात. हे सगळं मला पांढऱ्या केसांमुळे मिळालं आहे.

आता माझ्याच वयाची माणसं जेव्हा काळे केस करून आपलं म्हातारपण लपविण्याचा दुबळा प्रयत्न करतात, तेव्हा मला त्यांचं हसू येतं. निसर्गत:च सजीवांच्या शरीरात हे बदल घडत असतात, पण माणूस आपल्या अक्कल-हुशारीनं त्यावर मात करण्याचा प्रयत्न करतो. अगदी म्हातारपण लपविण्याचासुद्धा प्रयत्न करतो, पण असं करताना त्याचं अनेकदा हसं होतं, त्याच्याकडून मात्र काही केल्या म्हातारपण लपता लपत नाही. शेवटी काय, तर तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे, 'ठेविले अनंते तैसेची रहावे, चित्ती असू द्यावे समाधान.'

**



# संपत पाटलाचं गुऱ्हाळ

माळवाड्याच्या धसानं खाली उतरलं की, पायथ्याशी सुतारवड एखाद्या रखवालदारासारखा उभा असलेला दिसायचा. त्याच्या खालून जाणाऱ्या वाटानं चार-सहा कासरे पुढं गेलं म्हणजे हिवाळ्यात झुळझूळ वाहणारा गावओढा सापागत पसरलेला दिसायचा. कन्यादानाला बसलेल्या आईबापानं सासरी निघालेल्या लेकीचे पाय धुवावेत तसा तो गाववाटानं येणाऱ्या जाणाऱ्या माणसांचे पाय धुवायचा. स्वच्छ झालेली ओली पावलं ओढ्याची परसभर उंचीची चढण चढून सरळ गुऱ्हाळाजवळ येत. संपत पाटलाची नजरानजर झाली म्हणजे माणसं लाजत-बुजत आणि तिथंच रेंगाळत. खरं तर शेतामळ्याकडं जाणारा हमरस्ता मऱ्याईच्या देवळासमोरून जात होता आणि गुऱ्हाळापासून तो अवघा हाकेच्या अंतरावर होता. पण लोक मुद्दामच गूळ-रसाच्या आशेनं वाकडी वाट करून गुऱ्हाळाच्या वाटानं जा-ये करायचे. माणसांचे हे रंगढंग संपत पाटील चांगला वळखून होता. चुलांगनाच्या आजूबाजूला रेंगाळणारी माणसं पाहिली म्हणजे त्यांना तो हाक मारून बोलवायचा. आग्रहानं तांब्या तांब्या रस प्यायला द्यायचा. कढईत ओतलेला गरम गरम गूळ मनसोक्त खाऊ द्यायचा. पावसाळ्यात गोळा

होऊन बसलेलं गुऱ्हाळ हिवाळ्या-उन्हाळ्यात नुसतं नाचू लागायचं. गुऱ्हाळावर माणसांची जत्रा भरलेली असायची.

गावात काही एव्हढं एकच गुऱ्हाळ नव्हतं. तुकाराम पाटलांचंही एक गुऱ्हाळ होतं. पण तिथं मात्र फारशी गर्दी नसायची. तसा तर तुकाराम पाटीलही मन मोकळ्या स्वभावाचा माणूस. गूळ-रस खायला त्याचीही कुणाला मनाई नसायची. पण त्याचं गुऱ्हाळ गावापासून मैलभर लांब अंतरावर असल्याने लोकच जाण्याचा कंटाळा करायचे. दोन्ही गुऱ्हाळांच्या इंजिनाची मात्र रात्रन्‌दिवस जोडीनं टॉकटॉक चालू असायची. गुऱ्हाळावर रात्रपाळीचे मजूर वेगळे आणि दिवसपाळीचे मजूर वेगळे असायचे. प्रत्येकाच्या कामाची विभागणी गुऱ्हाळ सुरू केल्याच्या दिवसापासूनच केलेली असायची. त्यात सहसा खंड पडायचा नाही. चरकाजवळ उसाच्या मोळ्या आणून टाकणारे, चरकात ऊस घालणारे, परसभर उंचीच्या चुलांगनात लाकडं, उसाचं चिपाड फेकणारे, कढई उचलणारे, कढईतील रस हलवून गूळ बनविणारा गुळ्याबाबा मात्र एकटाच होता. लोखंडी कढईतून सिमेंटच्या कढईत ओतलेली साय सुकून भगराळी झाली म्हणजे बादलीत भरणारे आणि भरलेल्या बादल्या गुऱ्हाळाच्या खोलीत साठवणारे वेगळे. अशी सगळीच कामं वाटलेली, पण ज्या त्या वेळात बिनबोभाट पार पडायची. याला कारण म्हणजे संपत पाटील रात्रन्‌दिवस गुऱ्हाळावर ठाण मांडून बसलेला असायचा. गुन्हाळाजवळच एक मोठं भेंडीचं झाड होतं. त्याच्या सावलीत एक भला भक्कम सागवानी लाकडी पलंग होता. त्यावर बसूनच आख्या गुऱ्हाळावर संपत पाटलांची देखरेख चालायची. कामात कोणी आळमटळम करताना दिसला तर बसल्या जागेवरूनच तो ओरडायचा 'काय-काय, काय चाललंय' नुसत्या आवाजाच्या जरबेनं माणसं नीट कामाला लागायची.

गुऱ्हाळावरची माणसंच काय, पण सगळं गावच संपत पाटलाला चळचळा कापायचं. त्याचा दराराच तसा होता. भरभक्कम देहाचा आणि पहाडी आवाजाचा संपत पाटील स्वभावानं तामसी अन् सडेतोड होता. उणी गोष्ट आणि लांडीलबाडी त्याला बिलकूलच खपायची नाही आणि कुणी केलीच तर त्याची बुटानं 'पाठपूजा' केल्याशिवाय त्याला तो सोडायचा नाही. अशी पाठपूजा आठ-

पंधरा दिवसात कुणाची ना कुणाची व्हायचीच. ते पाहून गाव दबून वागायचं. चिनभिन व्हायचं. संपत पाटील गावचा गावकारभारी. आख्खं गावच त्यानं धारेवर धरलेलं. म्हणूनच गावाचा कारभार एका दोरीत चाललेला. तो देवळासमोरच्या पारावर बसलेला असला म्हणजे रस्त्यानं जाणारा-येणारा त्याच्या पुढून जाताना नजर खाली पाडून चालायचा. त्याच्या तांबारलेल्या डोळ्यांना नजर भिडवायची कुणाला हिंमत होत नव्हती. असं असलं तरी लोकांच्या मनात संपत पाटलाबद्दल आदर होता. गावाचा तो भाऊ होता. कुणी चुकला तर बुटानं मारायचा, पण एखाद्यानं चांगलं काम केलं तर सिगारेटचे झुरके मारून भसाभसा धूर सोडीत 'असं का, असं का हाऽऽहाऽऽ' असं म्हणायचा. ही त्याची आनंद व्यक्त करण्याची खास पद्धत होती. संपत पाटलाचं गुऱ्हाळ प्रत्येकाला आपलंच वाटायचं. जणू ते 'गावगुऱ्हाळच' झालं होतं.

माझ्या बालपणी दिवसभरातून दोन वेळा शाळा भरण्याचे ते दिवस होते. बरोबर सकाळची शाळा सुटायच्या वेळी आणि दुपारची शाळा सुटायच्या वेळीच गुळाच्या कढया उतरविल्या जायच्या. हा योगायोग होता की, संपत पाटलानंच मुद्दामहून तशी व्यवस्था केली होती कोण जाणे! पण घडायचं मात्र नित्यनेमानं असंच. ती भलीमोठी गुळाची कढई उतरविण्याच्या वेळी दहा-बारा माणसं एका सुरात आरोळी द्यायचे, 'बोला पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्रीज्ञानदेव तुकाराम, निवृत्तीनाथ महाराज की जय' जणू ती आरोळी 'चला रे पोरांनो गूळ खायला' अशा अर्थानं आमच्यासाठीच असायची. सगळी शाळा पाठीला दप्तर लावून गुऱ्हाळावर जमायची. गुऱ्हाळाच्या पायऱ्या चढताना संपत पाटलाला पाहून पोरं दबकायची. गुळ्याबाबा लाकडी फावड्यानं कढईतली गूळसाय हलवायचा. ते पाहून आमच्या तोंडाला अधिकच पाणी सुटायचं. 'काय रे पोरांनो, उभे काय राहिले. घ्या थोडा थोडा गूळ अन् पळा!' असं संपत पाटलानं नुसतं म्हणण्याचा अवकाश. हातातली उसाची टिपरं सायीत खुपसली जायची. गोलगोल फिरवून सायीनं आख्यी टिपरं माखायची. गुळ्याबाबाचं 'साय' हलवायचं काम चालूच असायचं. तो आळत चाललेला गूळ खायला मजा यायची. घाईनं खाल्ल्यानं कुणाचं तोंडही चटकायचं. गूळ खाऊन गिरकी वळायची. पुन्हा संपत पाटील

ओरडायचा, ‘चला रे, पळा घराकडं’ हातातली टिपरं सांभाळीत पोरं घराकडं सुसाट  निघायची.

दुपारची भरलेली शाळा सायंकाळी सहा वाजेला सुटायची. दप्तर खुंटीला अडकवलं की, मी खेळायला मोकळा व्हायचा. अशा वेळी जर का आईनं काही काम सांगितलं की, जीवावर यायचं. नको त्यावेळी काम सांगितलं म्हणून आईचाही राग यायचा. पण जर का आईनं संपत पाटलाच्या गिरणीत दळायला जा म्हणून सांगितलं की, खूप आनंद व्हायचा. डोक्यावरचं दोन पायल्या दळणाचं ओझंही जड वाटायचं नाही. गुऱ्हाळाच्या दिशेनं झपाझप पावलं पडायची. डोक्यावरचं दळण गिरणीतल्या विष्णू फिटरच्या स्वाधीन केलं की, मी गुऱ्हाळात फिरायला मोकळा व्हायचो. भीतभीत गुऱ्हाळाच्या पायऱ्या चढायचो. संपत पाटील सिगारेट ओढण्यात मश्गुल असायचा. कढईतल्या रसाला खळाखळा उकळी आलेली असायची. त्यावरून अंदाज बांधला जायचा, अजून गूळ तयार व्हायला एखादा तास तरी लागेल. माझ्यासारखे गिरणीत दळायला आलेले चार-पाच मित्र गुऱ्हाळाच्या परिसरात नजरेस पडायचे. कोणी ऊस खात असायचं तर कोणी उगाच इकडं तिकडं भटकताना दिसायचं. मग हात पालवून, शिट्या वाजवून सगळे एका ठिकाणी जमायचे. केवड्याच्या आमराईजवळ आणि गाववहाळाला लागून एक ऐसपैस त्रिकोणी आकाराचं मोठं मैदान होतं. त्या मैदानाच्या मध्यावर पण कोपऱ्यावर म्हसोबा ठाण मांडून बसलेला होता. त्या मोकळ्या मैदानात गाळलेल्या उसाचं चिपाड वाळत घातलेलं असायचं. त्यावर मित्रांची दंगामस्ती चालायची. कधी आराधरी, कधी कुस्त्यांचे डाव रंगायचे. खेळण्याच्या नादात गिरणीतल्या दळणाकडं कोणाचं लक्षही नसायचं. अंधार पडायला लागला की, सगळेच गिरणीकडे निघायचे. काहींचे दळण झालेले असायचे तर काही दळायचे शिल्लक असायचे. मग आमचा मोर्चा रसाच्या टाकीकडं वळायचा. तिथं मशिनमध्ये ऊस घालणाऱ्यांची मोठी धावपळ असायची. मशिनच्या चरकात ऊस कडाकडा वाजत पिळला जायचा. रसाच्या चिळकांड्या उडायच्या. त्यानं मशिनवरच्या माणसांचे कपडे मेणचट व्हायचे. आमच्याकडे कुणाचं तरी लक्ष जायचं. मग तो टाकीतून बादलीभर रस काढून

आमच्यापुढे ठेवायचा. एकएक जण चार-चार ग्लास रस प्यायचो. रसाच्या गोडीनं गिरकी वळल्यासारखं व्हायचं. तोपर्यंत गुऱ्हाळात माणसांचा एकदम गलका वाढायचा. 'बोला पुंडलिक वरदे हरी विठ्ठल'चा नादघोष व्हायचा. गुळाची कढई उतरविली जायची. पाय गुऱ्हाळाच्या पायऱ्या चढायचे. गुळाच्या साईत टिपरं बुडवले की, घराची ओढ लागायची. गिरणीत सगळेच दळणं दळून झालेले असायचे. डोक्यावर दळणाचं ओझं सांभाळीत आणि टिपरावरची गोड साय खात चालताना पायाखालचा रस्ता सरून घर कधी आलं कळायचंदेखील नाही.

गुऱ्हाळाच्या त्या दिवसामध्ये माझी मोठी मजा असायची. गुऱ्हाळावर गेलो म्हणजे तांब्यातांब्या रस प्यायला मिळायचा. भरपूर गूळ खायचो आणि बराचसा फडक्यात बांधून घरी आणायचो. गुळाच्या सायीचा चष्मा बनविण्याचा मला भारी नाद होता. तो चष्मा लावून गावातून किती तरी वेळा मी ऐटीत फिरलो आहे. टिपरावरची साय बोटांनी ओरबडून गोलगोल वळायची आणि ताणून ताणून लांब करायची, अशी एक-दीड फूट लांबीची, कापसाच्या वातीसारखी सायीची वात झाली की, बोटभर तोडायची आणि डोळ्यांच्या भोवतीनं चष्म्याच्या काचेसारखी गोल गोल चिकटवायची. दोन्ही गोल नाकावर सायीचा तुकडा ठेवून एकमेकांना चिकटवायचे. एक एक वीतभर ती सायीची वात दोन्ही गोल भिंगांना जोडून त्या दांड्या कानामागे सोडल्या की, झाला गुळाचा चष्मा तयार.

एकदा असेच भर दुपारी माझे नाशिकचे आजोबा आम्हाला भेटायला आलेले. माझा गुळाचा चष्मा लावून अभ्यास चाललेला. माझ्याकडे पाहून आजोबा हसले. म्हणाले, 'बाळासाहेब हे डोळ्यावर काय लावलंय?'

'हा चष्माहे बाबा. गुळाचा चष्मा!' मी लाडाने बोललो.

'अरे वा! तुमच्याकडे गुळाचा चष्मा वापरतात का? काम झाल्यावर कुठं ठेवायचा हो हा चष्मा?' आजोबांची उगाच उत्सुकता.

'काम झाल्यावर पोटात ठिवायचा. म्हणजे खाऊन टाकतो आम्ही.' मी.

'वाऽऽवाऽऽ छान, बाळासाहेब एक गुळाचा चष्मा मलाही तयार करून द्या.

मी तुम्हाला एक आणा रोख देतो. हा घ्या एक आणा.' आजोबा माझ्या हातावर एक आणा ठेवीत बोलले.

'बाबा, तुमी पुढच्या टाईमाला आले का मी तुम्हाला गुळाचा चष्मा देईल.' मी एक आना घेऊन वाळ्या वाण्याच्या दुकानाकडं पळालो आणि आजोबा मात्र हसत राहिले कितीतरी वेळ!

आजोबांचं बोलणं खरं समजून मी त्यांच्यासाठी एक छानसा गुळाच्या सायीचा सुंदर चष्मा बनविला आणि किती तरी दिवस आजोबांची वाट पाहात बसलो, पण आजोबा काही आलेच नाही. नंतर मात्र तो चष्मा मी एका दुपारच्या सुटीत माझ्या पोटात सुरक्षित ठेवून दिला.

गुऱ्हाळातल्या गुळाची चव लोकांच्या जिभेवर रेंगाळायची तर गुळाचा गोड वास वातावरणात भरून रहायचा. दसरा-दिवाळीच्या मुहूर्तावर सुरू झालेलं गुऱ्हाळ मृगाचा पहिला पाऊस पडेपर्यंत चालू रहायचं. गावनदीचं पाणी कुणीही हक्कानं प्यावं तसे गावचे, बाहेरगावचे लोक संपत पाटलाच्या गुऱ्हाळात हक्कानं रस-गूळ खायचे. महाशिवरात्रीच्या दिवशी म्हाताऱ्या माणसापासून लहानांपर्यंत सगळ्यांची हजेरी लागायची. दसऱ्याचं सोनं लुटावं तशी उसागुळाची आणि रसाची नुसती लयलूट चालायची. गुऱ्हाळावर खायचं ते खायचं आणि घरीही बांधून घेऊन जायचं, असं सरळ साधं धोरण लोकांनी अवलंबिलं होतं. अर्थात संपत पाटलाचा याला विरोध नसला तरी ज्याचा ऊस गाळपाला आहे, त्याचा मात्र हे नुकसान पाहून जीव तिळतिळ तुटायचा. वर्षभर मेहनतीनं उभं केलेलं पीक डोळ्यादेखत माणसांनी राजरोसपणानं गावकारभाऱ्याच्या समक्ष लुटून न्यावं, हे त्याला पहावत नव्हतं. भीतभीतच तो संपत पाटलाकडं तक्रार करायचा! 'भाऊ, हे एवढं नुकसान कसं परवडंल मला. वर्षभराचं पीक जीवापोटावर वाढवलेलं, ही अशी धूळदान पहावत नायी डोळ्यांना.' त्याच्या असल्या बोलण्यावर संपत पाटील त्याच्याकडं नीट बारकाईनं निरखून पाहून घेई आणि पाहता पाहता त्याचा मूळ स्वभाव उफाळून येई. 'असं का, मला शहाणपणा शिकवतो? म्हणजे आम्ही येडे अन् तू लई शहाणा. वावरात चार-दोन गाड्या उसाची उंदरांनी नासधूस केली तिथं नायी आडवा पडलास. इथं माणसांच्या मुखात जातंय तर तुझ्या

डोळ्यांना पहावत नायी. अरं त्यायला.' संपत पाटलाचं हे बोलणं साधंच, पण त्याच्या पहाडी आवाजामुळे तो समोरच्या माणसाशी भांडतोय असं वाटायचं. हे ऐकून तक्रार करणारा चार मुस्काटात मारल्यासारखा चेहरा पाडून निघून जाई. चारचौघात त्याचं असं हसं होई.

पावसाळ्याच्या तोंडाशी गुऱ्हाळ बंद झालं की, संपत पाटील चावडीवर बसलेला दिसायचा. मग मात्र तो त्याचा मूळ स्वभाव धारण करायचा. त्याचा तोच रुबाब, तोच ताठा, तेच वागणं, बोलणं गावाला पुन्हा हादरावून सोडायचं. त्याच्यामधले हे बदल मला माझ्या बालपणात कुतूहलाचे वाटायचे. एखादा माणूस एवढा बदलू शकतो याचं नवलही वाटायचं.

एरव्ही आपल्या शेतातले चार भूईमूंगाचे टाफं उपटले तर त्याला कंबरडे मोडेपर्यंत मारणारा हाच संपत पाटील गुऱ्हाळाच्या दिवसात माणसांशी एवढा गोड कसा वागायचा? स्वभावानं काठीसारखा ताठ असलेला मऊ सुतासारखा सरळ कसा व्हायचा? आज पन्नाशीला आलेला मी 'संग जया जैसा लाभ तया तैसा' हे संत वचन जेव्हा वाचतो तेव्हा संपत पाटलाच्या बदलणाऱ्या स्वभावाचं गुपित मला उलगडत जातं. रात्रंदिवस गोड गुळाच्या संगतीत राहिलेला संपत पाटील गुळासारखाच गोड व्हायचा. गोड बोलायचा. गुळाचे सगळे गुणधर्म त्याच्यात उतरायचे. शेवटी काय, माणूस कुणाच्या संगतीत राहतो याला अधिक महत्त्व आहे. जसा सहवास लाभेल, तसा तो घडत जातो. 'साधूसंगे साधू, भोंदूसंगे भोंदू' अर्थात कोणाच्या संगतीत रहायचं, हे ज्यानं त्यानं ठरवायचं असतं. संपत पाटलाचं 'गावगुऱ्हाळ' काळाच्या ओघात नाहीसं झालं आहे. संपत पाटलाला जाऊनही चार-पाच वर्षे उलटून गेली आहेत. पण अजूनही गावकऱ्यांच्या मनात त्या आठवणी तशाच आहेत. कधी जुन्या गावाचा विषय निघाला म्हणजे माणसं संपत पाटलाबद्दल, त्याच्या गुऱ्हाळाबद्दल तासनूतास बोलत बसतात आणि गतकाळातलं गावगाड्यातलं हे वैभव नाहीसं झालं म्हणून मनातून हळहळत राहतात.

**



# मातीपण मिटता मिटेना!

अजूनही गावाकडं पोरं सवसांज झाली की, आराधरीचा खेळ खेळतात. खेळून खेळून दमले की आजीभोवती कडं करून बसतात. गाण्यांच्या भेंड्या रंगात येतात. मुलं जिंकली की आनंदाने ओरडतात. हरणाराला हसतात. त्याला आभाळातलं हरण दाखवतात. काल परवा असाच अंगणात भेंड्यांचा खेळ रंगात आलेला. आजीबाईला 'ऊ' अक्षरावरून गाणं म्हणण्याचा आग्रह. आजी धुडक्याला फडकं जोडावं तसं गाणं जोडते. 'उगी बाई उगी, रडू नको उगी.' मुलं जोरजोरात हसतात, ओरडतात.

'आजी काहीतरी फेकू नको. असलं कधी गाणं असतं का?'

जुन्या जमान्यातील आजी आणि कॉम्प्युटर युगातला नातू. यांचा कसा मेळ जमावा? मुलं गडबड गोंधळ करतात. 'आजी हार कबूल कर आणि आभाळातलं हरण बघ.' पण आजी हार मानत नाही. प्रचलित असलेलं गाण तिला आठवतं आणि ती, ते गाणं अर्धवटच गाऊन म्हणते,

**'ऊठ ऊठ पाहुण्या दिवा लाव**
**दिवा गेला वाऱ्यानं**

**कोंबडी नेली चोरानं**
**चोराच्या हातातून निसटली...'**

गाण्यानं पोराचं समाधान झालेलं. प्रचलित गाणं खरं तर असं आहे,

**अटक मटक चवळी चटक**
**चवळी लागे गोड गोड**
**जिभेला आले फोड फोड**
**फोड काही फुटेना**
**दारचा पाहुणा उठेना**
**ऊठ ऊठ पाहुण्या दिवा लाव....**

आजी नातवांचा भेंड्यांचा डाव असा रंगात आलेला. मी बाजूला जोत्यावर पाय लोंबकळत आभाळातल्या चांदण्या मोजत बसलेलो. बालपणापासून मला हे चांदण्या मोजण्याचं वेड. डोक्यावरल्या आभाळातल्या चांदण्या मोजता मोजता माझ्या डोक्यावरचे केस चंदेरी झालेले, पण प्रत्येकवेळी माझा हिसाब चुकलेला. तरीही हा वेडा खेळ वजाबाकीचा, कधीतरी बेरजेचा, का खेळतो मी? माहीत नाही. पण मला त्यात आनंद मिळतो. भेंड्यांच्या गाण्यांमुळे मुलांना मिळतो ना, तसा! आजीबाईने गायलेल्या त्या प्रचलित गाण्यातील ओळी कितीतरी दिवस माझ्या कानात घुमत राहतात. मी गुणगुणत राहतो. 'ऊठ ऊठ पाहुण्या दिवा लाव....' हे गाणं गायल्याने मला आनंदही वाटतो व अस्वस्थही होतं. आज शेतात द्राक्षबागेत काम करताना अशाच चालीच्या काही ओळी स्फुरल्या...

**मातीसंगं राब राबलो**
**मातीपण मिटता मिटेना**
**आभाळ पेलीत चालताना**
**आभाळ हटता हटेना**
**चालून चालून थकले पाय**
**वाट सरता सरेना**
**आभाळओल्या मातीची**
**ऊब सुटता सुटेना..॥**

शेती-मातीचा हा आतबट्याचा धंदा असाच प्रचलित गाण्यासारखा वाटचाल करीत माझ्या आज्या-पणज्यापासून बापाकडं आणि बापाकडून माझ्याकडं चालत आलेला. मातीसंगं राब राबून माझ्या आधीच्या कितीतरी पिढ्या मातीत गाडल्या गेल्या, पण या आभाळओल्या मातीची ऊब काही सुटता सुटेना आणि मातीचं हे मातीपण मिटता मिटेना. डोक्यावर दिवसागणिक कर्जाचे आणि त्याच्या व्याजाचे डोंगर वाढत चाललेले. पण मातीत उगवलेल्या अंकुराकडं पाहिलं की वाटतं, हेच तर फेडणार आहे हे सगळं. पण कसलं काय? वर्षामागून वर्षे येतात आणि पाखरांसारखी उडून जातात. रोजच शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या बातम्या वाचून मी गवताच्या पात्यासारखा थरथरतो आणि जिथल्या तिथे स्वत:लाच सावरतो. या आतबट्याच्या धंद्यानं मी हातघाईला आलेलो. अनेकदा जू सांड्या बैलासारखा जू सांडून उभा राहिलो. पण परिस्थितीच्या चाबकाचे फटकारे पाठीवर बसले. पुन्हा मानेवर जू घेतले. अनेकदा वाटतं, सगळी फुकून टाकावीत वावरं लोकांना, अन् निघून जावं परमुलखाला. पण हे वाटणंही क्षणभरच असतं. विचारानं पुढं टाकलेलं पाऊल अडखळतं. माती माझं पाऊल घट्ट धरून ठेवते. मागं लागलेल्या लहान पोरासारखं! मागं वळून, वाकून मी तिच्या डोळ्यात पाहतो, तेव्हा मला दिसू लागतात सासरी निघालेल्या पोरीच्या डोळ्यातल्या विरहाच्या वेदना, तिच्याही डोळ्यात आणि मी कवटाळीत, कुरवाळीत राहतो हातातल्या मातीला लेकीच्या ममतेनं!

खरं तर तिचं माझं नातं मायलेकराचं. आईनं जन्माला घातलं आणि माझी नाळ मातीत पुरली. त्या दिवसापासून तिनं मला आपल्या अंगाखांद्यावर वाढवलेलं. मायमातीनंच माझ्या पायांचे तळवे आपल्या तळहातावर पेलून धरलेले.

रानात पिकं सोंगणी-टुपनीला आली की, माझ्या आज्याला रानाची, पिकांची मातीची विलक्षण ओढ लागायची. मातीतून फुलून आलेली लक्ष्मी पाहून तो हुरळून, हरखून जायचा. डोक्यावरलं पागोटं सावरीत पिकाला हळदी-कुंकू वहायचा. नारळ वाढवायचा. ओली माती कपाळी लावून देवाच्या नावानं येळकोट करायचा. अंगात आल्यागत चारी दिशांना गूळ-खोबरं उधळायचा.

धान्याच्या राशी पोत्यात भरून घरात थप्पी मारून गावभर राजासारखा मिरवायचा. लाखांचा पोशिंदा म्हणून स्वत:ला मिरवून घ्यायचा. त्याच्या आधीच्या कितीतरी पिढ्या मिरवत, झिजत, मरत मातीआड गेल्या. पण हे लाखाचे पोशिंदे सावकाराच्या आणि सोसायटीच्या कर्जरूपानं सातबाऱ्यावर बोजा होऊन जिवंत राहिले आणि नातवांपर्यंत चालत आले. हे सगळं मी उघड्या डोळ्यांनी पाहतो, भोगतो, सोसतो, तरीही मातीबद्दलचा हा जिव्हाळा का सुटता सुटत नाही?

सखा रायत्यानं होती नव्हती तेव्हढी जमीन जागा विकून कर्ज फेडलं अन् उरलेले पैसे घेऊन, धंद्याची स्वप्नं पाहत तो शहराकडे निघून गेला. त्याच्यासारखंच आपणही करावं म्हणून एकदिवस बापाला सांगायला गेलो तर बाप अंगावर धावूनच आला. सखा रायत्याबद्दल उलटसुलट बडबडत राहिला.

तरीही मी निर्धारानं बापाला सांगितलं, 'किती राबावं मी मातीसंगं? ढेकळात टाकलं तर दिसणार नाही असा मातीसारख्या काळ्या कुळकुळीत रंगाचा झालो. ढोरासारखं गोठ्यातलं हे आयुष्य किती दिवस जगावं? हे जगणं कुणाच्या तरी दावणीला बांधल्यासारखं वाटतं. बाप ऐकत राहतो, नुसता पडमत्यासारखा आणि बोलतो स्वप्नात हरवून गेल्यासारखा. 'पोरा कळ काढ. मातीचं उणंदुणं काढू नको. एक ना एक दिवस शेताचा एक कोपरा पिकल अन् समदं कर्ज फिटल.' कसा ठेवावा बापाच्या स्वप्नातल्या शब्दांवर भरोसा? वाटतं कुणीतरी युगानूयुगे गळ्यात बांधलेलं हे दावं तोडून टाकावं आणि चौखूर उधळावं मस्तवाल खोंडासारखं! पण बाप पिढ्यान् पिढ्या बांधलेल्या दाव्याच्या गाठणी अधिकच घट्ट बांधीत जातो खुंट्याभोवती. मी दावं तोडण्यासाठी फिरत राहतो खुट्याभोवतीनं बापाजाद्यांनी फिरून फिरून पाडलेल्या रिंगणात! बाप मात्र या मस्तवाल खोंडाला 'येसन' कशी घालावी, या एकाच विचारात!

पिढ्यान्पिढ्या चालत आलेलं मातीचं हे रहाटगाडगं मी ओढत राहतो, घाण्याच्या बैलासारखा! त्याला भोवळ येऊ नये म्हणून त्याच्या डोळ्यावर झापडं तरी बांधतात. माझे डोळे मात्र सताड उघडे. उघड्या डोळ्यांनी मी पाहतोय आणि भोगतोय हे लाचार जिणं. मागच्यांनी हाकारणं आणि पुढच्यांनी चालत राहणं! असं मातीसाठीचं राबणं! सालामागून सालं गेली. पण वावराचा कोपरा

काही पिकत नाही. अन् कर्जाचा बोजा फिटता फिटत नाही. माझ्याच शेतामेरावरला तो आंबा कोणा पूर्वजाने लावलेला. वर्षानुवर्षे कोणतीही अपेक्षा न करता आपली गोड फळं येणाऱ्या-जाणाऱ्याला देत असतो. त्यानं तरी कुठं हार मानली? तोही माझ्यासारखाच मातीवर उभा. मग माझेच विचार असे कमकुवत का? आणि मग मला असं वाटतं, शेती हा धंदा नाही, तर तो धर्म आहे. एकाने दुसऱ्याला सांगण्याचा आणि इतरांना पोसण्याचा!

आताशा मी बापाचे डोळे घेऊन फिरत असतो शिवारभर, त्याने दाखवलेली स्वप्नं पाहत. 'एक ना एक दिवस शेताचा कोपरा पिकल आणि समदं कर्ज फिटंल.' मी वाटत पाहतोय त्या दिवसाची. आणि मातीबद्दलची माझी ओढ अधिकच घट्ट होत जाते, मेरावरल्या आंब्याच्या मुळीसारखी खोल खोल...अधिकच खोल....

**



# बलाकमाला उडता भासे...

**इ**तर हंगामात कुठं तरी खडकावर पाण्याच्या ठिकाणी एका पायावर ध्यानस्थ उभा असलेला बगळा अनेकदा आपल्याला दिसतो. फार तर आकाशात चार - दोन बगळे भरारी मारताना दिसतातही. पण पावसाळ्यात आणि विशेषत: श्रावणाच्या महिन्यात बगळ्यांच्या कितीतरी माळा आपल्या डोक्यावरून उंच आभाळात पंख पसरवित उडताना आपल्या नजरेत भरतात. बहुतेकदा ते पूर्वेकडून पश्चिमेकडे तर कधी मधेच दिशा बदलून उत्तरेकडे जाताना दिसतात. बालकवींना 'श्रावणमासी हर्ष मानसी' या कवितेतील

**बलाकमाला उडता भासे ।**
**कल्पसुमांची माळची ते ।।**

ही ओळ ह्याच महिन्यात बगळ्यांच्या माळेकडे पाहून सुचली असावी. सायंकाळच्या वेळी अनेक बगळ्यांचा समूह आकाशात विहरताना दिसतो. आपली मान पुढे काढून आणि पाय मागे पसरवून पंखांची उघडझाप करीत बगळे स्वच्छंदीपणे तरंगत विहार करीत असतात. त्यांच्याकडे पाहिलं की, वाटतं स्वर्गातल्या एखाद्या अप्सरेचा केसात माळलेला पांढऱ्या चाफ्याच्या फुलांचा

गजरा तुटून घरंगळत आभाळातून क्षितीजाकडे निघाल्यासारखा वाटतो.

बगळा आणि कावळा या पक्ष्यांशी आपली ओळख तशी जुनीच असते. बगळ्यासारखे पांढरे शुभ्र होण्यासाठी कावळ्याने केलेले प्रयत्न आणि त्याची झालेली दयनीय अवस्था याची गोष्ट बालपणीच आपल्याला मोठ्यांकडून ऐकायला मिळते. लहानपणी आपण अंगणात अनेक खेळ खेळत असतो. आंब्याच्या हंगामात दोन्ही बोटांमध्ये कोवळी कोय पकडून गाणंही म्हणतो, **'कोय कोय भिक्याची बायको कुणीकडं'** बोटातली कोय निसटून कुठल्या तरी दिशेला पडते. त्या दिशेकडे पाहून म्हणणारे म्हणतात, **'कोय कोय भिक्याची बायको धुळ्याकडं'**. सायंकाळच्या वेळी आभाळात बगळ्यांची माळ पाहिली की मुलं एकमेकांच्या हातात बोटांची जाळी गुंफून गाणं म्हणतात.

**'बगळ्या बगळ्या कवडी दे ।**
**हरणगावची नवरी दे ॥'**

खरं तर बायको काय असते हे कळण्याचं ते वयदेखील नसतं. आणि हरणगावचीच नवरी का? हेही माहीत नसतं. पण परंपरेनं चालत आलेलं गाणं आपण गात असतो.

खडकावर किंवा माळरानावरून चालणारा बगळा बांबूच्या उंच काठीवर चालणाऱ्या बहुरुप्यासारखा दिसतो. मधूनच तो नागासारखी आपली मान मागे पुढे हलवित असतो. तर एखाद्या साधूनं ध्यानमग्न उभं राहावं तसा तो एक पाय दुमडून एका पायावर पाण्याच्या ठिकाणी डोळे मिटून उभा असतो. बुवाबाजी करणाऱ्या बाबाच्या पुढे भोळ्या भक्तांनी लोटांगण घ्यावं तशा पाण्याच्या लाटा त्याच्या पायाशी लोटांगण घेतात. मला तर माणूस आणि बगळा यांच्या राहणीमानात आणि स्वभावात विलक्षण साम्य दिसतं. माणसाच्या अंगी असलेली लबाडी आणि ढोंगीपणा बगळ्याच्याही अंगी असतो. त्याच्या पुढ्यात आलेला मासा तो चोचीने पटकन मटकावतो आणि पुन्हा साळसूदपणाने ध्यानस्थ उभा राहतो. माझ्या बालपणी आजी रात्रीच्या वेळी नातवंडात बसून गोष्ट सांगायची. आजीनं सांगितलेली म्हाताऱ्या बगळ्याची अशीच एक गोष्ट (पंचतंत्रातील कथा). 'एका तळ्याच्या काठी एक म्हातारा बगळा राहात होता. थकल्यामुळे

त्याला माशांची शिकार करता येत नव्हती. जगण्यासाठी त्याने एक युक्ती शोधली. त्याने तळ्यातल्या माशांना सांगितले की, थोड्याच दिवसात मोठा दुष्काळ पडणार आहे आणि ह्या तळ्यातलं पाणी आटणार आहे. पाणी अटलं तर तुमचं मरण अटळ आहे. बगळ्याचं हे बोलणं ऐकून तळ्यातले मासे घाबरले. पण त्यांना धीर देत बगळा म्हणाला, 'घाबरू नका. एका डोंगराच्या पायथ्याशी मोठ तळं आहे. त्याचं पाणी दुष्काळात जराही कमी होत नाही. अशा तळ्यामध्ये रोज एका माशाला नेऊन सोडण्याचं काम मी करीन.' माशांनी बगळ्यावर विश्वास ठेवला आणि मासे स्वत:हून बगळ्याच्या पायाशी येऊ लागले. रोज एक मासा पकडून तो म्हातारा बगळा दूरवर उडत जाई आणि चोचीत पकडलेला मासा खाऊन टाकी. असे बरेच दिवस चालले. एक दिवस तळ्यातला खेकडा बगळ्याला म्हणाला, 'मलाही मरणाची भीती वाटते, मलाही पाणी न आटणाऱ्या त्या तळ्याकडे घेऊन जा.' बगळा तयार झाला. त्याने खेकडा चोचीत पकडला आणि ठरलेल्या ठिकाणी आल्यावर खेकड्याला खाण्यासाठी बगळ्याने मान पुढे केली. खेकडा सावध झाला. त्याने सावधपणे बगळ्याची मान आपल्या नांग्यांमध्ये पकडून बगळ्याला मारून टाकले. खेकड्याने मग चालत तळ्याच्या काठी येऊन माशांना सांगितले. 'अरे, कसाला दुष्काळ अन् कसलं काय, बगळ्यानं शोधला होता जगण्याचा उपाय. आता घाबरण्याचं काहीच कारण नाही. मी त्या दुष्ट बगळ्याला मारून टाकलं आहे.' ही छोटीशीच गोष्ट, पण बरंच काही सांगून जाणारी.

आपल्या अवती भोवती असेच बगळ्यासारखे ढवळठक माणसं नोकरीचे, व्यापाराचे प्रलोभनं दाखवून आपला श्रमाचा, घामाचा पैसा लुबाडीत असतात. आपण त्यांचे स्वच्छ राहणीमान, गोडगोड बोलणे आणि फुकटची श्रीमंती पाहून हरखून जातो आणि अलगद त्यांच्या जाळ्यात अडकतो. म्हणून बगळ्यापासून आणि बगळ्याची वृत्ती असलेल्या माणसांपासून माशांनी आणि सद्‌विचारी माणसाने सावध असलेलंच बरं!

**



# सुताराचा वड

त्या काळी गावात मरीआईचा वड, पातळीचा वड, म्हसनवटीचा वड, पातळीचा वड, बुट्टा वड, सुतारवड अशा विशिष्ट नावांचे वड होते. आणि त्यांची खास वैशिष्ट्येही होती. ह्या अशा अनेक वडांच्या वास्तव्यांमुळे की काय, गावाच्या नशिबी कायमची वड-वड आली होती. गावातील कोणाचीच परिस्थिती चांगली नव्हती. सततचे आजार आणि खाण्या-पिण्यावाचून कायमचीच परवड झालेली. सगळ्या वडांपेक्षा सुतारवडाला अधिक महत्त्व होतं. गावातील सगळे रस्ते त्याच्या खालूनच जात आणि ओढ्याची चढण चढून पुढे शिवारभर पांगत.

सुतारवड हा गावापासून अवघा हाकेच्या अंतरावर. त्याच्या पूर्व दिशेला तोल्याईचं वाडगं. पश्चिमेला रोकडमल्लाचं मंदिर आणि मशिद. दक्षिणेला खळवाडीकडचं शिंदीबन तर उत्तरेला हजार दीड हजार वस्तीचं गाव. मध्यभागी चार - पाच एकराच्या जागेत एकटंच उभं वडाचं झाड. त्याचा विस्तार दहा - पंधरा पांडाच्या जागेत झालेला. प्रचंड डेरेदार आणि घेरेदार झाड. असा वटवृक्ष अजून तरी माझ्या पाहण्यात नाही. त्याच्या बुडाची मोळी बांधायची

ठरविली तर एक कासरा लागेल एवढ्या जाडीचं त्याचं बूड. परसभर उंचीवरून चारी दिशांनी पसरलेल्या आणि सरळ आभाळाच्या दिशेनं झेपावलेल्या त्याच्या फांद्या नेहमीच हिरव्या गर्द पानांनी बहरलेल्या असायच्या. त्याला लालचुटूक वडांगळं लागली की, वडावर शेकडो लाल चोचींच्या पोपटांचा थवा बसल्याचा भास व्हायचा. त्याच्या फांद्यांनाही जमिनीकडे झेपावण्याची ओढ. पाणी शेंदण्यासाठी विहिरीत बादली सोडावी तशा त्याने आपल्या पारंब्या जमिनीच्या दिशेने सोडलेल्या. तिन्ही ऋतूंमध्ये भरपूर सावली देणाऱ्या वडाच्या झाडाखाली अंबादास सुताराने आपला सुतारी व्यवसाय मांडलेला. म्हणूनच त्याला सुतारवड हे नाव रुढ झालेलं. वडाखालच्या मोकळ्या जागेत पडलेली, मोडलेली अवजारं. विळे, कुऱ्हाडी सेवटण्यासाठी विस्तवावर फुंकर घालणारी काळ्या रंगाची म्हशीसारखी दिसणारी धामण. तिच्यापासून दोन हाताच्या अंतरावर 'नाई' कातण्यासाठी बैलगाडीचं एक चाक खुटल्यावर उभं केलेलं. त्याला फिरविण्यासाठी हॅण्डल. वडाच्या बुडापाशी त्या सुतारी व्यवसायाला लागणारी लाकडी पेटी. वडाखालच्या एका एकराच्या परिसरात कुणब्यांनी सणगासाठी आणून टाकलेली बाभळीची अनघड लाकडं, एकमेकांवर हातपाय टाकून बसलेले. काही तयार झालेले नांगर, वखर बैल येण्याची वाट पहात बसलेले. तर बैलगाडीच्या मोडलेल्या साटचा दवाखान्यात नंबर लावून बसलेल्या माणसागत दुरुस्तीची वाट पहात बसलेल्या. काही नवीन बैलगाड्या रंगरंगोटी करून नव्या नवरीगत नटून थटून बसलेल्या. अंबादास सुतार आणि त्याचे भाऊ सणगं बनविण्याच्या कामात गुंतलेले. हत्यारांचा ठोकठाकीचा आवाज वातावरणात नाद भरून असायचा. वडाच्या बुडाशी अंथरलेला पांढराधोट झोऱ्या. त्याच्या कोपऱ्याशी ठेवलेला पानाचा पितळी डबा. ह्या डब्यातील पानसुपारी आणि तिसऱ्या प्रहरचा चहा वडाखाली बसलेल्या माणसांचा कधी चुकला नाही. त्या झोऱ्यावर गावच्या बड्या आसाम्यांपासून तर गरीबातल्या गरीब माणसानं खुशाल बसावं आणि हक्कानं डब्यातलं पान खाऊन पोपटाच्या चोचीगत आपले ओठ रंगवून घ्यावे. कुणालाही मनाई नव्हती. कुठला जातीपातीचा भेदाभेद नव्हता. ह्याच वडाखाली बसून गावकारभाऱ्यांनी गाव सुधारण्याचे मनसुबे रचलेले. बरेवाईट निर्णय घेतलेले.

हे सगळं वडानं आणि अंबादास सुतारानं टवटाळ ऐकूनही न ऐकल्यासारखं केलेलं. जे ऐकलं ते मनात साठवलं. चहाडी चुगली केली नाही. म्हणूनच महत्त्वाचे निर्णय ह्याच वडाखाली झोऱ्यावर बसूनच व्हायचे.

पहिला पाऊस पडला की, सुतारवडाखाली गावातल्या कुणब्यांची नुसती जत्रा भरायची. पेरणीचा हंगाम सुरू व्हायचा. प्रत्येकाला घाई व्हायची, पाभरी, तिफणी ठोकण्यासाठी, नवीन बनविण्यासाठी. आख्या गावाचं काम, पण काम करणारे तिघा भावांचे हात सहा. सुतारांची दमछाक व्हायची. काम मागं पुढं झालं की सुतारांबद्दल नाराजी होई. पण ती तेवढ्यापुरतीच असायची. काम ताब्यात पडलं की, कुणब्याची नाराजी दूर व्हायची. अंबादास सुतारानं मजुरीसाठी कुणाला नाडलं नाही की, चूल पेटविण्यसाठी भुसा आणि लाकडाच्या किलच्या नेण्यासाठी आलेल्या बायकांनाही कधी अडवलं नाही.

पावसाळ्याच्या दिवसात पोरं दुपारच्या वेळी सुतारवडावर सूरपारंब्याचा खेळ खेळण्यासाठी जमायची. वटवाघळं लटकावी तशी वडाच्या पारंब्यांना लटकायची. जमिनीच्या दिशेने लोंबकळलेल्या पारंब्यावरून सरड्यासारखी सर - सर खाली नळकायची. बेडकासारखी धपकन उड्या मारायची. पकडायला आलेल्या मुलाला चिडविण्यासाठी लाल - लाल वडांगळं फेकून मारायची. पकडणारा हरला की त्याला चिडविण्यासाठी एका सुरात गाणं म्हणायची.

**'आमचा बाळ्या चांगला**
**वडाला नेऊन टांगला**
**वडाची फांटी हालती**
**नवरा-बायको बोलती'**

गाणं ऐकून हरणारा मुलगा आणि इतर मुलांमध्ये चिडाचीड, हाणामारी सुरू व्हायची. हे सगळं अंबादास सुतार आपल्या जाड भिंगाच्या चष्म्यामधून तिरकस नजरेने पहायचा. पण कधी रागवायचा नाही. रागवला असता तर आम्हीच कशाला वडाखाली खेळायला गेलो असतो. मुलांनी खेळायला यावं असं त्यालाही मनोमन वाटत होतं. म्हणून तर त्यानं आम्हाला वडावर चढणं सोपं जावं म्हणून वडाच्या बुडाला आपल्या वाकसाने पावट्या पाडून दिल्या होत्या.

एखाद्या बाईनं उन्हात केस वाळवीत बसावं तसा वड आपल्या पारंब्या सोडून बसलेला दिसायचा. इतर वडांवर नेहमीच वटवाघळं लटकलेली असायची. पण सुताराच्या वडावर एकही वटवाघूळ नव्हतं. कदाचित ते झाड माणसांच्या राबत्यात असल्यानंही वटवाघळं त्याच्याकडं फिरकली नसावीत. अधून मधून पाच पन्नास कावळे लाल वडांगळं खाण्यासाठी त्याच्या शेंड्यावर बसायचे. त्यावेळी मात्र कावळ्यांची कावकाव ऐकून अंबादास सुताराचं डोकं उठायचं. चार दोन कावळ्यांनी तर वडावर घरटे बांधून आपला मुक्काम कायमचा ठोकला होता.

अंबादास सुतार 'नाई' कापायला बसायचा तेव्हा त्याची ऐट काही न्यारीच असायची. दोन्ही पायांच्या मधोमध उभी 'नाई' धरून तो किकरावर उलटच्या वाकसानं ठोके घालायचा त्यावेळी त्याची ऐट मला 'ढोली कोरण्यासाठी ठोके घालणाऱ्या सुतार पक्ष्यासारखी वाटायची.

गावाच्या आजुबाजूला असलेल्या वडाबद्दल लोकांमध्ये अफवांचा बोलबाला होता. म्हसणवटीच्या वडावर अमावस्या-पौर्णिमेला प्रेतात्मे झोके खेळायचे तर मरीआईच्या वडावर हडळ कायमची ठाण मांडून बसलेली असायची. पातळीचा वड मुळातच गावापासून लांब असल्याने त्या वडावर वटवाघळांनी कायमस्वरूपी वास्तव्य केलं होतं. पण सुताराच्या वडाबद्दल अशी कोणतीही अफवा नव्हती. आपल्या आजोबांबद्दल नातवाला आदर आणि आपुलकी वाटावी तशी आपुलकी प्रत्येकालाच सुतारवडाबद्दल वाटायची.

गावातल्या प्रत्येकाची वाजत गाजत निघालेली मिरवणूक सुतारवडानं पाहिलेली. आणि गावात आलेल्या नववधूच्या पैंजण, जोडव्यांची छुम-छुम त्याने आपल्या कानात साठवलेली. कित्येकांच्या प्रेतयात्राही त्याच्याखालून गेलेल्या. त्यावेळी त्यालाही गलबलून आलेलं. एखाद्या धीरगंभीर माणसासारखा सगळं काही पहात, सोशीत एकाच जागी वर्षानुवर्षे उभा. गावाच्या कैक पिढ्यांचा तो एकमेव साक्षीदार!


धरण बांधल्याने गावाचं स्थलांतर झालेलं. मुलंबाळं आणि आपला संसार घेऊन माणसं नवीन गावात रहायला आलेली. जुन्या गावातील झाडाझुडपांची

मोठ्या प्रमाणात तोड झालेली. राहिली ती फक्त वडाची झाडं. बिनकामाचा सांदीकोपऱ्याचा ‘पोचारा’ तसाच सोडून द्यावा, तसा वर्षानुवर्षे सावली देणारा वड सोडून अंबादास सुतारही नवीन गावात आला.

पावसाळ्यात नदीला पूर आला. सगळं पाणी धरणात साठवलं गेलं. मोठा जलाशय तुडुंब भरला. पाण्याचा फुगवटा जुन्या गावापर्यंत गेला. उद्‌ध्वस्त केलेल्या घराच्या भिंती पाण्यात बुडाल्या. गाव दिसेनासं झालं. सुताराचा वड तेव्हढा पाण्यामध्ये एकटाच उभा. त्याच्या गळ्याला पाणी लागलेलं. बुडणाऱ्या माणसाने हात हलवून धावा करावा, तसा फांद्या हलवून तो धावा करू लागलेला. पाणी वाढत गेलं आणि सुताराचा वड कायमचा दिसेनासा झाला.

अजूनही पावसाळा आला की मला सुताराचा वड आठवतो. सूरपारंब्यांचा खेळ आठवतो. ते गाणंही आठवतं. आणि मी शंभरीला टेकलेल्या अंबादास सुताराकडं पाहतो. त्यानं सगळं काही पाहिलेलं, ऐकलेलं. सारं सारं मनात साठवलेलं. तोच आता मला वडासारखा दिसू लागतो. फांद्या-फांद्यांनी विस्तारत गेलेला, अबोल, एकाकी झालेला!

**



# घरटे पाखरांचे... घर माणसांचे

**मा**झ्या घराच्या पाठीमागील अंगणात कडूलिंबाचं एक मोठं झाड आहे. कधीचं आहे कुणास ठाऊक! पण मी त्याला माझ्या बालपणापासून पाहतो आहे. मोठमोठ्या फांद्यांनी विस्तारलेलं हे झाड मला आभाळात टक लावून बसलेल्या म्हाताऱ्यासारखं दिसतं! कधीचं काय शोधत आहे कुणास ठाऊक? दिवसभरात त्याच्या अंगाखांद्यावर कितीतरी पक्षी येऊन बसतात. वेगवेगळ्या आवाजात किलबिलाट करतात. विशेषत: कावळ्यांचा तो नेहमीचाच ठिय्या झालेला आहे. सकाळ संध्याकाळ त्यांची कावकाव चाललेली असते. बरेचसे कावळे तर लिंबावरच आपले घरटे बांधून आठनूकाळ बारामास वस्तीला आहेत. एखाद्या गृहिणीने सडा-सारवण करून रांगोळी काढावी तसे ते सकाळ-संध्याकाळ आपली विष्ठा टाकून माझं अंगण रंगवीत असतात. चुना शिंपडल्यासारखं अंगणानं रंगरूप धारण केलं आहे.

कावळा हा पक्ष्यांमध्ये अतिशय हुशार आणि सावध पक्षी आहे, असं म्हणतात. त्याच्याबद्दलच्या अनेक पौराणिक कथाही आपण ऐकत असतो.

पण मला कावळा हा पक्षी आपले घरटे बांधण्याच्या कामात अतिशय बेसावध, हलगर्जी आणि कमालीचा आळशी वाटतो. तहान लागली की झरा उपसणाऱ्या माणसांच्या वृत्तीचा ! कावळा घरटे बांधण्याच्या तयारीला लागला की जुने जाणते माणसं म्हणतात. 'औंदाच्या सालात पावसाळा लवकर सुरू व्हनार बघा !' मी गेल्या अनेक वर्षांपासून माझ्या अंगणातील लिंबावरच्या झाडावर वास्तव्यास असलेल्या कावळ्यांचे निरीक्षण करतो आहे. साधारणत: मे महिन्याच्या सुरुवातीपासून कावळा आपले घरटे बांधायला सुरवात करतो. पंख पसरवित सावधपणे तो अंगणात उतरतो. आपली मान तिरपी करून इकडे तिकडे पहात आपल्याला काही धोका आहे का? याचा अंदाज घेतो. मग टुणकन उडी मारून चोचीत काडी धरतो. पुन्हा आजूबाजूला पाहतो आणि पंख पसरवून झाडाच्या दिशेने झेपावतो. फांदीवर बसून विसावा घेतल्यासारखा करतो आणि तीनचार फांद्यांचं बेचकाळं पाहून त्यामध्ये चोचीतली काडी टाकून घरटं बांधणीचा शुभारंभ करतो. आपण घराची पायाभरणी करून करतो ना, तसा! मग तो असाच एकामागून एक काड्याकुड्या, कधी तारेचे छोटे-छोटे तुकडे, बाभळीचे काटे गोळा करून आपले घरटे बांधीत असतो. तसा तर त्याच्या घरट्याला कुठलाच आकार नसतो. कसं तरी ओबड धोबड दिसणाऱ्या त्या घरट्यात आपल्याला बसता येईल असा खोलगटपणा करून रात्रीच्या वेळी तो त्यात विश्रांती घेत असतो. त्याचं घरटं पूर्णपणे हवेशीरच असतं. त्याला ना छत ना छप्पर. त्यात उबदारपणा, निवारा नसतोच. पावसाळ्याच्या दिवसात तो पंखावर पाऊस झेलीत रात्रभर कुडकुडत बसतो. लोककथेमध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याला दुसऱ्याच्या घराची अपेक्षा करीत म्हणावे लागते.

**'चिऊताई चिऊताई, दार उघड'**

पण वस्तुस्थितीचा विचार केला तर चिऊताईला तरी कुठं मजबूत सुरक्षित घरटं आहे ! घरटंच नाही तर दार उघडण्याचा प्रश्नच कुठं येतो? ती बिचारी कुठंतरी घराच्या वळचणीला किंवा भिंतीवरच्या फोटोमागे गवतकाड्या जमा करून त्यात बसत असते. माझ्या अभ्यासिकेत एक मोठा लांबरुंद

फोटो आहे. त्या फोटोमागे एक चिमणा-चिमणीची जोडी आपल्या चोचीत गवताच्या काड्या, कापूस, कापडाचे बारीक बारीक तुकडे अशा वस्तू आणून आपलं घरटं बांधायला, गवत साठवायला सुरुवात करतात. माझा काहीएक विरोध नसतानाही उगाचच भांडखोर माणसासारखे माझ्याकडं पाहून चिवचिवाट करतात. 'आपण त्या गावचेच नाही' अशा वृत्तीने मीही सुरुवातीला त्यांच्या या उद्योगाकडे दुर्लक्ष करतो. पण 'भटाला दिली ओसरी, भट हळूहळू पाय पसरी' अशा वृत्तीने ते वागतात. गवताच्या काड्या माणसाला शेंडी फुटल्यागत फोटोच्यावर डोकावू लागतात. तेव्हा माझी सौभाग्यवती खुर्चीवर उभं राहून चिमणीनं मोठ्या प्रयासाने बांधलेलं ते गवताचं घरटं क्षणात बाहेर फेकून देते. आपलं घरटं मोडल्याचं पाहून चिमण्यांची ती जोडी खिडकीच्या गजावर बसून कधी माझ्याकडे पहात तर कधी फोटोकडे पाहत मोठमोठ्याने चिवचिवाट करतात. घरमोडीच्या कारस्थानात माझाच हात असल्याचा त्यांना दाट संशय आल्याने त्यांनी माझ्याशी भांडणाचा पवित्रा घेतलेला असतो. 'या माणसाला कितीही बोललो तरी उपयोग होणार नाही.' असं लक्षात आल्यावर माझ्याकडे तुच्छतेने पहात ते पुन्हा फोटोमागे नवीन घरटं बांधण्याच्या कामाला सुरुवात करतात नव्या उमेदीनं!

चिमणीला जसं पुन्हा पुन्हा घरटं बांधावं लागतं तसे श्रम घरटं बांधण्याठी हिरव्या राघूला घ्यावे लागत नाहीत. मिठू मिठू बोलून माणसालाही भुरळ घालणारा हा राघू एखाद्या घरमालकाचं घर भाडेकरूनं राहता राहता बळकावून घ्याव तसा हा झाडावर आयत्याच तयार असलेल्या ढोलीत आपलं बिऱ्हाड थाटत तिथचं आपली वंशावळ वाढवित असतो. ऊन, वारा, पाऊस यांची राघूला अजिबात भीती वाटत नाही. ढोलीच्या तोंडाशी येऊन निसर्गाची अनेक रूपं तो पहात असतो.

एखाद्या कौलारू घराच्या गावात स्लॅबच्या बंगल्याने आपले लक्ष वेधून घ्यावं, तसा रानातील सुगरणीचा खोपा आपले लक्ष वेधून घेतो आणि स्वाभाविकपणाने आपल्या ओठांवर शब्द येतात वाऽहऽवा! काय अप्रतिम कलाकुसर आहे. सुंदर! खरं तर आपण सुगरणीचा खोपा म्हणतो. पण

प्रत्यक्षात हा खोपा विणताना सुगरणीचा कोणताही सहभाग नसतो. कलाकुसर केलेला हा खोपा सुगरण नर पक्ष्याने विणलेला असतो. खोपा बांधण्यासाठी सुगरण पक्षी विहिरीच्या, नदीच्या काठावरल्या झाडांची निवड करतो. विशेषत: पाण्याच्या दिशेने झुकलेल्या फांद्यांवरच तो आपला खोपा विणीत असतो. हेतू हा की खोपा इतरांपासून सुरक्षित राहावा. खोपा विणण्याची सुद्धा सुगरण पक्ष्याची एक विशिष्ट पद्धत आहे. एकाच वेळी ओळीने तो अनेक खोपे विणतो. सगळेच खोपे अर्धवट असतात. खोपे विणीत असताना तो 'चिट्ऽ चिट्' असा आवाज करतो.

खोपे बांधण्याच्या आपल्याच कामावर खुश होऊन 'चीऽ ईऽऽऽ' अशा सुरेल आवाजात गातोही! मोळाच्या किंवा गवताच्या काड्यापासून तो आपले खोपे विणीत असतो. सुगरण पक्ष्याबद्दल एक कथा आहे. असे अर्धवट खोपे बांधून तयार झाले की तो सुगरणीला विचारतो, 'तू माझ्याशी लग्न करतेस का?' ती लग्नाला तयार झाली तरच तो तिला अर्धवट बांधलेले खोपे दाखवतो. तिने एखादा खोपा पसंत केला की मगच तो खोपा पूर्ण करण्याच्या कामाला लागतो.

फांदीला निमुळता आणि मध्येच पसरट आकाराचा खोपा तो नळकांडीसारख्या प्रवेशद्वाराने पूर्ण करतो. आपण नाही का फ्लॅट बुक करण्याच्या आधी पत्नीला चार-दोन फ्लॅट दाखवतो. तिला पसंत पडलेलाच फ्लॅट बुक करतो. अर्थात तेही योग्यच आहे. अधिक काळ तिलाच तर त्या घरात राहून मुलांचं संगोपन करायचं असतं.

शेवटी पक्षी काय किंवा माणसं काय, प्रत्येकालाच निवाऱ्याची गरज असते. दिवसभर राबराबून दमलेले जीव आपल्याच घरट्यात रात्रभर विश्रांतीला पडलेले असतात. निसर्गात पशु-पक्षी जसे आपल्या गरजेनुसार आपल्याला जमेल तसे ओबडधोबड कलात्मक घरटे बांधीत असतात. तशी माणसं देखील आपल्या ऐपतीनुसार पक्के विटा मातीचे, सिमेंटचे, स्लॅबची घरं, अलिशान बंगले बांधीत असतात. अजूनही पशु-पक्षांच्या घरट्यात जिव्हाळा, ओढ, शांतता टिकून आहे. माणसांच्या घराचं काय? माझा मुलगा नवीन

घर बांधतो आहे. तो मला विचारतोय, ‘दादा, घराला फरशी कोणती बसवू?’ काय सांगू मी त्याला? ज्या घरात सुसंवाद नाही, एकमेकांबद्दल ओढ नाही, आत्मियता नाही, शांतता, विश्वास नाही. नेहमीच भांडण -तंटे, रुसवे-फुगवे चालू असतात. अशा घरपण हरवलेल्या घराला कोणतीही फरशी बसविली काय किंवा नाही बसविली तर काय फरक पडतो?

**



# माझी पहिली बायको

दारापुढं मांडव नाही, वाजंत्री नाही, भटजी नाही की चार दोन वऱ्हाडी नाहीत. ती आपल्या घरासमोरील पडवीत मुंडावळ्या बांधून बसली होती. माझ्याही कपाळावरच्या मुंडावळ्या डुलत होत्या. मी रडत होतो. सासरी निघालेल्या नवरीसारखा! आई आणि जमलेल्या बायका मात्र हसत खिदळत होत्या. दोघी जणींनी लुगड्याच्या पटकुराचा अंतरपाट धरला. जिला जसे आठवेल तशी मंगलाष्टकं झाली. गव्हा-तांदळाच्या अक्षदा डोक्यावर पडल्या आणि आमचं लग्न लागलं. खरं तर बाहुला-बाहुलीच्या खेळातल्या लग्नासारखंच हे लग्न! काळाच्या ओघात मी ते लग्नही विसरलो आणि बायकोलाही विसरलो. पण तिने मात्र हे नात्याचे बंध आपल्या मनात जपून ठेवले, जसेच्या तसे. जगत राहिली अबोलपणानं वर्षानुवर्षे! आणि आयुष्याच्या एका वळणावर तिनं या नात्याचे पदर माझ्यासमोर उलगडून दाखवले. हतबल होण्याशिवाय मी काहीही करू शकत नव्हतो.

माझ्या घराच्या गच्चीवर उभं राहून हाक मारली तर सहज आवाज जाईल. एवढ्या अंतरावर माझी पहिली सासुरवाडी होती. एखाद्या माणसाच्या खांद्यावर

बसावं तसा कोळवाडा मांगवाड्याच्या खांद्यावर बसून माळवाड्याकडं पहात होता. या तीनही वाड्यांतील लोकांचे आपापसात आपुलकीचे आणि जिव्हाळ्याचे संबंध होते. माझी सासुरवाडी कोळवाड्यात होती. मांगवाड्याकडं जाणाऱ्या हमरस्त्याच्या उंचवट्यालाच सासऱ्याचं भेंडामातीचं घर होतं. त्याकाळी बागायती शेती कमी असल्यानं शेतातली कामं तशी कमीच असायची. शेतीच्या हंगामातच गाव तेव्हढं सुनं सुनं असायचं. सकाळची घरकामं आटोपली म्हणजे आई दुपारच्या वेळी कोळवाड्यातल्या बायकांकडं बसायला जायची. शाळेला सुट्टी असली म्हणजे मीही आईसोबत जायचो. गणपामामा आमच्याकडं सालगडी म्हणून कामाला होता. गावनात्यानं तो माझा मामा लागायचा. त्याच्या घरी आई गेली म्हणजे नणंदेच्या नात्यानं तिची ऊठबस व्हायची. चेष्टा मस्करी चालायची. मला मात्र कधी उसाची टिपरं तर कधी शेंगा खायला मिळायच्या. आई नको म्हणत असतानाही केवळ खाण्याच्या आशेनं मी हट्टानं तिच्यासोबत कोळवाड्यात जायचोच.

एकदा सरत्या उन्हाळ्यात लग्नाची मोठी धामधूम होती. शाळेला सुट्ट्या लागल्या होत्या. गावात अधूनमधून सनई-चौघड्यांचे सूर घुमत होते. आई घरकाम आटोपून निवांत झाली होती. दुपारच्या वेळी आईपाठोपाठ मीही कोळवाड्याकडं निघालो होतो. गणपामामाच्या घरसमोरील पडवीत दहावीस बायका गप्पा मारीत बसल्या होत्या. आईला पाहताच त्यांना आनंद झाला. राधामामीनं आईला बसायला पोतं टाकलं. आईशेजारी मीही पोत्यावर बसलो. आमचे केलेले सोपस्कार पाहून गणपामामाची भावजयी कमळाबाई म्हणाली, 'काय बाई इहिणीची एव्हढी उठबस चाललीय. त्या काय आपली पोरगी सून करणार हाये का?' आईलाही तिची थट्टा करायची लहर आली. 'तुमची पोरगी सून करून न्यायला मी तयार आहे गं, पण तू माझ्या मनासारखं टोलेजंग लग्न करून देशील का? आत्ताच तर तुमच्या घरात माझ्या भाच्याचं लग्न झालंय. दुसरं लग्न करायची ऐपत आहे का तुमची? आईनं कमळाबाईची बोलतीच बंद केली. पण तीही भलतीच लागट बाई. ती माघार घ्यायला तयार नाही. 'बायसं आमची ऐपत हाये का नायी ते आमचं आम्ही पाहू. तुम्ही पोराचं लगीन लावता

का आत्ता?  आई गप्प बसलेली.

'बोला ना, गप्प का बसल्या.' इतर बायकांनी कमळाबाईच्या सुरात सूर मिळवला. तशी आई म्हणाली, 'आता नवरदेवच तुमच्या दाराशी येऊन बसलाय. तुम्हाला काय करायचं ते करा.' आईचा असा हुकूम मिळताच. चारपाच बायकांच्या अंगात भलताच उत्साह संचारला. त्यांनी खांबाला बांधलेले सुपाएवढ्या आकाराचे रंगीबेरंगी बाशिंगं सोडले. माझ्या समोरच बायकांमध्ये गणपामामाची मुलगी कुसुम बसली होती. तिसऱ्या इयत्तेत शिकत असलेली कुसुम रंगानं गोरीपान, नाकीडोळी तरतरीत होती. तिनं परकर झंपर घातला होता. मुळातच कुसुम अबोल आणि लाजाळू. बायकांनी तिला नटवायला सुरुवात केली. एकीनं केस सोडून विंचरायला सुरुवात केली तर दुसरीनं तिचा आधीच गोरा असलेला चेहरा पावडरनं रंगवला. कपाळावर गंधाचा टिळा लावला. कुसुमचा नट्टापट्टा आणि भांगटिळा होताच दोघीचौघींनी तिच्या कपाळावर ते सुपाएवढं बाशिंग बांधलं. कुसुम नवरी झाली. अचानक चाललेली ही गडबड पाहून तीही भांबावलेली. बायकांच्या हसण्याला भलतंच उधाण आलेलं. मीही कुसुमकडेच पहात बसलेलो. दोघीचौघींनी मला पकडून माझ्या तोंडाला पावडर लावायला सुरुवात केली. त्या अचानक हल्ल्यानं मी घाबरलो, गांगरलो. आणि रडू लागलो. आईला अधिकच बिलगून बसलो. पण आईही त्यांच्यात सामील झालेली. मला आधार देण्याऐवजी माझी गंमत पहात बसलेली. एकीनं माझे हात धरून ठेवलेले आणि दुसरीनं माझ्या कपाळावर बाशिंग बांधलं. लग्नात सनईनं सूर धरावा तसा मी रडण्याचा सूर धरला. पण माझ्या या रडारडीचं कुणीही मनावर घेतलं नाही. अगदी आईनेसुद्धा.

नटवलेल्या कुसुमला माझ्यापुढे उभं केलं. दोघीतिघींनी मला उठवण्याचा प्रयत्न केला, पण मी एकाच जागी रडत बसलो. नाईलाजानं मग दोघींनी लुगड्याच्या पटकुराचा आमच्या दोघांमध्ये अंतरपाट धरला. तसं कुसुमचं आणि माझही लग्नाचं वय नव्हतं. पण जमलेल्या बायकांनी आमच्या लग्नाचा घाट घातला होता. मी कुसुमपेक्षा वर्षा-दीड वर्षांनी मोठा असेन. ती तिसरीत तर मी चवथीत शिकत होतो. कुणाच्या तरी सांगण्यावरून कुसुमने अंतरपाटाआडून

माझा हात पक्का धरून ठेवला. सामुदायिक तोडके मोडके, आठवले तसे मंगलाष्टके झाली आणि गव्हातांदळाच्या अक्षदांच्या वर्षावात आमचं शुभमंगल झालं! पण माझी रडण्याची सनई काहीकेल्या थांबली नाही. मी उठेना, तेव्हा कुसुमलाच माझ्या शेजारी बसवलं आणि बायका लग्नाची गाणी म्हणू लागल्या. **'मांडवाच्या दारी गं, सई बाई गं बाई पोरी करिती बेसण, बेसण बेसण बेसण... नवरदेवाच्या आईच्या नाकात, सई बाई गं बाई, घाला बैलाची येसण येसण येसण येसण...!!'** सगळा हसण्या खिदळण्याचा असा दणका चाललेला आणि मी कपाळावरचं बाशिंग सांभाळीत रडत भुकत बसलेलो. रडून रडून माझ्या घशाला कोरड पडली. आसवांचे ओघळ गालावरून सांडले. नाकाला शेंबूडही आलेला. आईला आता माझे हाल बघवेना. आपल्या पदरानं माझं तोंड पुसून ती म्हणाली, 'ये बास झालं गं आता. रडून रडून पोराचा पार दम झालाय.' आईनं माझ्या कपाळाचं बाशिंग सोडलं तेव्हा उन्हं उतरतीला लागली होती. आम्ही घराकडं निघालो, तशी राधामामी म्हणाली, 'बायसं, तुमच्या सुनालाही घेऊन जा ना बरोबर?' आई हसून म्हणाली, 'राहू दे चार दिवस तिला माहेरी. सासरी पाठवशील तव्हा शिदुरीची पाटी द्यायला इसरू नको म्हणजी झालं.' बायकांच्या हसण्याचा आवाज वाढला. मी मागं वळून पाहिलं, कुसुम कपाळावरचं बाशिंग सांभाळीत उभी होती. तिचे डोळे मात्र माझ्यावरच स्थिरावले होते. चार दिवस झाले असतील, किंवा नसतीलही. एक दिवस डोक्यावर पाटी घेतलेली राधामामी आमच्या घराकडं येताना दिसली. मी धावत जाऊन आईला सांगितलं. आई म्हणाली, 'येऊ दे की आली तर.' 'अगं पण तिच्याबरोबर कुसुमही आहे.' मी रडवेला झालो. आई हसली, 'अरे येणारच ती. तुझं काय बिघडतय? मी गप्प बसून राहिलो. राधामामीच्या डोक्यावरची पाटी उतरवायला आईनं हात लावला. 'काय गं राधा, पाटीत काय आणलस? 'आंबे, घरचा आंबा उतरवला होता, कालच आढी फोडली. तुमच्या भावाचा मोठा आग्रह म्हणाले, बाईला वानोळा घेऊन जाय. बरोबर तुमची मुऱ्हाळीनही घेऊन आले.' राधामामी पदरानं कपाळावरचा घाम पुशीत म्हणाली, 'बरी झाली आलीस बस.' दोघीही खाली बसल्या. मी कुसुमकडं पहात होतो. तिची नजर

लाजून जमिनीकडं झुकली होती. आईनं दिलेला चहा पिऊन होताच कुसुम कपबशा धुण्यासाठी गच्चीवर गेली. आता ही खरंच इथंच राहते की काय अशा भीतीनं माझं बालमन दचकलं. पण तसं झालं नाही. ती आपल्या आईसोबत माघारी गेली.

कुसुमचं आमच्या घरी येणं जाणं वाढलं. प्रत्येकवेळी ती तिच्या आईसोबत असायची. आली म्हणजे घरकाम आवरायला आईला मदत करायची. भांडी घासायची, कपडे धुवायची. पण ही सगळी कामं न बोलता खाली मान घालून करायची. कुणाला वाटेल ही पोर मुकी आहे की काय इतकी अबोल असायची. थोडं-फार आईशी बोलायची पण माझ्याशी मात्र एक शब्दही बोलायची नाही. एवढं काय मी तीचं घोडं मारलं होतं कोण जाणे! मीही स्वत:हून बोलण्याचा कधी प्रयत्न केला नाही. मी तरी कुठं एव्हढा बोलका होतो. कुसुमबरोबर तर मला तिच्यापेक्षाही अवघडल्यासारखं वाटायचं.

जून महिन्यात शाळा सुरू झाली. चवथी-पाचवीचे वर्ग शेजारी शेजारीच असल्याने रोजच एकमेकांचं दर्शन होऊ लागलं. शाळेतल्या मित्र मैत्रिणींना आमच्या लग्नाची बातमी समजली. बहुधा ती कुसुमनंच सांगितली असावी. मला शाळेत येताना पाहिलं की, मुली म्हणायच्या 'ऐ कुसुम तुझा नवरा आला बघ'. आणि कुसुम कुठं दिसली तर माझे मित्र ओरडायचे 'ऐ तुझी बायको पाहिलीस का? अशी ही चिडवाचिडवी बरेच दिवस चालली. शाईनं कुसुम तिच्या नावापुढं आपल्या हातांच्या तळव्यावर माझं नाव लिहायची, वाचायची, कुणी पहाण्याआधीच पुसून टाकायची. मधल्या सुट्टीत मैत्रिणींकडं मला चिंचा, बोरं तर कधी भाजके चिंचोके पाठवायची. असं सातवी इयत्तेपर्यंत चाललं. माझ्याच जुन्या पुस्तकांवर ती अभ्यास करायची. पण माझ्याशी मात्र कधी बोलायची नाही. कधी चुकून नजरानजर झालीच तर लाजाळूचं झाड होऊन जायची.

कुसुम सातवीत आली आणि मी आठवीत गेलो. गावी माध्यमिक शिक्षणाची सोय नसल्यानं मला तालुक्याच्या गावी शाळेत जावं लागलं. रोज दिसणारी कुसुम आता आठवड्यातून दिसू लागली. कधी तरी ती आपल्या आईसोबत दिसायची. कुसुमला सातवीला चांगले मार्क मिळून ती आठवीत गेली. पण ऐपत नसल्यानं

कुसुमला शिक्षण सोडावं लागलं. वर्षा दीडवर्षात गणपामामानं दुसरीकडं साल धरलं आणि आमची दोन्ही घरं एकमेकांना दुर्मिळ झाली.

जाण्या-येण्यातलं अंतर वाढलं. तसा मी कुसुमला विसरून गेलो. कॉलेजच्या शिक्षणासाठी मी नाशिकला आल्यानं गावावर महिना दोन महिन्यातून जाणं येणं होऊ लागलं. गावी गेलो तरी एकाच दिवसाचा मुक्काम. एका मुक्कामात भेटायचं तरी कुणाकुणाला? कुसुमची कधी भेट नाही. तिचं लग्न झाल्याचं आईकडूनच समजलं. तेव्हा मला वाईटच वाटलं. काही झालं तरी ती माझी पहिली बायको होती. क्षणात मनात विचार आला. आपणच कुसुमचा वेड्यासारखा विचार करतो. कुसुमला आपली आठवणसुद्धा नसेल. ती आपल्या संसारात रमलीदेखील असेल, सगळं काही विसरून.

शिक्षण संपलं आणि मी गावावर आलो. शेतीचा धंदा पिढीजात घराण्यात चालत आलेला. मीही त्यातच रमलो. नात्यागोत्यातल्या मुलीशी माझंही लग्न झालं आणि संसारात गुरफटत गेलो. बालपणी झालेल्या लग्नाचा आणि कुसुमचाही मला विसर पडला. राधामामी सणासुदीला तेव्हढी घरी आली म्हणजे सुखादु:खाचं बोलायची. तिच्या बोलण्यातूनच समजलं की कुसुम नवऱ्यासह माहेरीच रहायला आलीय म्हणून. हातावरची पोटं. इथं राहीलं काय अन तिथं राहीलं काय, सारखंच. कुठंही काम करायचं आणि जगायचं.

काळ पुढं पुढं सरकत राहिला. काळाबरोबर मीही चालत राहिलो. कुसुम कामधंद्याला जाताना मधून मधून दृष्टीस पडायची. तेच पहाणं, हसणं आणि तोच अबोलपणा. आमच्या घरी मात्र लग्न झाल्यानंतर ती कधी आली नाही आणि माझ्या जन्मजात घाबरट स्वभावामुळं मीही स्वत:हून तिला भेटलो नाही. दोघही नजरभेटीचा आनंद तेव्हढा उपभोगत राहिलो.

गावच्या ग्रामपंचायतीवर सदस्य म्हणून माझी बिनविरोध निवड झाली आणि या माध्यमातून माझी समाजसेवा सुरू झाली. गोरगरिबांना घरकुलं मिळवून देणे. शासनाच्या सवलतींचा त्यांना लाभ मिळवून देणे. असे छोटे मोठे कामं मी करू लागलो. आणि एक दिवस कुसुम मला महिलांच्या ग्रामसभेत दिसली. महिला आपल्या समस्या सभेत मांडत होत्या. सरपंच आणि सदस्य त्यावर चर्चा करीत

होते. महिला घरकुलांच्या प्रश्नावरून भांडत होत्या. कुसुम त्यांच्यामध्ये शांत बसली होती. आपल्या देखण्या रूपानं ती सगळ्यांमध्ये उजवी दिसत होती. तासादीड तासात ग्रामसभा आटोपली आणि कुसुम माझ्यासमोर येऊन उभी राहिली. नजर जमिनीकडे स्थिरावून म्हणाली, 'माझ्या घराकडं या.' माझ्या होकारा-नकाराची वाट न पहाता ती वाटेला लागली. मला तिच्या धाडसाचं नवल वाटलं. कुसुमच्या घरी जावं की नाही या विचारांची मनात घुसळण सुरू असतानाच फितूर पावलं मात्र कुसुमच्या घराच्या दिशेनं निघाली होती. घाबरलेल्या मांजरागत दबकत मी तिच्या घरात प्रवेश केला. ती एकटीच घरात होती. माझी नजर तिचं घर न्याहळू लागली. तिचं का ते घर होतं? त्यापेक्षा जनावरांचा गोठा तरी बरा. कुडाच्या भिंती, चिपटाचं छप्पर अशा काड्यामुड्याच्या घराला दारही पत्र्याचं. कशी रहात असेल कुसुम ह्या घरात? तिनं अंथरलेल्या पोत्यावर बसलो. ती कुडाला पाठ लावून उभी राहिली. बराच वेळ ती आपल्या पदराशी चाळा करीत राहिली. ती काहीच बोलेना. तिच्या घरात अधिक वेळ कसं बसावं? म्हणून मीच म्हणालो, 'कुसुम, कशासाठी बोलावलस?'

तरीही ती अबोलच. 'बोल ना काही काम आहे का?'

'त्याशिवाय बोलावलं का?' तिची नजर आता माझ्यावर स्थिरावली.

'अगं पाहते काय? बोल ना. बोलल्याशिवाय मला कळेल का?'

'मी किती दिवस अशा घरात राहू?'

'मग मी काय करू?'

'मला घरकुल मिळवून द्या. तुम्ही अनेकांना घरकुलं दिलीत असं समजलंय मला. माझं एव्हढं काम करा.'

'त्यासाठी दारिद्र्यरेषेच्या यादीत नाव असावं लागतं. तुझं नाव आहे का त्या यादीत?'

'नाही.'

'मग घरकुल कसं मिळेल तुला? अशक्य आहे ते.'

'ते मला माहीत नाही. मला घरकुल पाहिजे. नवरा म्हणून हक्क आहे माझा तुमच्यावर.'

'काऽय? नवरा आणि मी?' मी वेड पांघरलं.

'होय तुम्हीच. बालपणी आपलं झालेलं लग्न तुम्ही विसरला असाल. पण मी नाही विसरले. पहिल्यांदा नवरा म्हणून मी तुमचा हात धरला आणि तेव्हापासून नवरा बायकोचं आपलं नातं मी मनात जपून ठेवलंय.' कुसुम भारावल्यागत बोलत होती.

'काय बोलते तू हे कुसुम. अगं...'

मला मध्येच अडवून ती म्हणाली, 'थांबा. बोलू द्या आता मला. किती दिवस मी हे मनात साठवून ठेवू असं वर्षानुवर्ष. आणि तुमच्याशिवाय सांगू तरी कुणाला? माझं लग्न ठरलं त्यावेळी मी लग्नाला विरोध केला. आपल्या बालपणीच्या लग्नाबद्दल घरात बोलले तर मला सगळ्यांनीच वेड्यात काढलं. म्हणाले, 'अगं, ती मोठी माणसं, चांगल्या जातीतली. त्यांची जात वेगळी, आपली जात वेगळी. ते कशाला आपल्याशी सोयरेसंबंध जुळवतील. मन मारून मी लग्नाला उभी राहिले. पण सासरी माझं मन रमलं नाही. वर्षा दोन वर्षातच नवऱ्यासोबत माहेरी आले. मनात विचार आला. ज्याच्याशी आपलं पहिलं लग्न झालं तो नसेना का आपल्या जातीचा. त्याच्याशी संसार जरी करता आला नाही तरी रोज त्याला आपल्याला पहाता तरी येईल. म्हणून फक्त तुमच्यासाठी मी माहेरी आले.' अबोल असलेली कुसुम आज खूपच बोलकी झाली होती.

'हे सगळं जर तुझ्या मनात होतं तर तू कधी माझ्याशी बोलली नाहीस.'

'तुमच्या घरी यावं, तुमच्याशी बोलावं. तुमच्या शेतीवाडीची कामं करावी, असं मनातून खूप वाटायचं. पण तुमच्या बायकोचा स्वभाव संशयी आहे. असं समजलं . माझ्यामुळं तुमच्या संसारात गैरसमज नकोत म्हणून जे वाटलं ते मनातच विरून गेलं. कधी तरी दुरून होणारं तुमचं दर्शनच मनाला समाधान देत राहिलं.

'कुसुम, आता तू ही पोपटपंची करतेस हेच आधी बोलली असतीस तर?'

'तर काय तुम्ही माझ्याशी लग्न केलं असतं?' मी तिच्याकडं पहातच राहिलो.

'बोला ना... गप्प का बसलात? मला माहीत आहे तेव्हढी हिंमत तुमच्यात नाही. मला तुम्ही घरकुल दिले ना तर तुमचं घर समजून मी त्या घरात संसार मांडीन आणि उरलेलं आयुष्य तुमच्या आठवणींवर काढील. या आता तुम्ही.'

तिने पदराने आपले डोळे पुसले. काही न बोलता मी मुकाट रस्त्याला लागलो.

कुसुमच्या मनातलं रीतं झालेलं आभाळ आता माझ्या मनात भरून आलं. विचारांच्या माश्या मनात घोंघावू लागल्या. खरंच कुसुम हे आपल्याला वीस वर्षांपूर्वी बोलली असती तर आपण केलं असतं तिच्याशी लग्न? होती आपल्यात एव्हढी हिंमत? जातीव्यवस्थेविरुद्ध पुकारलं असतं आपण बंड? थंड मनातून उत्तर आलं. हे धाडस तू तेव्हाही केलं नसतं आणि आजही. परमेश्वरानं स्त्री आणि पुरुष अशा दोनच जाती निर्माण केल्या. त्यांच्यात भावभावना निर्माण करून त्यांचा समन्वय घडवून आणला. पण माणसानं आपल्या स्वार्थासाठी माणसामाणसात जाती निर्माण केल्या आणि माणूस माणसापासून दुरावत गेला. माझ्याच समाजातली नात्यागोत्यातली मुलगी बायको म्हणून माझ्या गळ्यात बांधली. अशिक्षित, संशयी, भांडखोर, वागण्याबोलण्याचं तारतम्य नसलेली. कुसुमचा एकही गुण तिच्यात असता तर मी धन्य झालो असतो. तरीही मन मारून आणि कुसुमला दूर सारून मला तिच्याशीच संसार करावा लागतो आहे. केवळ ती जाती, समाजाची आहे म्हणून. मनुष्यजन्म जर एकदाच आहे तर माणूस आवडेल त्या स्त्रीसोबत संसार का करीत नाही? का जातो तो जाती व्यवस्थेला शरण? कारण ज्या त्या समाजानं आपापल्या माणसांच्या गळ्यात हे जातीव्यवस्थेचं लोढणं घट्ट बांधलं आहे. ते नाही उधळू देत त्याला चौफेर. तसा प्रयत्न जरी त्याने केला ना तर हेच लोढणं त्याचे हातपाय फोडतं आणि मग तो गरीब गायीसारखं हे लोढणं वागवीत जगत राहतो मनाविरुद्ध!

नियम अटींना झुगारून मी कुसुमला अजूनही घरकुल देऊ शकलो नाही. तिचं एवढंसं स्वप्न माझ्याकडून पूर्ण झालं नाही. पण तिनं माझ्या मनाच्या घराचा ताबा घेऊन आपल्या संसाराची केव्हाच मांडामांड केली आहे. माझी ही पहिली बायको मला अजूनही भेटते. भेटली म्हणजे हसते. नजर रोखून पाहते. त्या नजरेतून तिचा अबोला अधिकच बोलका होत जातो, तेव्हा माझी नजर आपसूकच खाली वळते. पुरुष असूनही हरल्याची आणि काहीतरी हरवल्याची जाणीव मनाला अधिकच बोचत राहते.

**



# आभाळओल

पावसाचं वातावरण तयार झालं की, रानात मोर आपला पिसारा फुलवून नाचतात तशी गावात पोरं पाऊस पडू लागला की, अंगणात फेर धरून नाचतात. पावसाचं वेड हे लहानापासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच असतं. पाऊस प्रत्येकालाच हवा - हवासा वाटतो. तसा प्रत्येकानेच पावसात भिजण्याचा आनंद उपभोगलेलाही असतो. काहींना प्रत्यक्ष पावसात भिजण्यात मजा वाटते. तर काहींना खिडकीशी बसून पाऊस पहायला आवडतो. पाऊस सगळ्यांच्याच आवडीचा विषय. कवि लेखकांना तर तो अधिकच आवडतो. पावसाळ्यातील हिरव्यागार रानाकडे पाहून कविवर्य ना. धों. महानोर आपल्या कवितेत लिहितात -

**'चिंब पावसानं रान झालं आबादानी'**

महानोरांचं वास्तव्य खेड्यात असल्याने त्यांच्या कवितेत रानातला पाऊस येतो. पण शहरातल्या कवींनाही रिमझिम बरसणारा पाऊस पाहिला की, त्यांच्याही गतकाळातील आठवणी जाग्या होतात. आपल्या एका पाऊसविषयीच्या कवितेत कवी रवींद्र मालुंजकर लिहितात - **'पाऊस तुझ्या सयीचा मम हृदयी झंकारतो**

**तुझ्यामाझ्या मनातली गाणी गोड आळवितो.'**

कवी आपल्या प्रेयसीसोबत पावसात भिजल्याच्या आठवणीत हरवून जातो. पण पाऊस आता पूर्वीसारखा नेमाजोमानं येत नाही. त्याचं येणं कधीतरी पाहुण्यासारखं असतं. आणि जाणंही तसच असतं. इतक्यात सरसर येतो. कपडे ओले करून क्षणात उघडूनही जातो. पूर्वी मृगात सुरू झालेला पाऊस घडीची उघडीप द्यायला तयार नसायचा. आभाळ ढगांनी भरून आलं की, माळवाड्यातली, सुतारवाड्यातली पोरं एकत्र जमून आभाळाकडं पहात गाणं म्हणायची-

**‘येरे येरे पावसा, तुला देतो पैसा,**
**पैसा झाला खोटा, पाऊस आला मोठा’**

त्या मुलांमध्ये माझाही सहभाग असायचा. तुम्हाला हे खरं वाटणार नाही. पण आम्ही मुलांनी असं गाणं म्हटल्यावर आभाळात ढगांचा प्रचंड गडगडाट व्हायचा. पाण्याचा धोळ पाटचारीनं पळावा तसा विजेचा लोळ ढगांमध्ये लख्खन चमकायचा. वारा सूंऽसूंऽ करीत इकडे तिकडे सुसाट धावत सुटायचा आणि टपटप गारा पडू लागायच्या. अंगणात मोत्यांच्या माळा तुटून मणी इतस्ततः विखरावे तशा गारा पसरलेल्या दिसायच्या. गारा वेचण्यासाठी एकमेकांना मागे पुढे रेटीत, आडवीत पोरांची झुंबड उडायची. तोंडात पडलेल्या गारा कडम कडम आवाजानं वाजत रहायच्या. प्रत्येकजण वेचलेल्या गारा आपल्या सदऱ्याच्या ओटीत गोळा करायचा. एव्हाना कुणाचं तरी लक्ष आमच्याकडं गेलेलं असायचं. तो दरवाज्यातूनच मोठ्याने ओरडायचा ‘पोरांनो पळता की नायी घराकडं! का येऊ तिकडं?’ त्या आवाजाने सगळ्यांचीच घराकडे पळापळ सुरू होई. अंगावरचे ते ओले कपडे पाहून आई पाठीत रपाटा घालून म्हणे, ‘मुडद्या, कशाला गेला व्हतास पावसात मरायला’. आईचा मार चुकवीत ओटीतल्या गारा पातेल्यात ओतून मी कोरडे कपडे घालायचो. त्याने अंगात उब आल्यासारखं वाटायचं. आईनं वाटीत दिलेल्या ज्वारीच्या खारट लाह्या खातांना खिडकीशी बसून पावसाची गंमत पहात बसायचो. बाहेर दामणागत सरींनी कोसळणारा पाऊस पहायला मोठी गंमत वाटायची. दुपारच्या वेळी पाऊस आला तर मोठी बहार येत असे. वाणीनं काकीच्या घराच्या दिशेने धो-धो वाहत येणारा पाण्याचा लोंढा माळवाड्याच्या उतारावरून सुतारवाड्याला वळसा घालून तसाच पुढे गावओढ्यातल्या पाण्यात धप्पकन उडी मारून त्याच्याबरोबर वहात

रहायचा. घरातल्या मोठ्यांचा डोळा चुकवून आम्ही पोरं गल्लीतून वाहणाऱ्या घोटच्याएवढ्या पाण्यात उतरायचो. एकमेकांवर गढूळ पाणी उडवून चिंबचिंब भिजायचो. तर कधी पाण्यात कागदाच्या होड्या सोडून त्यांच्या मागे धावायचो. पाऊस अचानक येऊन माणसांची धांदल उडवायचा. अंगणात वाळत घातलेले कपडे, वस्तू उचलायलाही वेळ द्यायचा नाही. पाऊस असा हटवादी आणि नंगटपणा करायचा, मुसळधार बरसायचा. खोपीच्या छपरातून, फुटलेल्या कौलातून घरात उतरून माणसांना सळो की पळो करून सोडायचा. आठ पंधरा दिवस घरातच ठाण मांडून बसायचा. त्यानं भिंतीला, भुईला ओल यायची. पाणी तुंबल्यानं रानातली पिकं पिवळी सुटूक पडून नासायची. असा नासाड्या पाऊस माझ्या बालपणी मी पाहिलेला असल्याने त्याच्या विषयीच्या कवितेत ह्या ओळी ओघानेच येतात.

**‘असा नंगट पाहुणा  गल्लीबोळात लोळला**
**छत गळकं पाहून घरादारात तुंबला**
**ओल आली वसरीला कौलं सारी शेवाळली**
**पेरलेली शेतं सारी पाहुण्यानं नासवली.’**

असा आठ पंधरा दिवस धिंगाणा घालणारा पाऊस घडीभराचीही उघडीप देत नसायचा. एकदा सुरू झाला की, सगळीकडे मुसळधार पडायचा. मध्येच आठ-चार दिवस रुसल्यासारखं करायचा तेवढ्या वेळात माणसं जमेल तशा पेरण्या, भाताच्या आवण्या असली कामं उरकायचे. बोल बोलता आखाड सुरू व्हायचा. आखाडात पाऊस, वारा एकत्र खेळ खेळून चांगलाच धिंगाणा घालायचे. पाऊस छत्री, घोंगट्यातून फुटून माणसांना भिजवायचा तर वारा छत्री उडवून माणसांची चेष्टामस्करी करायचा. आखाडात नुसता मरणाचा पाऊस कोसळायचा. इच्छा असूनही माणसांना कामधंदा करता येत नव्हता. घराघरात जगरं करून शेकण्यापलिकडे उद्योग नसायचा. गावात कुठंतरी पावसानं भिजाटणी होऊन एखाद्या घराची भिंत कोसळायची, हाहाकार उडायचा. गोठ्यातली जनावरं ताटकळून जायची. नुसतं ‘भूस’ खाऊन हपा-हपा करायची. कामधंदा नसल्यानं हातावरच्या पोटांची उपासमार सुरू व्हायची. शेजारीपाजारी उसनवार चालायची. आखाडाच्या महिन्यात माणसं ‘आखारणी’ यायची. ह्या महिन्यात रोगराई आणि उपासमारीनं

माणसं पटापट मरायची म्हणून आखाडाला मरीताचा महिना आला असेही म्हणायचे. हे सगळं पाहिल्यावर मला नेहमी हवाहवासा वाटणारा पाऊस नको नकोसा वाटायचा. आखाडात गावओढ्याला उतार नसायचा. दिवसातून दोनदा तिनदा त्याला पूर यायचा. दोन्ही थडच्यांवर माणसं पूर ओसरायची वाट पहात बसायची. गावओढ्याचं पाणी नदीला मिळायचं. कादवा दुथडी भरून वहायची. एकदा तर तिनं रुद्रावतारचं धारण केला. तिच्या पाण्यानं गावाला वळसा घालून पाणी वेशीत आलं.

नदीच्या बाजूचा कोळवाडा वाहून गेला. गावात हाहाकार उडाला. कमरेएवढ्या पाण्यातून माणसं पोराबाळांसह मारुतीच्या देवळात आसऱ्याला आली. कवीश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी आपल्या 'कणा' कवितेत वर्णन केल्याप्रमाणे घडलं होतं,

**'भिंत खचली चूल विझली होते नव्हते नेले**
**प्रसाद म्हणून पापण्यांमंध्ये पाणी थोडे ठेवले'**

निराधारांच्या पापण्यांमधले पाणी पाहून माणसं मदतीला धावले. घराघरातून भाकरी जमा झाल्या. उपाशी पोटं भरली. निराधारांना आधार मिळाला. पण पाऊस बिनघोरच, बिनधास्त कोसळतच होता. गाव वाहून जातं की काय अशी भीती वाटत होती. पाण्याचा 'फुग' सारखा वाढत होता. गावाच्या पाटलानं, पाटलीनी सोबत पुराचे पाणी पुजले. पाटलीनबाईनं खणानाराळानं कादवामाईची ओटी भरली. माणसांच्या नम्रतेपुढं नदीही नमली. पाण्याला ओहोटी लागली. पूर्वी माणूस माणसाला 'वळगायचा' म्हणून निसर्गही माणसाचं ऐकायचा. आता माणसा-माणसात बेबनाव झाला. त्याने निसर्गावर कुऱ्हाड चालविली. मोठ्या प्रमाणात जंगलतोड झाली. रानं उजाड झाली. आभाळात ढग जमेनासे झाले. पावसाचं प्रमाण घटलं. आता पाऊस सर्वत्र पडत नाही. कुठं पडला कुठं नाही. माझ्या बालपणी पावसाळ्याच्या दिवसात पाहुणा म्हणून आलेला पाऊस गावातच चार महिने ठाण मांडून बसायचा आणि गावातील माणसांना सळो की पळो करून सोडायचा. सुरुवातीला त्याचं वाजत गाजत स्वागत करणारे गावकरी त्याच्या त्रासाला कंटाळून याला कसं हाकलून लावावं याचाच विचार करायचे, आणि निर्णय पक्का झाल्यावर म्हणायचे...

**‘लई उतला मातला  याला घालवा घालवा**
**हाती इस्तव घेवून याला पोळवा पोळवा’**

मग कोणीतरी हातात विस्तव घेऊन भर पावसात नाचायचा. मला चांगलं आठवतं, एका सवसांजेला धुव्वाँधार पावसात माझ्या आजीनं उलथनीवर विस्तव घेतला आणि अंगावरलं लुगडं फेडून नागव्यानं पाऊस पोळवला. आजी अंगणात विस्तव घेऊन नाचायची आणि तिची जाऊबाई तिला गाण्याच्या ठेक्यावर विचारायची ‘काय करिती’ आजी नाचून उत्तर द्यायची ‘पाऊस पोळविती’. असा संवाद पाच मिनिटं चालायचा. हळूहळू पाऊस मागेमागे हटायचा. आपण शेक लागल्यावर मागे सरकतो ना तसा ! पाऊस गावातून निघून जायचा. बालपणी पाहिलेल्या प्रसंगांचे, घटनांचे संस्कार माझ्या मनावर झालेले म्हणूनच ‘पाऊस पाहुणा’ या कवितेत ह्या ओळी माझ्या हातून सहज लिहिल्या जातात -

**‘पोळविण्या पावसाला कोणी नागवा नाचला**
**जीव घेऊन पाऊस नदीनाल्यानं धावला**

माणूस हा अतिशय हुशार प्राणी आहे. तो पावसानं यावं म्हणून देवाला पाण्याचा ‘हेल’ घालतो, त्याची आळवणी करतो आणि आलेल्या पावसाचा त्रास जास्तच वाढला तर त्यानं निघून जावं म्हणून त्याला विस्तवानं पोळवतो. पूर्वी पाऊस आणि माणूस याचं एक घनिष्ट नातं होतं. त्यांच्यात जिव्हाळा होता. आता माणूस बदलला तसा निसर्गही बदलला. माणूस मन मानेल तसा वागतो. पाऊसही मनात येईल, तेव्हा आणि मन मानेल तिथेच पडतो. पण असं असलं तरी आभाळाच्या मनात अजूनही माणसांबद्दल ‘ओल’ टिकून आहे. म्हणून तर आभाळ ढगांना आपल्या उराशी कवटाळून धरतं आणि माणसांच्या गरजेसाठी धावून येतं. भर उन्हाळ्यात माती खालची माती खोदून पहा ती अजूनही ओलावा धरून आहे. आभाळ पानाफुलांवर दवबिंदूंचा वर्षाव करून सृष्टीला सतत ओल देत असतं. वाऱ्याच्या झुळकेतही ओलावा आहे. पण माणसांच्या मनातल्या ओलाव्याचं काय? कुठ हरवलाय तो? याचा शोध माणसानं आता घेतला पाहिजे. तरच पूर्वीसारखा पाऊस नेमाजोमानं येत राहील, माझ्या बालपणी बरसायचा तसा!

**



# आई : जन्मभराची शिदोरी

आज मन पुन्हा पुन्हा आषाढातल्या आभाळासारखं का भरून येतंय? लिहिताना हात असा का थरथरतोय? ही मनाची चलबिचल, अस्वस्थता, घालमेल, हुरहूर हे सगळंच असं का दाटून आलंय? याआधी अनेक कथा-कविता लिहिताना गहिवरलं नाही. मग आईचा लेख लिहिताना आजच असं का होतंय? काहीही झालं तरी आईविषयी लिहावं लागणारच आहे. माझ्या अवतीभोवतीच्या समाजात मुलासाठी कष्ट करणारी आई मी पाहतो. तिची मुलांसाठीची धडपड, कळवळा पाहतो, पुस्तकातून वाचतो तेव्हा माझं संवेदनशील मन आईसाठी हळहळतं. आई तुमची असो की माझी, आई मला नेहमीच आवडते. सगळे मानसन्मान विसरून मी आईच्या पायाशी नतमस्तक होतो. आईविषयी माझं मन एवढं हळवं कसं झालंय? माझ्या आईचं जगणं, तिने कुटुंबासाठी केलेले अपार कष्ट मी तिच्यासोबत अनुभवले आहेत. म्हणून सगळ्या नात्यांपेक्षा आईचं नातं मला सर्वश्रेष्ठ वाटतं.

मला जसं कळू लागलं तशी माझ्या आईची अनेक रूपं मी पाहिली आहेत. आई उत्तम शेती करायची. तिच्या राबण्यानं शेतंही भरभरून पिकायची. निंदणी,

खुरपणीपासूनची शेतातली सगळी कामं ती करायची. मजुरीच्या बायकासोबत उन्हातान्हात राबायची. शेतातून सायंकाळी घरी आली म्हणजे स्वयंपाकपाणी करायची. आम्हा पाचही भावंडाची काळजी घ्यायची. मी तिचा मोठा मुलगा. म्हणून मला कामही जास्त सांगायची. कॅनॉलला पाणी सुटलं म्हणजे मला कॅनॉलच्या गेटजवळ कोणी पाणी वळवायला नको म्हणून राखण करायला बसवायची. स्वत: पिकाचे बारे मोडून पाणी भरायची. मी दिवसभर उन्हातान्हात गेटजवळ बसून असायचो. आई अंधार पडायला घराकडं निघायची. तेव्हा मी तिच्यासोबत घराकडं परतायचो.

कधी मला कामाचा कंटाळा यायचा. मी हट्टीपणा करायचो. काम सोडून खेळायला पळायचो. कामाचं महत्त्व तिला, माझ्या अल्लड मनाला कुठलं आलय. मी खेळून घरी आलो की, मला पाहताच तिचा राग अनावर व्हायचा. बऱ्यावाईट शिव्या घालायची. एवढ्यावरच ती थांबायची नाही, तर माझ्या पाठीचा तडमताशा करायची. मला मारताना तिच्या हातातल्या बांगड्या फुटायच्या. मी जीवाच्या आकांताने ओरडायचो. पण तिच्या मनात दया उत्पन्न होत नसायची. आज मी त्रेपन्न वर्षांचा आहे. अजूनही माझी आई मला मारते. तिचं मारणं मला भूषणावह वाटतं. आई जेव्हा मला मारते तेव्हा असं वाटतं एखाद्या शिल्पकारानं दगडाची मूर्ती घडविताना छन्नी-हातोड्याच्या सहायाने नको असलेला भाग काढून टाकावा आणि सुंदर मूर्ती घडवावी, तशी माझी आई मला हाणून, मारून माझ्यातले दुर्गुण झाडून झटकून मला चांगला माणूस म्हणून घडवित असते.

माझी आई स्वभावानं अतिशय तापट, स्वाभिमानी, प्रेमळ आहे. यापेक्षाही ती व्यवहारी अधिक आहे. माझे वडील ग्रामसेवक म्हणून नोकरी करायचे. त्यांना शेतीची कोणतीच कामं येत नव्हती. आणि शेतीची आवडही नव्हती. ते शेताकडे कधी फिरकलेच नाही. आपण आणि आपली नोकरी भली, असं त्यांचं काम होतं. शेतीचं सगळं नियोजन आई करायची. माझ्या वडिलांना नोकरी आहे म्हणून माझ्या आजीनं वडिलोपार्जित जमिनीत आम्हाला हिस्सा दिला नाही. आज जी पाचसात एकर जमीन आमच्याकडे आहे ती आईनं शेतात घाम गाळून

आलेल्या उत्पन्नावर घेतली आहे. जी काही आमच्या कुटुंबाकडे इस्टेट आहे ती माझ्या आईच्या कष्टाची साक्ष आहे आणि तिचा मोठा मुलगा म्हणून याचा मी साक्षीदार आहे. तिचं बोट धरून सुख-दु:खात तिच्या सावलीसारखा मी तिच्यासाबेत चालत राहिलो.

आईला सामाजिक कार्याची विशेष आवड. गावात सांस्कृतिक कार्यक्रम असले म्हणजे आईचा त्यात हमखास सहभाग असायचा. कार्यक्रमाचं नियोजन तिच्याकडेच असायचं. १९६५ साली गावातील दगडी शाळेत ग्रामगौरवाचा कार्यक्रम झाला. त्यात रुक्मिणी महिला मंडळाने सहभाग घेऊन त्या कार्यक्रमाची रंगत वाढविली. आई अनेक वर्षे रुक्मणी महिला मंडळाची सरचिटणीस म्हणून काम पाहत होती. गावच्या ग्रामपंचायतीची पाच वर्षे सदस्य होती. तिळसंक्रांतीच्या हळदी-कुंकवाचा कार्यक्रम, कोजागिरीचा दूध आटविण्याचा कार्यक्रम महिला मंडळाच्या वतीने घेतला जायचा. त्यातही आईचा पुढाकार असायचा.

१९६८ साली पालखेड धरणाच्या मोजणीचं काम सुरू झालं. कादवा नदीवर दिंडोरी तालुक्यातील एकमेव मोठं धरण बांधण्याचं सरकारी धोरण होतं. त्यात दिंडोरी तालुक्याचं फार मोठं क्षेत्र पाण्याखाली जाणार होतं. अनेक गावं उद्ध्वस्त होणार होती. धरणामुळं अनेक कुटुंबं रस्त्यावर येणार होती. या धरणाला विरोध करण्यासाठी पंचक्रोशीतील पुढाऱ्यांनी एका कमिटीची स्थापना केली. त्या कमिटीने त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन मातेरेवाडीला सत्ताधारी आणि विरोधी पक्षाची सभा आयोजित केली. हजारोंनी जनसमुदाय उपस्थित होता. त्या सभेत व्यासपीठावरून आईने दहा मिनिटांचं भाषण केलं. तिच्या भाषणानं उपस्थित मंत्र्यासह आख्खा जनसमुदाय हेलावून गेला. तिच्या भाषणात एवढं मोठं धरण झालं तर इथल्या जमिनी, घरं पाण्यात गेल्याने इथला माणूस कसा देशोधडीला लागेल, याचं हृदयद्रावक वर्णन होतं. या सभेत अनेकांची भाषणं झाली, पण महिला म्हणून आईचं एकमेव भाषण झालं आणि ते गाजलंही. या सभेचा परिणाम म्हणून एकच मोठं धरण बांधण्याचा विचार सरकारला मागे घ्यावा लागला आणि तालुक्यात छोट्या स्वरूपाची पाच धरणं बांधण्यात आली.

आईचं शिक्षण तसं चौथी पास एवढंच. पण प्रसंगाचं तारतम्य, कुशाग्र बुद्धी,

अचूक निर्णय, प्रचंड हिंमत, कामाची तत्परता, वेळेचे भान हे सगळे गुण तिच्यात असल्याने ती जे काम हाती घेते त्याचं सोनं झालं आहे. तशी तिला सोन्याच्या दागिन्यांची भारी हौस आहे. अनेकदा तिने सोन्याचे दागिने घडविले आणि कुटुंबावर प्रसंग येताच ते मोडलेदेखील. आजही तिची सोनं घेण्याची हौस तशीच टिकून आहे. लाखभर रुपयांचे दागिने घालून वयाच्या पंच्याहत्तरीतही ती एकटीच एसटीने प्रवास करते. स्वत:ची कामं स्वत:च करते. तिने केलेल्या भाजी-भाकरीलाही चव येते.

आजही ती मला 'बाळ्या' म्हणून हाक मारते. (माझं घरातलं नाव बाळासाहेब आहे) मलाही ते आवडतं. कारण तो अधिकार तिलाच आहे. बाळ्या म्हटलं की, मी अजून लहान होतो. मला माझं बालपण आठवत जातं. मी आणि आई व्यवहार पाहत असल्याने अनेकदा आमची भांडणं झाली आहेत. आई अबोल व्हायची. अजूनही होते. तिचं गप्प राहणं मला असह्य होतं. तसं तिलाही होतं. एक तर ती किंवा मी माघार घेऊन बोलू लागतो. वरकरणी माझ्याशी वागताना ती बेफिकिरीने वागते. पण तिला माझीच जास्त काळजी असते. माझ्यात तिचा अधिक जीव गुंतला आहे. माझ्या अपरोक्ष ती जवळच्या नातेवाईकांकडे मनातलं बोलत असते. 'सगळ्याचं चांगलं आहे, पण बाळ्याच्या संसाराचीच भळभळ आहे. माझा बाळ्या म्हणजे माझ्या संसाराचा 'सार' आहे.' आईनं मुलाला दिलेली ही शाबासकी आहे. बाळ्याला अजून काय हवं आहे?

मी आठवीला असेन तेव्हाचा प्रसंग. आमच्या घरी वडील साप्ताहिक गांवकरी, स्वराज्य अशी साप्ताहिकं आणायचे. साप्ताहिक गांवकरीत माझे मामा भास्कर गवळी यांच्या कथा असायच्या. आई त्या वाचायची. एकदा ती म्हणाली, 'तूसुद्धा अशाच मामासारख्या कथा लिहून बघ.' आईच्या बोलण्याचं मला विशेष वाटलंही नाही आणि ते मी मनावरही घेतलं नाही. पण साप्ताहिक गांवकरीत मामाची कथा छापून आली की आई मला सारखं म्हणायची, 'तू लिहिलं पाहिजे.' आई म्हणतेच आहे तर प्रयत्न करायला काय हरकत आहे. म्हणून मी लिहू लागलो. लिहिलेले फाडू लागलो. रात्री जागून काढल्या. काही तरी मनासारखं लिहिलं. साप्ताहिक गांवकरीत माझी कथा छापून आली.

माझ्यापेक्षा आईलाच खूप आनंद झाला. माझं लेखक होण्याचं स्वप्न तिनं पाहिलं होतं. त्याची सुरुवात झाल्याचं समाधान तिच्या चेहऱ्यावर होतं.

कोणी जादूची कांडी फिरवली म्हणजे लेखक होत नाही किंवा तू लेखक हो, असं सांगितलं म्हणूनही लेखक होत नाही. काही अंशीतरी उपजतच प्रतिभा असावी लागते. ती माझ्यात असेलही, पण ती असल्याची पहिली जाणीव माझ्या आईनेच मला करून दिली. तिनं ही जाणीव करून दिली नसती तर? तर मी आज लेखक नसतोही. लेखकाला जे जे म्हणून काही आवश्यक आहे ते आईनं मला पुरवलं आहे. माझ्या बालपणी पहाटच्या नीरव शांततेत आई जात्यापाळी दळताना ओव्या म्हणायची. तिचा शब्दन् शब्द मी आजही हृदयात जसाच्या तसा जपून ठेवला आहे. कधी तिच्या मांडीवर डोकं टेकवून तर कधी तिला जातं ओढायला मदत करून, कधी शेतात निंदणी करीत असताना तिच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या ओव्या मी ऐकल्या आहेत. माझ्या कवितांमध्ये त्यातले शब्द आपसूकच येतात. माझ्या हातून या ओळी सहज लिहिल्या जातात.

**तुझ्या व्हठातील ओवी**
**खुलायाची जात्यापाळी**
**तेच शब्द झाले आज**
**माझ्या कवितेच्या ओळी ॥**

मी आईचा आज्ञाधारक मुलगा. तिने सांगितलेले बरेच निर्णय मला फायद्याचे झाले आहेत. मी अंगी कोंबडं कापलेले निर्णय (हे तिचं बोलणं) माझ्या अंगलट आले आहेत. मला असं वाटतं, प्रत्येकाच्याच आईला आपला मुलगा काय करू शकतो हे अधिक कळत असतं. माझं लेखक, कवी होण्याचं श्रेय हे तर माझ्या आईचंच आहे. मी लिहिलेला प्रत्येक शब्दन् शब्द ती वाचत असते. वाचण्यापेक्षा ती अधिक तपासत असते. 'हा प्रसंग लिहिताना तू चुकला आहे. तो असा नाही घडला. असा घडला आहे.' असं सांगत असते. माझ्या प्रत्येक पुस्तकाच्या प्रकाशनाला ती हजर असते. माझ्या 'हेळसांड' कथासंग्रहाचं प्रकाशन तर तिच्याच शुभहस्ते झालं आहे. मला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. पुरस्कार जाहीर झाला की मी सर्वप्रथम आईपुढे नतमस्तक होतो. तिच्या आशीर्वादानेच

माझी साहित्य निर्मिती होत असते. मी किती तरी वेळा शेतातलं चालू काम सोडून लिहीत बसलो असेल कामाची लोभी असलेली माझी आई माझ्यावर कधी रागावली नाही. एखादी आई म्हणाली असती, 'कथा-कविता करून पोट भरत नाही. मुकाट्यानं शेतातलं काम कर.' मला वाटतं तिच्याकडे दूरदृष्टी आहे. आपला मुलगा साहित्यात चांगलं काम करू शकतो, याचा तिला आत्मविश्वास असावा म्हणूनच तिने माझ्यातल्या लेखकाला जागवलं, जोपासलं आणि वाढवलं आहे. मुलगा म्हणून मला वाढविण्यापेक्षा लेखक म्हणूनच तिने माझ्याकडे अधिक लक्ष दिलं आहे. माझी मन:स्थिती सांभाळली आहे. आज माझ्याबरोबर तिचाही मानसन्मान होतो आहे. विविध क्षेत्रातली लहान-मोठी माणसं एका लेखकाची आई म्हणून तिच्या पायाशी नतमस्तक झाली आहेत.

माझ्या दोन भावंडांचं कुटुंब नाशिकला राहतं. त्यांच्यातच आई राहते. दर महिन्याला पेन्शन घेण्यासाठी दिंडोरीला आली म्हणजे तिचे पाय आपोआपच आपल्या कर्मभूमीकडं वळतात. ती पालखेडला आपल्या मूळ गावी येते. येताना आपल्या नातवांसाठी खाऊ आणते. आम्हा दोघा भावांच्या कुटुंबात आठ-पंधरा दिवस रमते. शेतीवाडीबद्दल सल्ला देते. अडीअडचणींचं तिच्या पद्धतीनं निवारण करते. पुन्हा तिला नाशिकच्या नातवांची आठवण येते. ती जायला निघते. नातवांच्या तोंडावरून मायेने हात उतरवते. त्यांच्या हातावर खाऊसाठी पैसे ठेवते आणि एकटीच प्रवासाला निघते. एसटीत शेजारी बसणारा प्रवासी विचारपूस करतो. 'आजीबाई गाव कोणतं तुमचं.'?

'पालखेड बंधारा.'

म्हणजे लेखक विजयकुमार मिठेंचं गाव.' - प्रवासी.

'तो मुलगा आहे माझा.' आई.

'त्यांची पुस्तकं वाचतो मी. मला आवडतं त्यांचं लिखाण.' प्रवासी

आपल्या मुलाचं हे कौतुक ऐकून अंगावरून मोरपीस फिरल्याचा तिला आनंद होतो. जेव्हा ती मला या प्रसंगांचं वर्णन करून सांगते तेव्हाही तिचा चेहरा आनंदाने फुलून येतो.

आमच्या कुटुंबात अनेक दु:खद घटना घडल्या आहेत. प्रत्येक प्रसंगाला

आई धीराने सामोरी गेली आहे. १९७९ सालात माझ्या वडिलांचे वयाच्या ४९ व्या वर्षी निधन झाले. आम्ही भावंडे लहान. दोन लाखाच्या आसपास कर्ज. कर्ज कसं फेडायचं? जगायचं कसं? आईपुढे असे अनेक प्रश्न. 'जमीन विका, नाशिकचा बंगला विका, आणि कर्ज फेडा' अनेकांनी असे सल्ले दिले. आई फक्त ऐकत होती. तिने पुन्हा एकदा नव्याने कंबर कसली. मला हाताशी धरले. शेतात राबणं सुरू झालं. मायलेकांच्या कष्टाला फळ आलं. ज्वारीच्या भाकरी खाऊन दिवस काढले. जे जे स्वस्त मिळेल ते ते आम्ही अन्न म्हणून जगण्यासाठी खाल्लं. दरम्यान, माझा पाठचा भाऊ कादवा कारखान्यावर नोकरीला लागला. बरेच महिने तो आपल्या सहकाऱ्यांसोबत जेवायला बसत नसायचा. त्याच्या डब्यात ज्वारीची भाकरी, लाल मिरची असायची. आपली गरिबी इतरांना दिसायला नको म्हणून तो बाजूला बसून जेवायचा. तीन नंबरचा भाऊ पाटबंधारे खात्यात नोकरीला लागला. कर्जफेड झाली. माझे, माझ्या भावंडांचे लग्नकार्य झाले. सगळं घर पुन्हा सुखासमाधानानं नांदत असतानाच माझ्या लहान भावांचं निधन झालं. मुलाच्या दु:खानं आई खचली. पुन्हा सावरली. त्याच्या बायको-मुलाचा खर्च आमच्यावर पडू न देता स्वत:च्या पेन्शनमधून त्यांचा खर्च करीत राहिली. त्याच्या मुलाच्या भविष्याचा विचार करून आपल्या हौसेमौजेला फाटा देऊन नातवाच्या नावावर शिक्षणासाठी काही रक्कम गुंतवली.

माझी आई आपल्या कुटुंबासाठी मुला-बाळांसाठी, नातवांसाठी जगत राहिली. झिजत राहिली, पण आपण आणि आपलं कुटुंब एवढाच तिचा दृष्टिकोन संकुचित राहिला नाही. समाजाचे आपण काही देणे लागतो या जाणिवेतून तीने गावातील हायस्कूलमध्ये ५००० रुपयांची ठेव ठेवली आहे. त्याच्या व्याजावर मुलांना बक्षिसं दिली जातात. नाशिकचे राम मंदिर असो की, गावातील धार्मिक कार्यक्रम, यासाठी तिने हजारो रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत.

आईचा लेख लिहिताना अशा किती तरी आठवणी माझ्या मनात दाटून आल्या आहेत. पावसाळ्याच्या दिवसात आई आजारी होती. दुपारची वेळ होती. बाहेर पाऊस कोसळत होता. आई पलंगावर झोपली होती. मी स्वराज्य दिवाळी अंकातील ना.धो. महानोरांची 'तिच्या कारुण्याची कहाणी' ही कविता वाचत

होतो. त्या कवितेने मी प्रभावित झालो. वाटलं आईला ही कविता वाचून दाखवावी. मी कविता वाचत होतो आई ऐकत होती. वाचताना माझा कंठ दाटून आला. आईच्या डोळ्यांना धारा लागल्या. आम्ही दोघंही रडत होतो. महानोरांच्या कवितेतलं सगळंच दुःख आम्ही जसच्या तसं जगलो होतो. मध्यंतरी काही महिन्यांचा कालावधी उलटून गेला. मलाही वाटलं महानोरांसारखं आपणही आपल्या आईचं दुःख, तिचं जगणं शब्दातून मांडावं. लिहायला बसलो, पण शब्दच सुचेना. एक कडवं सुचलं. लिहून काढलं. पुन्हा महिनाभर काही सुचेना. असं करत जवळपास दीड वर्षात अठरा कडव्यांची आणि बहात्तर ओळींची माझ्या आईच्या जगण्याची कविता मी लिहिली. महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी. प्रा. इंद्रजित भालेराव, कविवर्य विठ्ठल वाघ, प्रा. प्रशांत मोरे या मान्यवरांना ती ऐकवली. कविता अजून दीर्घ करण्याचा त्यांनी सल्ला दिला. ही कविता मी अनेक ठिकाणी सादर केली. ती ऐकून लोकं रडतात. गहिवरतात. सिन्नरचे एक रसिक वाचक, सुभाष वैद्य यांना मी आईची कविता ऐकवली तेव्हा ते भारावून गेले. वयाने मोठे असूनही माझ्या पायाशी वाकले. म्हणाले, 'विजय, आईच्या ऋणातून कोणीच मुक्त होत नाही, पण तू ही कविता लिहून मुक्त झाला आहेस.' आई कवितेने मला प्रतिष्ठा दिली. नाव दिलं. आई कविता हीच आज माझी ओळख झाली आहे. माझी आई नाशिकला राहते. मला माहीत आहे, तिथं तिचं मन रमत नाही, पण नातवांच्या प्रेमापोटी तिला तिथं रहावं लागतं. आजमितीस तिचं वय ७७ वर्षांचं आहे. तिचं आरोग्य उत्तम आहे. संसारात इतकी दुःखं भोगूनही ती समाधानाचं जीवन जगते आहे. जीवन आनंदात कसं जगावं याचा आदर्श वस्तुपाठ म्हणजे माझी आई. एक उत्तम शेतकरी, धाडसी वक्ता, उत्कृष्ट संघटक, कुशल नियोजक, चांगला वाचक, समाजहितचिंतक, मार्गदर्शक असे एक ना अनेक माझ्या आईची रूपं आहेत. तिचे हे सगळे गुण तिच्या रक्तातून, संस्कारातून माझ्यामध्ये आले आहेत. माझ्याकडे जे जे काही चांगलं असेल, सुंदर असेल ते माझ्या आईनं मला दिलेलं आहे. आई माझ्या लिखाणाची शक्ती आहे. मी फक्त निमित्तमात्र आहे नावापुरता! मला अजून खूप लिहायचं आहे. यासाठी आईनं खूप जगावं, अगदी शंभरी गाठावी. आई

आहे म्हणून माझ्या लिहिण्याला अर्थ आहे. लिहिण्यातही आनंद आहे. हे सगळं खरं असलं तरी मृत्यू कुणासाठी थांबला नाही, हे सत्य मी नाकारू शकत नाही. कधीतरी पावसाळ्याचे दिवस असतील, नाहीतर उन्हाळा असेल कदाचित हिवाळाही असेल. सकाळ, दुपार, संध्याकाळ कोणतीही वेळ असेल. वाऱ्याच्या हळूवार झुळकेनं फुलं गळून पडावं तशी माझी आई एक दिवस या जगाचा निरोप घेईल. मनात खूप कालवाकालव होईल. आई गेल्याचं दुःख माझ्या भावा-बहिणीलाही होईल. 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' अशी त्यांची अवस्था होईल. ते आईविना अनाथ होतील. पोरके होतील. पण मला मात्र असं काहीच वाटणार नाही. मी पोरका होणार नाही की, अनाथही होणार नाही. आईच्या शब्दांनी मला खूप श्रीमंत केलं आहे. पुस्तक रूपानं अमर होण्याचा मंत्रही तिने मलाच दिला आहे. आई गेल्याचं दुःख मलाही होईल, पण मी रडणार नाही. मी रडलेलं तिला आवडणार नाही. माझं हतबल होणं तिला असह्य होईल. दुःखाला कसं सामोरी जायचं हे तिनंच तर मला शिकवलं आहे. असं असलं तरी आईच्या निघून जाण्यानं माझ्या डोळ्यापुढे अंधार दाटेल. माझ्या हातातली लेखणी गळून पडेल. कागदावर शब्द उमटणार नाहीत. पण मला खात्री आहे, माझी आई स्वप्नात येऊन मला दृष्टांत देईल. 'बाळ्या, थकलास काय रे. मी नसले म्हणून काय झालं. माझी सगळं सुख-दुःखं तू पाहिली आहेस. तुझ्या जन्मभर पुरून उरेल एवढी अनुभवांची शिदोरी मी तुला दिली आहे. असा हातपाय गाळून बसू नकोस. ऊठ पोरा, ऊठ. तू लेखक आहेस. तू लिहिलं पाहिजे. अजून तुला खूप मजल गाठायची आहे. मी तुझ्या सोबतच आहे.' माझ्या आईचा शब्द मी डावलणार नाही. त्या क्षणाला उठून मी टेबलाजवळ बसेन, आईच्या अनुभवांचा एक एक शब्द मोती होऊन कागदावर उतरेल, हे शब्दच मला अमर करतील!

**